म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५८०

काका कालेलकर

REFBK-0013732

૩૬૮૭૬
સં.૨૫.
૭૬.૨.૬૫
૧૯૬૦

खेळकर पानें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३५८१८ वि: ललित
क्रमांक २५६५० नों: दि: १७/२/८५

काका कालेलकर

मंगेश पाडगांवकर
यांच्या रसग्रहणात्मक लेखासह





REFBK-0013732

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© काका कालेलकर

पहिली आवृत्ती :
सप्टेंबर १९६४
भाद्रपद १८८६

किंमत तीन रुपये

मुद्रक :
कृष्णा शं. करवार
कॉनवे प्रा. लि. (प्रिन्टर्स)
६ टलो रोड
मुंबई १ बी आर

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ डब्ल्यू बी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ३७८१८ वि. निबंध
आंक २५६० दि. ९ ७।२।८५

भक्ति-कुसुमांजलि

महाराष्ट्राच्या ज्या निसर्गानें मला निरीक्षणाची
बालपणींच गोडी लावली आणि महाराष्ट्राच्या
ज्या संतकवींनीं मला संस्कारिता दिली त्यांचेविषयीं
कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं मी असलया निबंधांहून
दुसरें कोणचें अर्घ्य वापरणार ?

संतोष

मी हाडाचा शिक्षक. अनुभव आणि ज्ञान मिळविणें, त्याचें चिंतन करणें आणि त्यांतून जें कांहीं निष्पन्न होईल तें दुसऱ्यांना वाटणें हा माझा मुख्य व्यवसाय. शिक्षकाचा पेशा पत्करल्यानंतर हीं दोन्हीं कामें उत्तमपणें कशी करतां येतील याची तळमळ सुरू झाली. सृष्टिनिरीक्षणाची हौस अगदीं बालपणापासून. किड्या-मुंग्यांपासून ते आकाशांतल्या ढगा-ताऱ्यापर्यंत निरीक्षण करण्यांत असाधारण आनंद वाटे. पुढें समजलें कीं चांगले कवीहि असेंच करीत असतात.

शाळेंत अभ्यास करतां करतां साहित्याची गोडी लागली आणि थोडे उत्कृष्ट अध्यापक मिळाल्यामुळें त्यांच्या अध्यापनकलेचें कौतुक वाटूं लागलें. लहानपणच्या गोष्टी ऐकतां ऐकतां आणि निरनिराळ्या भाषेंतील वेंचीव कादंबऱ्या वाचतां वाचतां मनुष्य स्वभावाच्या खुब्या समजूं लागल्या. हेंहि एक उत्तम आनंद मिळविण्याचें क्षेत्र आहे असें वाटल्यामुळें साहित्यकलेची थोडी गोडी लागली.

माझी जडण घडण अशी आहे. मी मूळचा निरीक्षक. त्यानंतर बनलों शिक्षक. माझ्यांत साहित्य-कलाकार केव्हां कुठून शिरला याची मला अजून खरीखुरी किंवा पुरेपुरी माहिती मिळाली नाहीं. पण कलाकार माझ्या अभिरुचींत, वाणींत आणि लेखणींत शिरलेला स्वेच्छासोबत्यांना दिसून आला. त्यांनीं त्याला प्रोत्साहन दिलें. परिणाम असा झाला कीं शिक्षकांची कला केवळ कलेची देखील उपासना करायला तयार झाली.

दुसऱ्या बाजूनें पाहतां मला जर एखाद्या वृत्तीनें घेरलें असेल तर ती होती स्वातंत्र्याची लालसा. भारतमाता स्वतंत्र झालीच पाहिजे आणि त्याकामीं आपल्या जीवनाची आहुति देण्यास नेहमीं तयार

असलें पाहिजे या प्रबळ वासनेवरच संत-साहित्यानें आध्यात्माचीं पुटें चढविलीं आणि मग 'सा विद्या या विमुक्तये' या सूत्राचा जीवनव्यापी अर्थ उमगला.

अशा प्रकारच्या जीवनोद्देशानें घेरलेल्या माणसाच्या हातून ललित लेखन कसें घडणार ? पण जीवनकला हीच मनुष्यजातीला ईश्वराची सर्वांत मोठी देणगी आहे. जीवनकला अनंत रूपें धारण करते आणि हाडाचा शिक्षक देखील केव्हां केव्हां साहित्यक्षेत्रांत थोडी सहल करून येऊं शकतो.

रिकामपणीं जें थोडें लिहावेंसें वाटलें तें विरंगुळा म्हणून लिहिलें. कित्येक लोकांना तें संग्राह्य वाटलें. नरेश मंत्री किंवा रवीन्द्र केळेकर यांच्यासारख्यांनीं तें मराठींत प्रसिद्ध व्हावें असा आग्रह धरला. श्री. सदानंद आणि रामदास भटकळ त्याला तयार झाले. तेव्हां वाटलें, जें क्षेत्र माझें नव्हे त्या क्षेत्रांत जर विहार करावयाचा तर साहित्यकलेचेंच ज्याला वरदान मिळालें आहे अशा एखाद्या कवीलाच पुरोवचन लिहायला का सांगूं नये ? देवाच्या कृपेनें मला उत्तमोत्तम कविमित्र मुबलक लाभले आहेत. आणि त्यांची खुशामत केल्यावांचून त्यांची मदत मिळूं शकते. अशा रीतीनें वडीलकी ही कृतार्थ होते.

श्री. मंगेश पाडगांवकर जसे कवि आहेत तसेच अध्यापक आणि विवेचकहि आहेत. त्यांनीं आपल्या तिन्ही कला वापरून या निबंधांचा पुरस्कार केला याचा मला परमसंतोष आहे.

वाचकांनादेखील थोडाफार संतोष मिळेल असा विश्वास आतां वाटूं लागला आहे.

— काका कालेलकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३७८६५७ वि. निबंध
क्रमांक ७५८० सं. वि. २७।२।६५

अनुक्रमणिका

संतोष	...	...	पांच
सुटलेलीं खेळकर पानें	...	...	१
जिवलगा अंधःकार	...	...	८
त्रिपथगामी खडखड-स्तोत्र		...	१६
मांजर	...	...	२१
निसर्गाचीं हंसरी मुलें	...	...	३२
माझें बालपण	...	...	३७
हातरुमाल	...	...	४१
एकाकी	...	...	४५
व्हरांडा-गीत	...	...	५२
चित्र-विचित्र	...	...	५८
पुष्पसाधना	...	...	६१
नर-भूषा तु दाढिका	...	...	६८
चूल	...	...	७३
मूर्तीचा संभव	...	...	७७
खेळकर पानें–एक अभ्यास : मंगेश पाडगांवकर			८१

क्रमांक ....१५८०.... दि. ....१७/३/५५....



सुटलेलीं खेळकर पानें

पतझड, पानखर, पानगळ वगैरे निरनिराळ्या नांवांनीं ओळखला जाणारा हा हेमंत ऋतु कोणाचें ध्यान खेंचीत नाहीं ? तारुण्य जेव्हां वार्धक्याला हंसत असतें तेव्हां वार्धक्य शांतपणें उत्तर देतें, " पीपळ पान खरंता हंसती कुपळिया । मुज वीती तुज वीतशे धीरी बापुडिया ॥" गळून पडणाऱ्या पिंपळाच्या पानांना जेव्हां नवीन येणारे कोंवळे अंकुर हंसूं लागले, तेव्हां तीं शुष्क पर्णे म्हणतात, " बापड्यांनो, जरा धीर धरा. जी आमची गत तीच यथाकाळीं तुमचीहि व्हायची आहे. "

पतझड ऋतु आला म्हणजेही पानें गळतात आणि झाडें सुकून मरून जाऊं लागलीं म्हणजे देखील पानें गळतात. यामुळें केव्हां केव्हां मनांत चिंता उत्पन्न होते कीं झाडांसाठीं हा काळ आला आहे का फक्त कायापालट होऊं लागला आहे ? " पतझड कहे या सूखना, कायापालट है या काल है । "

मार्गशीर्ष पौर्णिमेचे दिवस आहेत. आमच्या अंगणांत एकच कडूलिंबाचें झाड आहे आणि आजकाल तें अखंड आपलीं पानें सोडत आहे. सूर्य दक्षिणेचा असल्यामुळें झाडीची ती बाजू लवकर साफ झाली. वाराहि सध्यां दक्षिणेचाच आहे. त्यामुळें तीं सर्व पानें माझ्या समोरच्या भागांत येऊन पडतात.

हीं पानें पडत असतांना पाहून मनामध्यें विषादमय विचार आले पाहिजेत. पण तसें मुळींच होत नाहीं. पानें पाहिलीं म्हणजे नुसती गंमत वाटते. पडूं लागलीं म्हणजे इतकीं कांहीं पडतात कीं आकाशांत टोळधाड पसरावी तसें दृश्य दिसूं लागतें. या पानांना खालीं पडण्याची

मुळींच घाई दिसत नाहीं, आणि खालीं पडतांना गिरक्या तरी किती घेतात! मला जर कोणीं प्रसन्न हास्याचें चित्र काढावयास सांगितलें तर मी या गिरक्या खाणाऱ्या हंसत-खेळत, उडत-बागडत खालीं येणाऱ्या पानांचेंच चित्र काढीन.

बरें, जमिनीवर पडल्यानंतर तरी हीं पानें निश्चित पडून राहातात का? मुळींच नाहीं. लहान मुलांनीं धांवपळीचा आणि शिवाशिवीचा खेळ चालवावा त्याप्रमाणें हीं पानें येथून तेथें, तेथून येथें आणि केव्हां केव्हां वाटोळीं गरगर धांव घेतात. चारहि बाजूंना भिंती असल्यामुळें वरून खालीं उतरणारा वारा अंगणांत घोटाळूं लागतो आणि त्यामुळें या खोडकर पानांना त्याच्याशीं खेळावयाचें साधतें. केव्हां केव्हां उत्तरेकडील दरवाज्यांतून बाऱ्याची मोठी झुळूक आली म्हणजे बरींचशीं पानें हंसत खिदळत माझ्या बाजूस धांवत येतात. "मुलांनीं काय उच्छाद मांडला आहे!" असें म्हणून बापानें थोडासा रागाचा आव आणतांच "आले रे आले, बाबा आपल्याला धरायला आले. पळा, जीव घेऊन पळा." असें म्हणून मुलें ज्याप्रमाणें आईकडे धांव घेतात आणि "आई, बाबा पाहा कसे आम्हांला पकडूं पाहातात. मुळींच खेळूं देत नाहींत." अशी तक्रार करीत आईला मिठी मारतात त्याप्रमाणें दरवाज्याकडून धांवत येणारीं हीं पानें दिसतात.

झाडावर असलेल्या हिरवट पानांना हें दृश्य पाहून काय वाटत असेल? मरणाच्या भयानें जडमूढ झालेल्या माणसाप्रमाणें हीं पानें मुळींच विचार करीत नसतील. झाडापासून सुटलेलीं पानें जर हंसत गिरक्या घेत खालीं पडतात, तर ज्यांची सुटण्याची पाळी अजून आली नाहीं त्यांनीं दुःख काय म्हणून करावें? तुरुंगांतून सुटणाऱ्या सामान्य कैद्यांना कांहीं साथीदार पुढें गेल्यासुळें जसें वाटत असेल तसेंच या पानांना वाटत असलें पाहिजे. आपलीहि पाळी येईलच, आपलीहि सुटका होईलच, अशा उमेदीनें हीं पानें वाट पाहात असलीं पाहिजेत.

पण मला वाटतें, या पानांना कांहीं काळानंतर झाडाला फुटणाऱ्या नव्या पालवीसाठीं जागा मोकळी करून देण्याची उतावळ वाटत

असली पाहिजे. साप कात टाकून ज्याप्रमाणें तरुण होतो, त्याप्रमाणें जुनीं पानें टाकून देऊन झाडहि वसंताच्या स्वागतासाठीं पुन्हा तरुण होण्याची तयारी करीत असेल. यासुळेंच हीं पानें तुटतात किंवा गळतात असें माझ्यानें म्हणवत नाहीं. हीं पानें सुटून जातात. हातांत धरलेला एखादा पक्षी मूठ क्षणभर ढिली होतांच ज्याप्रमाणें आपल्या हातावर तुरी देऊन उडून जातो त्याचप्रमाणें हीं पानें भराभर सुटून जातात.

उन्हाच्या तापासुळें करपून राख झालेलीं वैरागी पानें पाहून मला कधीं प्रसन्न हास्याची कल्पना येणार नाहीं. पण या पानांचा रंग कसा कडब्यासारखा सोनेरी असतो. उन्हानें यांचा आकार वांकडातिकडा होतो खरा. पण त्याला उपमाच द्यावयाची झाली तर ती शेकलेल्या पापडाची दिली पाहिजे. हीं पानें कांहीं दुर्मुखलेलीं किंवा सुरकुतलेलीं मुळींच दिसत नाहींत. म्हणूनच यांच्या सळसळ आवाजाला मुक्तहास्य म्हणावेंसें वाटतें.

झाडावर असलेल्या पानांना कसें वाटतें याचा विचार करीत होतों, इतक्यांत 'बांबी' नांवाच्या एका मृगचरित्रामधील एक लहानसा पर्ण-युगुल-संवाद वाचायला मिळाला. दोन ऋषींनीं मरणोत्तर जीवनाची कल्पना करण्यासाठीं संवाद सुरू करावा तशासारखा हा संवाद आहे. पण वार्धक्याला भिऊन मी अजून कांहीं तसा म्हातारा झालों नाहीं अशी स्वतःची समजूत करून घेणाऱ्या आणि "छे हो! तुम्हांला कोण म्हातारें म्हणेल? तुम्ही तर टवटवीत आहांत! आणि जे कांहीं पांढरे केस तुरळकपणें दिसतात त्यामुळें तर तुमचें प्रौढ सौंदर्य अधिकच उठावदार दिसतें." असें एकमेकांना आश्वासन देणाऱ्या पाश्चात्य लोकांच्या स्वभावाची थोडीशी छटाहि या संवादांत आली आहे. संवाद बहारीचा आहे. पण तो वाचून देखील या कड्डलिंबाच्या पानांच्या गोड खेळामुळें आलेली प्रसन्नता थोडीच कमी होणार! प्रत्येक गळून पडणाऱ्या पानाबरोबर लवकरच उगवणाऱ्या नव्या पालवीचे अंकुर आतांच माझ्या मनःचक्षूला दिसूं लागले आहेत. हीं पानें वार्धक्याचीं प्रतिनिधि नसून नवतारुण्याचे अग्रदूतच असल्यासारखे दिसतात. या

पानांच्या तोंडावर तर कसलाच विषाद नाहीं. तेव्हां बघणाऱ्यांनीं आपला चेहरा सुतक्यासारखा करून या वेदान्ती पानांचा अपमान काय म्हणून करावा ?

आजवर पार सुकलेलीं पिवळीं पानेंच सुटत असत. पण दोन दिवस झाले, पावसाचे चारदोन थेंब पडूं लागले आहेत. परवां पहांटे पावसाची चांगलीच सर आली. त्यामुळें बरीचशीं कचीं पिवळीं पानें, हिरवीं–पिवळीं पानें गळून पडलीं. कांहीं हिरवीं पानेंहि धीर सुटून खालीं आलीं. त्यांतच मधून जोराचा वारा सुटल्यामुळें पडावें कीं न पडावें याचा निर्णय न करणाऱ्या पानांच्या बतीनें या वाऱ्यानें आपला ' कास्टिंग वोट ' दिला. आणि तींहि सर्व पानें अवतरलीं.

असा हा समयपूर्व झालेला अधःपात पाहून वाईट वाटावयास पाहिजे होतें. पण मला मुळींच वाईट वाटलें नाहीं. माझ्या मनांत नेहमीं एक प्रकारची उतावळ असते. कुणी पाहुणे यायचे असले म्हणजे ते लवकर कां येत नाहींत अशी मनांत उतावळ होते. मासिकें-देखील ठरल्या दिवशींच्या अगोदर येतील तर किती चांगलें असें तर नेहमींच वाटतें. ही झाली एक बाजू. दुसऱ्या बाजूनें, जाणारे पाहुणे जर जाणारच तर पुष्कळ दिवस जाण्याची चुटपुट कां लावतात, जाणारच तर लवकर जाऊं देत, असेंहि मला वाटत असतें. या पानांचें पडावयाचें ठरलेंच आहे; मग एकदम पडून कां घेत नाहींत ? पर्णहीन झाडाची सडसडीत मोकळी शोभा तरी पाहावयास मिळेल ! ज्या झाडावर एकहि पान उरलें नाहीं, जें वेडींवांकडीं बोटें घेऊन वेड्यासारखें उभें आहे आणि आकाशावर गालिच्याप्रमाणें एक चित्र रेखीत आहे त्याची शोभा ध्यानपूर्वक कधीं पाहिली आहे काय ? पानें नसलेल्या फांद्यांची जाळी खरोखरच सुंदर दिसते.

ही शोभा पाहाण्यासाठीं वर डोकें करून झाडाकडे पाहिलें; तेथें 'नग्न क्षपणक' दिसण्याऐवजीं तुरळक तुरळक एकजात हिरवीं पानें दिसल्यामुळें बरेंच आश्चर्य वाटलें. वाटलें कीं वसंतच आला आहे. झाडावर एकहि पिवळें किंवा अर्ध-पिवळें पान उरलें नाहीं. जून आणि

नीरस झालेलीं पानेंहि उरलीं नाहींत. वाऱ्याला भिणारीं पानेंदेखील उरलीं नाहींत. वारा कितीहि जोरानें आला तरीहि आम्हांला भीति नाहीं असा डौल आणणारीं आत्मविश्वासी तरुण पानें खूप नाचूं लागलीं आहेत, हें पाहून त्यांचें अभिनंदन करावेंसें वाटतें. हवा थोडीशी ओलसर असल्यामुळें हीं पानें दोनचार दिवस टिकावहि चांगलाच धरतील. पण मग? मग मात्र जोराचें ऊन पडेल. वाराहि जोरानें वाहूं लागेल. फांद्यांतून रसाचा ओलावा त्यांना मुळींच पोंचणार नाहीं व मग हीं सर्व पानें जोहाराची तयारी करून एकदमच खालीं पडतील. या सर्व पानांना विदाय दिल्यानंतरच झाडाच्या फांद्यांना नवनिर्मितीची प्रेरणा होईल. प्रत्येक फांदीला एक प्रकारच्या गुदगुल्या होऊं लागतील. "कुठें फुटूं! कुठें फुटूं!" म्हणून अंकुर सर्वत्र कोंडी फोडण्याच्या हुलकावण्या दाखवूं लागतील आणि मग ऊन, वारा, पाऊस, थंडी, कशालाच न बधणारी अशी खरी यौवनसृष्टि प्रगट होईल.

जुनी पालवी सर्व गेल्यानंतर झाडानें कांहीं दिवस पर्णविहीन नग्नता धारण करावी आणि थोडीबहुत तपस्या केल्यानंतर मगच त्याला नवी पालवी फुटावी अशी माझी इच्छा आणि अपेक्षा होती. पण हिंवाळ्याचें एकांगी ऊन आणि एककल्ली वारा यांनीं झाडाच्या दक्षिणेकडलीं पानें फार लवकर पाडलीं. त्यामुळें उत्तरेकडील आणि खालचा भाग मोकळा होण्यापूर्वीच दक्षिणी शाखांची तपस्या पुरी झाली आणि आतां हिरव्या रंगाच्या पातळ्या कोरींमध्यें कोंवळीं कोंवळीं लालगोम पानें खूप जोरानें फुटूं लागलीं आहेत. इंग्रजी कवींनीं 'new moon in the arms of the old moon' असें वर्णन केल्याप्रमाणें लिंबाची शोभा आज दिसत आहे. हिरव्या पालवीचे वृद्ध बाहू पसरलेले आहेत आणि त्यामध्यें नूतन ताम्रपर्णाचें गुबगुबीत बाळसेदार (chubby) बालक खेळूं लागलें आहे.

पानांचा हा रंग मला अगदीं लहानपणापासून आवडतो. आंब्याला कोंवळीं लाल पानें फुटूं लागलीं म्हणजे तीं तोंडांत धरून आम्ही 'पी...पी...' आवाज काढीत असूं. त्या पानांचा कषाय-मधुर गंध,

तुळतुळीत कोमल स्पर्श आणि त्यांतून निघणारा अजशावकांचा आवाज या सर्व गोष्टींचें एकाएकीं स्मरण झालें आणि लहानपणच्या भटक्या दुपारीं पुनः ताज्या झाल्या. पण लाखी रंगाचीं हीं कोंवळीं पानें पाहून मला दोन भारतीय समर्थ कवींचें स्मरण होतें आणि त्यांनाहि माझे-प्रमाणेंच हीं ताम्रपर्णें आकर्षक वाटलीं होतीं, हें जाणून अगदीं पोकळ का असेना पण खराखुरा अभिमान वाटतो. महाकवि बाणभट्टानें या पानांचें वर्णन अगदीं मनापासून केलें आहे आणि बाणाच्या या वर्णनाकडे आपलें लक्ष खेंचण्याची आवश्यकता रविबाबूंनीं 'प्राचीन साहित्य' या आपल्या निबंधमालेंत ग्रथिली आहे. या एवढ्या द्विविध स्मरणामुळें देखील या कोंवळ्या पानांविषयीं मला कृतज्ञता वाटणें शक्य होतें. पण त्यांनीं मला बघतां बघतां माझ्या लहानपणच्या 'पी...पी' युगामध्यें पोंचविलें. यामुळें तर हीं पानें माझीं संवगडीच झालीं आहेत. त्यांना हें नूतन वर्ष खूप आनंदाचें होवो.

आठदहा दिवस गेले आणि आतां झाडाच्या वरच्या बाजूला गडद तांबट रंग आणि खालच्या बाजूला शेवाळासारखा हिरवा रंग अशी शोभा, त्यावर पडणाऱ्या उन्हामुळें, चकाकूं लागली आहे. दक्षिणे-कडच्या भिंतीच्या छायेंत बसून किती तरी मिनिटें हें सौंदर्य मी पाहात आहें. अकबरचा रोजा पाहिला होता. त्याची आठवण होते. अगदीं खालचे मजले लाल दगडाचे, त्याचेवरचे संगमरवरी आणि सर्वांत वर पिवळ्या रंगाचे जणुं कळस. ही शोभा फारच आकर्षक वाटली होती. आज येथें गलितपर्ण वृद्ध वृक्षावर उरलींसुरलेलीं टवटवीत हिरवीं पानें आणि त्यांचेवर नवीन उगवणाऱ्या तटतटीत ताम्र अंकुरांचे भाले सूर्यानें कसे उज्ज्वल केले आहेत. उज्ज्वल म्हणण्यापेक्षां जिवंत केले आहेत असेंच म्हटलें पाहिजे. रत्नें पाहून जसा आनंद होतो किंवा धातूचीं पात्रें पाहून जसा आल्हाद वाटतो तसेंच या हिरव्या-तांबड्या पानांचें लावण्य पाहून मला प्रसन्नतेच्या उकळ्या फुटूं लागल्या.

आणखी कांहीं दिवस गेले. आतां पानांच्या दोन्ही थरांनीं नवाच खेळ आरंभला आहे. तांबड्या पानांनीं हिरव्या रंगाची छटा धारण

करण्यास सुरवात केली आहे आणि खालच्या हिरव्या पानांनीं सोनेरी रंग आपल्याला आतां येतो किंवा नाहीं हें पाहाण्याचा प्रयोग चालविला आहे. वरतीं आणि खालीं दोन्हीकडे हिरवा रंग समान आहे. यामुळें तो तांब्या-सोन्यामधील उभयान्वयी रंग जास्तीच खुलूं लागला. तांब-ड्याच्या तुलनेनें हिरव्यांत एक खुमारी येई तर पिवळ्याच्या शेजारीं त्याच हिरव्यांत प्रौढ मार्दव व्यक्त होई. त्या तिन्ही रंगांच्या या फूल-गुंथणीमुळें सर्व झाडांवर घरंदाज वैभवाची छटा दिसत असलेली पाहून डोळ्यांना आणि मनाला स्वास्थ्य आणि संतोष वाटूं लागला. एखाद्या प्राचीन घराण्यांतील पुरुषार्थी पिढीचा जीवनक्रम पाहातांना आणि ट्रेस करतांना (हुडकून काढतांना) ज्या प्रकारचा अनुभवानंद मिळतो त्याच प्रकारचा आनंद या ऋतूंतील या वृक्षपर्णांनीं दिला आहे.

हिरव्यांत तांबडा रंग मिसळला—मिसळला नाहीं, विणला गेला म्हणजे अंजिरी रंग होतो हें खरें. पण तांबड्यांत थोडीशी हिरवी छटा आली म्हणजे तो रंग तितकासा खुलत नाहीं. हिरव्या रंगानें जीव धरला, तो मी म्हणून पुढें आला, म्हणजे तांबडाहि अमर्षानें जास्त लाल होतो आणि या दोघांच्या चढाओढींत अंजिरी रंग आपल्या सोळा कळा पूर्णपणें दाखवितो. आणि मग जर या चढाओढीला टवटवीचा आणि चकाकीचा आशीर्वाद मिळाला म्हणजे तर कांहीं पुसूंच नये. असा कांहीं बहार येतो कीं आनंदानें हृदय दबलें जातें आणि या शोभेचें आतां काय करूं, याला कुठें सांठवून ठेऊं, असें होऊन जातें. इतर कांहींच न सुचलें म्हणजे देवानें वाणी दिली आहे हें आठवून आपण त्याचें कीर्तन करीत सुटतों. त्याचें म्हणजे कोणाचें? त्या रंगाचें कीं वाचा-शक्ति देणाऱ्या रंगनाथाचें? मी म्हणत होतों रंगाचें कीर्तन. पण दिसून आलें कीं कोणाच्याहि सुंदर कृतीनें वेडावून गेल्यानंतर आपण तिचें जें कीर्तन करतों त्यांतच भगवंताचेंहि कीर्तन येऊन जातें. ■

[शिवनी जेलमधील ता. २३.२.१९४२ ते ता. १४.१.१९४३ या दरम्यानच्या वासरी (दैनंदिनी) मधून.]

जिवलग अंध:कार

गोव्याची राजधानी पणजी येथें एकदां माझें व्याख्यान होतें. जागा लहान आणि श्रोते पुष्कळ अशी स्थिति असूनहि सभेंत गडबड नव्हती. माझें भाषण साहित्याविषयीं होतें. लोक एकाग्रतेनें ऐकत होते. इतक्यांत विजेचा प्रवाह तुटला आणि दिवाणखान्यांत अगदीं अमावास्ये-सारखा अंधार झाला. पेट्रोमॅक्स आणावा म्हणून कोणी धावले, कोणीं दुसरी कांहीं सूचना केली. थोडा वेळ थांबून मीं सुचवलें, "मित्रहो, दिव्याची जरूर काय? तुम्हीं मला पाहिलें आहे, मीं तुम्हांला पाहिलें आहे. आपल्या विषयांत आपण रंगलों आहोंत. प्रत्येक जण आपापल्या जागीं आरामानें बसला आहे. कित्येक उभे आहेत. आपण अंधारांतच व्याख्यान पुढें कां चालवूं नये? व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरी चालवण्याचा माझा रिवाज आहे. ही प्रश्नोत्तरी देखील एकमेकांचे चेहरे पाहिल्या-वांचून चालवतां येईल. चेहऱ्यावरील भाव जरी न दिसले तरी आवाजा-वरून एकमेकांची वृत्ति आणि म्हणण्यांतील खोचहि ध्यानांत येऊं शकते."

माझी ही खूपमिजाजी श्रोत्यांना पसंत पडली आणि सगळे शांत होऊन एकाग्रतेनें ऐकूं लागले आणि खरोखरच त्या दिवशींचें व्याख्यान आणि नंतरची प्रश्नोत्तरी आकर्षक आणि जिवंत होऊं शकली. सभेचें काम संपलें आणि अगदीं आभार मानण्याच्या वेताला कोणी तरी एक मेणबत्ती घेऊन आलें. मेणबत्तीच्या मागोमाग स्वतःची भडक जाहिरात करणारा पेट्रोमॅक्सहि आला. त्यानें लोकांचे डोळे दिपवले. त्याच्या वतीनें एवढें कबूल केलें पाहिजे कीं, त्याच्या प्रकाशामुळें सभेंतून परतणाऱ्या लोकांना आपापले जोडे शोधणें सोपें गेलें!

अनुक्रम ३७१२७ वि: ...
क्रमांक ...२५८० नों दि: ...

एका लहानशा प्रसंगाचें इतकें विस्तारानें वर्णन करावयास नको होतें. पण त्या समेंत मला एक नवीनच अनुभव आला. अंधारामध्यें वक्ता आणि श्रोते यांच्यामध्यें एकतानता अधिक चांगल्या प्रकारें स्थापित होऊं शकली. इतके आतुर लोक एकाग्रतेनें ऐकत आहेत, मोठे मार्मिक प्रश्न विचारीत आहेत, उत्तर समर्पक वाटेल तेव्हां त्याची कदरहि करीत आहेत, आणि इतकें असून कोणाचा चेहरा कोणाला दिसत नाहीं आणि याचमुळें जणुं आम्ही सर्व जिवलग मित्र बनलों. एकमेकांना पाहातां येत नाहीं या अडचणीमुळें सर्वांना सर्वांविषयीं सहानुभूति वाटूं लागली होती आणि या अंधाराच्या अडचणीची भरपाई करण्यासाठीं सगळेच आपल्याकडून भलेपणा, सज्जनता आणि आपुलकी यांचें भांडवल मुबलकपणें वापरीत होते. मला वाटलें, अंधारानें एका परीनें उपकारच केला आहे. अंधाराच्या या विशेष शक्तीकडे माझें लक्ष प्रथमच गेलें.

एकदां बिहार प्रांतांत संथाळ लोकांची परिस्थिति पाहण्यासाठीं आम्ही मोटारनें हिंडत होतों. संध्याकाळच्या सुमारास एका गांवीं जाऊन पोहोंचलों. शाळेच्या रिकाम्या इमारतींत आम्हीं बसून गांवच्या लोकांशीं वार्तालाप सुरू केला. हळूहळू प्रकाश कमी होऊन दिसेनासें झालें. तेथल्या एका गृहस्थाला मी म्हणालों, "अंधार होत आला आहे. दिवा घेऊन याल तर बरें."

आश्चर्यानें मजकडे पाहात तो म्हणाला, "दिवा! या गांवांत दिवा कोठून मिळावयाचा? उभ्या गांवांत एकच दिवा असतो आणि तो दिक्कूच्या दरवाजासमोर आहे. येथील आम्ही लोक दिवा कधींच वापरीत नाहीं. सूर्य मावळला म्हणजे आमच्या प्रवृत्ति ओसरतात. सकाळीं पहाट झाली म्हणजे आम्ही पुन्हां कामाला लागतों."

१९२३ सालीं जेलमध्यें असतांना संध्याकाळीं आम्हांला खोलींत कोंडीत आणि सकाळीं सहाच्या नंतर बाहेर काढीत. खोलींत कधीं दिवा नसे. त्या दिवसांची मला आठवण झाली. पण तेथें कैदी पळून गेला नाहीं, जागेवरच आहे, याची खात्री करून घेण्यासाठीं पोलिस लोक कंदील घेऊन दरवाजाच्या लोखंडी गजांतून आमच्याकडे पाहात.

त्यामुळें क्षणभर दिव्याचें दर्शन होत असे. येथें सबंध खेडेगांवांत एकच दिवा. बाकी सर्वत्र पशुपक्ष्यांसारखें जीवन.

मीं विचारलें, "दिक्कू म्हणजे कोण?"

ते म्हणाले, "या प्रदेशांत आम्ही सर्व संथाळ लोक असतों. आमच्यामध्यें एखादा मारवाडी किंवा कोणीहि गैरसंथाळी मनुष्य येऊन राहतो, त्याला आमच्या भाषेंत दिक्कू म्हणतात. दिक्कू म्हणजे परकी."

या गांवांत जसा एकच दिवा होता तसा दिक्कूहि एकच होता. त्याच्याहि घरांत दिवा नव्हता. फक्त घराच्या बाहेर दरवाजाजवळ एक घासलेटाचा दिवा पेटलेला होता.

मनुष्यवस्तींत अंधाराचें हें साम्राज्य पाहून मी पुष्कळ विचारांत पडलों. या लोकांना त्याचें कांहींच वाटत नाहीं. रात्रीं अंधार असावयाचाच. त्याचें दुःख मानावयाचें असतें हेंहि या लोकांच्या डोक्यांत उगवलेलें नव्हतें. भरतभूमि, भारतीय जीवन, भारतीय संस्कृति यांविषयीं नेहमीं बोलत असणारा मी, मला या दीपविहीन जीवनाची आजवर कल्पनाहि नव्हती. हिंदुस्थानांत असाहि एक दीपशून्य भूमिभाग आहे हें मला प्रथमच कळून आलें. थोडा विचार करतां मला वाटलें कीं या लोकांची कींव करण्याअगोदर मीं स्वतःचीच कींव केली पाहिजे.

एक ऐकलेली गोष्ट आहे. एका श्रीमंताच्या घरीं एक मूल अतिशय नाजुक मनाचें होतें. घरांत रात्र होण्यापूर्वीच दिवे पेटत; पण भिंतीवर स्वतःची आणि आपल्या भावंडांची छाया पाहून तें मूल घाबरत असे. त्याला छायेचें स्वरूप समजावून सांगण्याच्या ऐवजीं श्रीमंत बापानें प्रत्येक खोलींत दोन-दोन, तीन-तीन दिवे ठेवण्याची व्यवस्था केली होती. उद्देश असा कीं उठावदार छाया अशी कुठेंच पडूं नये. मूल झोंपीं जाईपर्यंत दिवे मालवले जात नसत. मुलाला उजाडण्याच्या पूर्वी झोंपेंतून उठण्याची संवय नव्हती.

एका रात्रीं मूल मध्येंच जागें झालें. चारहि बाजूंना अंधारच पाहून आणि अंथरुणांत जवळ आई किंवा कोणीच नाहीं असें पाहून त्यानें

किंकाळी फोडली आणि खोलींत कुणी दिवा आणीतोंपर्यंत मुलानें भयानें प्राण सोडला. प्रत्यक्ष घडलेली गोष्ट म्हणून त्या काळीं ही गोष्ट मीं ऐकली होती.

अंधाराचें भय भुताच्या भयाइतकेंच भयानक असूं शकतें, याची कल्पना येऊन मी अस्वस्थ झालों होतों. त्या वेळीं माझें वयहि फारसें मोठें नव्हतें. पण आम्हांला अंधाराची संवय होती. अनोळख्या जागीं अंधारांत जाण्याची भीति वाटे हें खरें. पण स्वतःची छाया पाहून भीति वाटण्याइतके अजाण आम्ही मुळींच नव्हतों. उलट दिव्यासमोर बोटें धरून भिंतीवर छायेचीं हरणें करण्याची आणि हरणाचीं शिंगें लढवण्याची आम्हांला मौज वाटे.

अंधकाराचें थोडेंसें मनन करण्यापूर्वी अंधकाराविषयींचे थोडे उठावदार अनुभव नमूद करणें इष्ट वाटलें. ज्या दिवशीं उपनिषदांतील प्रार्थना वाचली, "तमसो मा ज्योतिर्गमय" ("मला अंधारांतून प्रकाशाकडे घेऊन जा") तेव्हां अंधकार आणि प्रकाश परस्परभिन्न अशीं जीवनतत्त्वें आहेत, हें ध्यानांत येऊन प्रकाशाविषयींची भक्ति दुणावली. पण त्याबरोबर अंधकारहि एक व्यापक, जवळजवळ सार्वभौम तत्त्व आहे, याची कल्पना स्पष्ट झाल्यामुळें अंधकाराचें देखील महत्त्व पटलें. आध्यात्मिक दृष्टीनें आपण अज्ञानाला अंधकार म्हणतों. समस्त जीवनाचा विचार करतां जगांतील अंधार आणि हृदयाकाशांतील अज्ञान हीं भिन्न नाहींत, एकच आहेत, असें त्या वेळीं वाटलें.

पुढें एकदां एका घरांत कुटुंबावर दारुण प्रसंग ओढवला असतां आणि घरांतील सर्व मोठी मंडळी शोकांत बुडून गेली असतां मुलें मात्र हंसतखेळत होतीं आणि मधूनमधून आईला त्रासहि देत होतीं. असें पाहून मनांत विचार आला — ईश्वराची केवढी मोठी कृपा कीं, या अर्भकांना कुटुंबावर ओढवलेल्या संकटाची कल्पनाच होऊं शकत नाहीं. जर त्यांना खऱ्या परिस्थितीची कल्पना होऊं शकती तर त्यांच्या कोवळ्या मनावर भयंकर आघात होऊन त्यांनीं प्राणच सोडला असता. कोंबड्याच्या पिलांचा आकार तयार होण्यापूर्वी ज्याप्रमाणें त्यांना अंड्याच्या

कवचाचें रक्षण असतें त्याप्रमाणें मन खंबीर होईतोंपर्यंत मुलांना ईश्वरानें हें अज्ञानाचें कवच दिलें आहे. ही त्याची मोठी कृपाच होय.

जगांत सारवस्तू काय आहे आणि असार काय आहे, याचें ज्ञान जर जगांतल्या सर्व माणसांना एकाच वेळीं एकसारखें होईल तर जगाची रहाटीच थांबून जाईल. मनुष्य असाराला सार समजून चालतो, म्हणूनच त्याला जगण्यांत गोडी वाटते आणि मोठ्या हिरिरीनें तो जगत असतो आणि कर्में करीत असतो. आणि हीं सर्वच कर्में चांगलीं असतात असेंहि नाहीं. माणसें जन्मभर एकमेकांचा द्वेष करतात, राष्ट्रें पिढ्यान् पिढ्या वैर चालवतात आणि महायुद्धें करून संहाराचा महोत्सव करतात—हे सर्व मुळांत अज्ञानाचेंच चाळे आहेत म्हणून मानवानें प्राचीन काळापासून प्रार्थना चालवली आहे—

"तमसो मा ज्योतिर्गमय।"

जेव्हां आपण तत्त्वदर्शी होऊन अथवा तत्त्वजिज्ञासू बनून जीवनाचा विचार करतों तेव्हां जीवन आणि मृत्यु हीं दोन्ही परस्परपूरक, परस्परपोषक आणि सारखींच आवश्यक तत्त्वें आहेत, असें आपल्या नजरेस येतें.

अज्ञान आणि ज्ञान यांचें मात्र तसें नाहीं. अंधकार आणि प्रकाश यांचेंहि तसें नाहीं. अज्ञान म्हणजे कमी ज्ञान, अपुरें ज्ञान, अंधुक ज्ञान, भ्रमयुक्त ज्ञान, भ्रमाची भेसळ असलेलें ज्ञान—असा अज्ञानाचा अर्थ होतो. अंधकार म्हणजे देखील कमी प्रकाश, अपुरा प्रकाश असाच अर्थ केला पाहिजे. रात्रीं जेथें आपल्याला दिसत नाहीं तेथें मांजराला दिसतें. तें नेमकें उंदरावर झडप घालतें. तेव्हां आपल्याला जो अपुरा प्रकाश आहे तो मांजराला पुरेसा असतो. उलट दिवसाचा प्रकाश मांजराला (आणि वाघाला देखील) आवश्यकतेपेक्षां अधिक असल्यामुळें त्याच्या डोळ्यांचीं बुबुळें किलकिलीं व्हावीं, अशी निसर्गाची व्यवस्था आहे. कॅमेऱ्याच्या डोळ्याचें भोंक ज्याप्रमाणें लहानमोठें करतां येतें त्याप्रमाणें कांहीं प्राण्यांना स्वतःच्या डोळ्यांची 'डायफ्रेम' प्रकाशाच्या मानानें कमीजास्त करतां येते. तसें होऊं

शकलें नाहीं तर त्या प्राण्यांना अतिप्रकाशाचा अंधार अथवा आंधळेपणा सहन करावा लागतो. म्हणूनच तर घुबडाला दिवाभीत अथवा दिवांध म्हणतात.

आवाजाचें देखील असेंच आहे. आवाजाचीं आंदोलनें, 'व्हायब्रेशन्स' असतात. दर सेकंदाला अमुक आंदोलनांहून कमी झालीं तर आवाज ऐकूं येत नाहीं. चार हजार किंवा दहा हजार आंदोलनांहून अधिक आंदोलनें एका सेकंदांत होऊं लागलीं तर तोहि आवाज एकदम गप्प होतो.

अंधाराचेंहि असेंच कशावरून नसेल? गीतेंत तर म्हटलें आहे—

या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥

अध्यात्माच्या क्षेत्रांत भगवान शिव परमज्ञानी योगेश्वर असतो. व्यवहाराच्या बाबतींत त्याचें मठ्ठ डोकें चालतच नाहीं, असें पुराणकार सांगतात. मनुष्याचें ज्ञानसप्तक आणि महादेवाचें ज्ञानसप्तक हीं निराळीं असलीं पाहिजेत. मनुष्याला आपल्या गळ्यांतून फार फार तर 'सा रे ग म प ध नी सा' चीं तीनच सप्तकें काढतां येतात. मंद्राहून त्याला खालीं जातां येत नाहीं, तारसप्तकाच्या वर त्याला जातां येत नाहीं. ही झाली गळ्याची गोष्ट. कानाच्या बाबतींत देखील अशाच दोन्ही बाजूंच्या मर्यादा आहेत.

आतां आपण काळोखाकडे पुनः येऊं. मीं एकदां कांहीं अंशीं गमतीनें कांहीं अंशीं तात्त्विक वृत्तीनें लिहिलें होतें: ज्या स्थितींत कमी दिसतें तिला जर अंधार म्हणावयाचें आणि अधिक दिसतें त्या स्थितीला प्रकाश म्हणावयाचें तर दिवसा चक्क अंधार पडलेला असतो म्हणून आपल्याला पृथ्वी आणि सूर्य हे दोनच खगोल दिसतात. रात्रीं कृष्णप्रकाश पसरतो म्हणून आपल्याला आकाशांत लक्षावधि खगोल दिसतात. त्यांना आपण तारे, नक्षत्रें आणि तारकापुंज म्हणतों. दुर्बिणीच्या साहाय्यानें आपण हा कृष्णप्रकाश बहुगुणा करतों म्हणून आपल्याला सूक्ष्मातिसूक्ष्म आकाशस्थ ज्योति दिसूं शकतात. दिवसाचा ढवळा अंधकार इष्ट समजावा

कीं रात्रीचा विश्वव्यापी कृष्णप्रकाश परमसखा मानावा ? — हें विचार करूनच ठरवलें पाहिजे.

शांतिनिकेतनमध्यें महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर रात्रीच्या प्रार्थनेच्या वेळीं दिवे काढून टाकीत. रवींद्रनाथांनीं तीच परंपरा पुढें चालवली. शांतिनिकेतनमधील हा प्रघात गांधीजींना इतका आवडला कीं, त्यांनीं देखील रात्रीच्या आणि पहाटेच्या प्रार्थनेच्या वेळीं दिवे काढून टाकण्याचा परिपाठ चालवला.

कित्येक योगी संध्याकाळीं प्रकाश क्षीण होऊन जेव्हां अंधार सुरू होतो तेव्हां ध्यानाला बसण्याचें पसंत करतात. कारण अंधार एकाग्रतेला, अंतर्मुख वृत्तीला विशेष पोषक असतो. रात्रीं आकाशांत असंख्य तारे चकाकतात. जेव्हां चांदणें असतें तेव्हां फक्त ठळक तारेच दिसतात आणि चंद्राचा प्रकाश सौम्यपणें आकाशाला नि पृथ्वीला काव्याचें रूप देतो. इतकें हें आकर्षण असून देखील रात्रीची वेळ इतकी सौम्य आणि शांत असते कीं, अंतर्मुख होऊन ध्यान करण्याला बाहेरची परिस्थिति मुळींच बाधक होत नाहीं.

आजकालचे विजेचे दिवे मात्र जिकडे तिकडे अंधाराचा निर्दय संहार करतात आणि मनामध्यें उपशम जमत असला तरी त्याला हांकून लावून त्याच्या ऐवजीं उत्तेजना उत्पन्न करतात. या प्रकाशानें जर नुसता रात्रीचा दिवस होता तर फारशी तक्रारीला जागा नव्हती. पण हे उत्तेजनेचे प्रकार दिवसा होणारें कामहि करूं देत नाहींत आणि रात्रीची विश्रांति किंवा विश्रब्ध वार्तालापहि करूं देत नाहींत. यांचा प्रकाश म्हणजे केवळ उत्तेजना आणि कृत्रिमता. यामुळें न करण्याचीं कामें करावयास मनुष्य उद्युक्त होतो. कोणताहि शुद्ध निर्णय करणें अशा वेळीं जवळजवळ अशक्य असतें.

अशा परिस्थितींत देखील जे राष्ट्रनायक आणि राजदूत महत्त्वाच्या व जबाबदार आंतरराष्ट्रीय घडामोडी करतात त्यांना खरोखर योगीच म्हटलें पाहिजे. किंवा विषांतील किड्याला विष बाधत नाहीं असें म्हणतात, तसा हा प्रकार असावा.

आणि ज्या आंतरराष्ट्रीय घडामोडी आज जगभर चालतात त्यांमध्यें योग्यांची साम्यबुद्धि असतेच असें तरी कोणी म्हणावें ? जगभर तऱ्हे-

तऱ्हेच्या उत्तेजनांचा धुमाकूळ चालू आहे आणि अशा वातावरणांत सगळ्या घडामोडी होतात. तेव्हां हा सगळा कृत्रिम प्रकाश मनुष्यजातीच्या कल्याणाला पोषकच आहे असें म्हणवत नाहीं.

देवा, आम्हांला असल्या उत्तेजनक प्रकाशांतून शांतिदायक अंधाराकडे घेऊन जा, अशी प्रार्थना करण्याचे दिवस खात्रीनें आले आहेत. प्राकृतिक प्रकाशांत माणुसकी असते. प्राकृतिक अंधारांत आपुलकी असते आणि चिंतनाला अवकाशहि मिळतो. कुदरती प्रकाश आणि कुदरती अंधकार दोन्ही ईश्वरदत्त प्रसाद आहेत. दोन्हींमध्यें मनुष्याचें व्यक्तित्व निवळतें आणि विकास पावतें. त्यांतल्या त्यांत प्रकाश हा प्रवृत्तिपरायण असल्यामुळें गोंधळ उत्पन्न करूं शकतो. अंधकारांत आत्मपरीक्षणाला वाव असतो आणि म्हणून तो साधनेला विशेष अनुकूल आहे.

अंधकाराला भावात्मक म्हणा किंवा अभावात्मक म्हणा, अंधार ही मनुष्याच्या मनाला, हृदयाला आणि आत्म्याला पोषक अशी वस्तु आहे. पुष्कळसे पाश तोडून मोकळीक देणारी हितकर वस्तु आहे. सबंध रात्र खोलींत प्रकाश ठेवण्याची सोय असून देखील निजणारा मनुष्य अंधकाराचें पांघरूण पसंत करतो. दिवसा निजणारा मनुष्य देखील प्रकाश कमी करूनच झोंपतो. झोंप ही ज्याप्रमाणें थकलेल्या मनुष्याला आराम देऊन ताजा करते, त्याचप्रमाणें अंधार देखील थकवा दूर करून तकवा उत्पन्न करतो. आणि म्हणूनच मनुष्य अंधारांत जाऊन बसला म्हणजे त्याला नव्या नव्या कल्पना सुचतात. गोंधळलेल्या मनुष्याला संकटांतून मुक्त होण्याचा मार्ग सुचतो आणि निराश मनुष्याला आशेचा खुराक मिळतो. माझा तर असा स्पष्ट अभिप्राय आहे कीं, जगांत जर अंधार नसता तर आज होतात त्याहून माणसांत जास्त आत्महत्या झाल्या असत्या. अंधाराच्या शांत वातावरणांत उत्तेजित मन स्थिर होतें; दुसऱ्या बाजूचा विचार करूं लागतें; अंतर्मुख होऊन आत्मप्रवण होऊं शकतें आणि इहलोकाबरोबर परलोकाचा विचार होऊन मनुष्यामध्यें दिव्य दृष्टीचा उदय होऊं शकतो. अंधाराजवळ ऐसपैस जागा असल्यामुळें अडचण उत्पन्न न करतां तो मनुष्यांना जवळ आणतो. ■

त्रिपथगामी खडखड-स्तोत्र

वाचक हो ! वरील ओबडधोबड मथळा वाचून विरस होऊं नका !

गाड्यांत बसून किंवा निजून खडकाळ रस्त्याचा प्रवास कधीं तुम्हीं केला आहे का ? सगळीं हाडें अशीं घुसळून निघतात आणि खिळखिळीं होतात कीं वाटतें, यापेक्षां पायीं प्रवास केलेला बरा. केव्हां केव्हां आश्चर्य वाटतें कीं गाड्याचीं चाकें खिळखिळीं होऊन कोल्मडून कशीं पडत नाहींत ? खेडेगांवांतील सुताराची हेटाळणी करणाऱ्या शहरी सुतारांनीं असलीं मजबूत चाकें तयार करून दाखवावींत.

लहानपणीं आम्हीं असले प्रवास पुष्कळ केले होते. आतां खेडेगांवांत जाण्याची संधीच कमी येते. खेड्याजवळून जाणारे रस्ते देखील पूर्वीपेक्षां किती तरी सुधारले आहेत. त्यामुळें प्रवासाच्या शेवटीं हाडांची डागडुजी करणारा हाडवैद्य शोधावा लागत नाहीं हें खरें, पण हल्लीच्या माणसांचीं हाडें देखील पूर्वीसारखीं जोमदार आणि पीळदार राहिलीं नाहींत. मोटारीच्या लांबच्या प्रवासांत जर रस्ता चांगला नसला तर खडखड ही व्हावयाचीच आणि ती खडखड तासाभरांत हाडापर्यंत पोहोंचायचीच.

पण जर कुठेंहि चांगला सरळ सुरळीत रस्ता भेटला तर आपण आनंदानें फुलून जाऊन म्हणतों, रस्त्यावरून आमची मोटार अशी बेमालूम सुरळीत चाल्ली कीं जणुं काय संथ पाण्यावरून होडीच चालावी.

पाण्यावरून होडीच्या प्रवासाची उपमा कुणीं दिली म्हणजे मला खरोखर गोव्यांतील आणि केरळमधील होडीच्या प्रवासाची आठवण झाली पाहिजे. पण मला आठवण होते काश्मीरच्या श्रीनगरची. कारण त्या शहरांत शहरी रस्तेच आहेत पाण्याचे. झेल्म नदी काश्मीरमध्यें वाहतेच

अगोदर संथपणें. या नदीच्या दोन्ही बाजूंनीं कालव्यासारख्या शाखा खोदून काढल्या आहेत आणि हे कालवेच श्रीनगरमधील मुख्य रस्ते. शहरांत ज्याप्रमाणें आपण टांग्यांत बसून जातों त्याप्रमाणें श्रीनगरमध्यें तीरासारख्या लांब चिंचोळ्या शिकाऱ्यांत बसून लोक एका पेठेंतून दुसऱ्या पेठेंत, एका आळींतून दुसऱ्या आळींत जातात आणि सुख हें कीं रस्त्यावरील रहदारी कितीहि गजबजली तरी आवाज असा होत नाहीं. सगळ्या होड्या अगदीं मुळूमुळू धावतात.

सिंधमधील मंचरसारख्या विशाल सरोवरांत मनसोक्त नौकाविहार केल्याचें स्मरण कां होणार नाहीं ? आणि उत्तर जपानमध्यें होक्कायडो द्वीपामधील सरोवरांचीहि आठवण होते. पण आज लिहायला बसलों आहें तें सरोवरसुखाचें वर्णन करण्यासाठीं नाहीं, तर अमेरिकेंतील एका खोल, शांत, सुंदर सरोवरांतील खडखडणाऱ्या नौकाविहारासंबंधानें.

कॉर्नेल (इथका) येथें तत्त्वज्ञानपंडित अध्यापक बर्ट यांना भेटायला गेलों होतों. पहिल्या दिवशीं त्यांनीं आम्हांला एक सुंदर धबधबा आणि सुंदर सरोवर दाखविण्याचा कार्यक्रम रचला होता. सरोवराच्या कांठीं शेकडों कुटुंबें जत्रेसाठीं आलीं होतीं. किती तरी स्त्रीपुरुष कमींत कमी कपडे घालून शरीराची कातडी कमावण्यासाठीं उन्हांत लोळत होते. मुलें किनाऱ्यावर धुडगूस घालीत होतीं. कित्येक लोक पाण्यांत पोहत होते आणि ठिकठिकाणीं आबालवृद्ध एकत्र बसून उदरपूजा करीत होते. कित्येकांना गायला होत होतें आणि कित्येक जण येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे टक लावून पाहण्याची मौज मिळवीत होते.

आम्हांला वाटलें कीं यंत्राच्या जोरावर चालणाऱ्या होडींत बसून सरोविहार करावा आणि वेगाचा अनुभव मिळवावा. मला वाटतें, आमच्या होडीनें ताशीं चाळीस मैलांची झडप पसंत केली असावी.

आम्ही रंगांत आलों. होडी वेगांत आली आणि एकाएकीं खडखड सुरू झाली. प्रथम वाटलें, या भागांतील पाणी उथळ असेल आणि खालीं लहान लहान दगड असतील. होडी त्यांना घासून गेल्यामुळें हा सगळा आवाज होत आहे आणि असे धक्के बसत आहेत. पण नाहीं,

तसें कांहीं नव्हतें. पाणी खोल होतें — स्वच्छ आणि शांत होतें;— खालील तळ न दिसावा इतकें खोल होतें. पण आमच्या होडीनें इतक्या वेगानें पाणी नांगरलेलें सरोवराला सहन होईना आणि तेवढ्याच कारणानें खडखड सुरू झाली. आम्हांला आमचें होडींतील आसन सांभाळण्यांत श्रम पडूं लागले. शरीराचे सगळे सांधे आपली नाराजी व्यक्त करूं लागले. हाडांना वाटलें कीं आपणहि खडखड कां करूं नये? हाडांचा अगदीं खुळखुळा झाल्यासारखें वाटलें!

एकदा वाटलें, नाविकाला सांगावें कीं ही खडखड असह्य आहे. होडी जरा हळू चालीव. पण परदेशांत अशी हार खाण्याला मन तयार होईना. इतके लोक निरनिराळ्या होड्यांतून धूम धावत आहेत, तेथें आपणच कसें म्हणावें, कीं ही खडखडी गति सहन होत नाहीं? मनानें ठरविलें कीं जे हाल होतील ते अर्धापाऊण तासच होतील. पण स्वदेशीं गेल्यानंतर फुशारकी मारायला होईल कीं खडक नसलेल्या खडकाळ पाण्यांत आम्हीं नौकाविहार केला!

त्या दिवशीं या नव्या अनुभवाची अद्‌भुतता वर्णन करण्यांतच वेळ गेला. दुसऱ्या दिवशीं आमचे यजमान आणि त्यांच्या पत्नी, दोहोंनीं आपल्या मोटारींतून आम्हांला अमेरिकेंतील खेड्यापाड्यांतून जाणाऱ्या रस्त्यांची मुशाफरी करवून नायगाऱ्याच्या प्रचंड धबधब्याचें दर्शन करविलें. त्या दिवशीं आम्ही बऱ्याचशा पायऱ्या उतरून एका वाफरांत बसून धबधब्याच्या जवळजवळ पायथ्याशीं पोहोंचलों. धबधब्याच्या तुषारांनीं आम्ही ओलेचिंब होऊं नये म्हणून वाफरवाल्यांनीं दरेकाला एक बरसाती डगला घालायला दिला होता. आमच्या वाफराचें नांव अगदीं अन्वर्थक आणि काव्यमय होतें :—'लेडी ऑफ द मिस्ट'—'धुक्याची रमणी'. हिमकन्याहि म्हणायला हरकत नाहीं. मीं तर तिला 'तुषारगौरी' म्हटलें असतें. नौकेनें आम्हांला कसलाच त्रास दिला नाहीं, पण विशालकाय धबधब्यामुळें उत्पन्न होणारे हवेचे धबकारे आमच्या छातीचा नगारा करूं पाहात होते. मोकळी हवा असून देखील हवेच्या धबकाऱ्यांमुळें गुदमरल्यासारखें वाटे. हाहि त्या दिवशींचा एक आनंदच. समुद्राच्या लाटा

छातीवर एकीमागून एक आदळल्यानें जी आनंदाची तिरपीट उडते तिचीच आठवण झाली येथील हवेच्या आणि आवाजाच्या लाटांमुळें.

हा जो अमेरिकेंतील खडकाळ पाण्याचा अनुभव वर लिहिला आहे तसाच पण बराचसा सौम्य अनुभव आम्हांला आला आफ्रिकेच्या पूर्व-किनाऱ्यावरील माडागास्कर बेटांत. (नुकतेंच हें बेट स्वतंत्र झालें आहे आणि तेथील लोकांनीं बेटाचें नांव ठेवलें आहे 'मालगासे.') मालगासेची पहाडी राजधानी तानानारीवपासून आम्ही पूर्वेकडे आन्त्सिरावे शहरीं गेलों होतों. एका सुंदर सरोवरांत विचरणाऱ्या होड्या पाहून आम्हांला नौकाविहाराची हौस आली. येथें भाड्यानें नौका मिळत नव्हत्या. पण एका फ्रेंच नाविकानें आमची हौस तृप्त करण्याचें कबूल केलें. आम्ही त्याच्या होडींत जाऊन बसलों आणि त्यानें इंजिन चालूं केलें.

येथेंहि तोच अनुभव आला. अमेरिकन अनुभवापेक्षां हा होता कांहींसा सौम्य, पण त्यापैकींच. पाण्यांतून प्रवास करीत असतांना अशी खडखड कां व्हावी याचें कारण अजून नीटसें ध्यानांत आलें नाहीं. एखाद्या गादींत पिंजलेला कापूस एकसारखा भरण्यांत चूक झाली तर कापूस कुठें जाड तर कुठें पातळ असा होऊन अशा गादीवर निजलें असतां पाठीच्या ध्यानांत येतें कीं मधूनमधून कापसाचे घट्ट गोळे झाले आहेत आणि मधूनमधून कापूस विरळ आहे, आणि म्हणूनच गादी अंगाला खुपते. अशासारखाच कांहीं तरी प्रकार होडीच्या वेगामुळें सरोवराच्या पाण्यांत होत असेल ?

जमिनीवर आणि पाण्यांत हा खडखड आवाज होतो तो निदान हवेंत उडतांना होणार नाहीं असें जर म्हणायला जावें तर तेथेंहि तें खरें ठरत नाहीं.

विमानांत बसून ताशीं ऐंशीं मैल ते दोनशें-अडीचशें मैलांच्या झडपेनें जरी आकाशांत चाललों आणि इंजिनाची घरघर ऐकूं येत असली तरी सर्वांगाला गतीचा अनुभव येत नाहीं.

घारीप्रमाणें एक पंख जरा खालावून जेव्हां विमानें जमिनीवर उतरण्या-पूर्वी गोलगोल चक्करें घेतात तेव्हां खालची जमीनच वाकडी झाली आहे

असा भास होऊं लागतो. पण विमानाची तेज गति इतकी शांत आणि संथ असते कीं महासागरांतून एखादी आगबोट जात असावी असाच भास होऊं लागतो.

पण — हवेंत देखील पणला अवकाश आहे — कोठें कोठें हवेंत देखील खाचखळगे असतात. हवेंत आपण सरळ चाललों असलों तरी विमाना-खालची हवा सर्वत्र एकसारखी जाड किंवा पातळ असत नाहीं. ती मध्येंच जाड होते, मध्येंच विरळ असते. त्यामुळें उडणाऱ्या विमानाला मध्येंच शेकडों फुटांचा गचका बसतो. आणि मग अशा प्रवासांत विमानाची देखील खडखड सुरू होते. असली खडखड थांबायला चांगलाच वेळ लागतो. आपल्याला वाटतें, कीं नको ही असली मुसाफिरी. पण विमानवाल्याला सांगण्याची सोय नसते कीं खडखडीचा त्रास फार होतो, थांबव जरा विमान. विमान थांबलें कीं तें हवेंत तरंगूंच शकत नाहीं. तें भिरीरी खालीं यावयाचें व धाडकन आपटून त्याचा आणि आपला एकाच वेळीं कपाळ-मोक्ष व्हावयाचा. सायकल चालते तोंवरच ती उभी किंवा खडी असूं शकते. सायकलचा वेग थांबला कीं ती आपली आडवी होऊन जमिनीवर निजायची. विमानाचेंहि असेंच आहे.

तेव्हां विमानांतील खडखड आश्चर्यमुग्ध होऊन अगदीं लाचारीनें सहन करावीच लागते. पंचमहाभूतांपैकीं पृथ्वी, आप आणि वायु या तिन्ही महाभूतांचा प्रवास करून पाहिला, पण सर्वत्र खडखड ही असावयाचीच असा अनुभव आला.

हा अनुभव लिहितांना वारंवार मनांत येत होतें, वीररसपूर्ण पोवाडे किंवा कविता म्हणणाऱ्या शाहिरांनीं या अनुभवांवर कडकडीत जडण-घडण असलेलें काव्यच लिहिलें पाहिजे आणि तें लोकसमुदायांत मोठ्या इरेनें गावून दाखविलें पाहिजे. तशी शक्ति जोंवर मजजवळ नाहीं तोंवर त्रिविध खडखड अनुभवालाच उद्देशूनच म्हणावेंसें वाटतें,

"स्तवार्थं तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ?" ■

मांजर

गायी-म्हशींची गोष्ट निराळी. त्यांना आपण दुधासाठीं बाळगतों. बैल-घोड्यांचीहि गोष्ट निराळी. वाहन म्हणून आपण त्यांचा उपयोग करतों. कुत्र्या-मांजरांचा उपयोग पुष्कळ आहे यांत शंका नाहीं. पण हे प्राणी आपल्याला आवडतात म्हणून आपण त्यांना पाळतों. त्यांना माणसांचे सोबती म्हणतां येईल. पोपट-मैनेप्रमाणें त्यांना पिंजऱ्यांतहि घालून ठेवावें लागत नाहीं. कुत्रीं आणि मांजरें राजीखुषीनें आपल्याबरोबर राहतात. आणि म्हणूनच आपल्याला त्यांचा लळा लागतो.

लहानपणीं कुत्रीं आणि मांजरें मीं बाळगून पाहिलीं आहेत. त्यांची सेवा करतांना मला कधींच कंटाळा किंवा थकवा आला नाहीं. आज मी कुत्रीं किंवा मांजरें बाळगीत नाहीं याचें कारण हें नव्हे कीं मला त्यांचा कंटाळा आला आहे. उलट या लागुती प्राण्यांचा अंतोनात लळा लागतो याचीच मला भीति वाटते.

कुत्रीं-मांजरें आतां मुळींच बाळगावयाचीं नाहींत, असा निश्चय ठरल्या-नंतर देखील जडभरताप्रमाणें एका मांजराच्या मोहपाशांत मी सांपडलों. आम्ही वेल्होर जेलमध्यें असतांना मांजराचीं दोन पिल्लें आमच्या बराकीच्या मागें असहाय स्थितींत असलेलीं मीं पाहिलीं. त्यांची तीं गोजिरवाणीं गुलाबी नाकें पाहून माझा जुना वात्सल्यभाव जागृत झाला. यांची काळजी घेतली नाहीं तर तीं मरून जातील, बोका येऊन त्यांना खाऊन जाईल, अशा भीतीनें त्यांना मीं जवळ केलें. त्यांना मी नियमित दूध पाजूं लागलों. आपण अनाथ नाहीं असा विश्वास वाटतांच तीं माझ्या आसपास घिरट्या घालूं लागलीं. माझ्या पायाला आपलें नाक घासूं लागलीं. उंटासारखी पाठ उंच करून गोंजारण्याला आमंत्रण देऊं लागलीं. शेपूट उंच करून सुचवूं

लागलीं कीं, शेपटावरून देखील हात फिरला पाहिजे. पुढें हळूच तीं अंथरुणांत शिरलीं आणि पोटांतून 'उर्र...' असा आवाज काढून परम संतोष व्यक्त करूं लागलीं. मांजरांच्या नखांना केव्हां केव्हां खाज येते. तेव्हां तीं झाडाच्या बुंध्याला, खुर्चीच्या पायाला किंवा अशाच एखाद्या कठीण पदार्थाला ओरबडे काढून नखांच्या कंड्रूचें शमन करतात.

मांजरांच्या पुढें एखादा रोटीचा तुकडा टाकला, तर तीं थोडा वेळ पायाच्या पंज्यानें त्या तुकड्याशीं खेळतील. मांजराच्या पिल्लांना ही हौस अधिक. पुढें तो तुकडा खातांना मांजरें इतक्या प्रकारें डोकें हलवितात कीं तो प्रकार पाहण्याची मोठी मौज वाटते.

वेल्होर जेलमधील मांजरांच्या त्या दोन पिल्लांना देण्यासाठीं मी रोटीचा तुकडा त्यांच्या डोक्यावर धरत असें. बरींचशीं मांजरें उडी मारून तुकडा तोंडांत धरतात. कित्येक तर मागच्या दोन पायांवर उभें राहून रोटीच्या तुकड्यापर्यंत तोंड पोहोंचविण्याचा प्रयत्न करतात. आणि आपण तुकडा त्यांच्या आटोक्याच्या बाहेर नेला म्हणजे कांगावा करण्याच्या आवाजांत गुरगुरतात. पण आमचीं लाडावलेलीं मांजरें असा पुरुषार्थ कशाला करतील? देवासारखे पुढचे पाय जोडून तीं स्वस्थ बसायचीं, आणि एखाद्याला जवळ ये म्हणून जसें आपण डोक्यानें खुणावतों, त्याप्रमाणें रोटीच्या तुकड्याकडे तोंड करून आपल्या समोर जेथें तो तुकडा पडावा अशी इच्छा असेल तिथपर्यंत तीं आपलीं डोकीं हलवायचीं. अगदीं माणसाप्रमाणें असा इषारा करतांना त्यांना पाहून मार्जारसंस्कृतीविषयीं मला आदर वाटूं लागला.

मांजरांचे पंजे किती मऊ आणि गुबगुबीत असतात! त्यांचीं नखें कधीं बाहेर दिसावयाचीं नाहींत. अगदीं आंत लपलेलीं असावयाचीं. मांजर चालूं लागलें तर त्यांच्या पावलांचा आवाज मुळींच होत नाहीं. म्हणूनच एखादा मनुष्य गुपचुप माझ्या खोलींत आला तर मी त्याला म्हणतों कीं तूं अगदीं मांजराच्या पायानें आलास. चाहूल मुळींच लागली नाहीं. पण हींच मांजरें जेव्हां रागावतात, भांडावयास येतात किंवा भयानें कावरींबावरीं होतात, तेव्हां त्यांचीं तीं तीक्ष्ण नखें पाहून घ्यावींत.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलसंग्रह
अनुक्रम 3 ८ ८ १ ८ ..... दिः ..... निबंध
क्रमांक ..... ७५९० ..... कॉ दिः ..... मराठी

'दाखवायचे दांत निराळे आणि खाण्याचे निराळे' अशी जशी म्हण आहे तशीच एखादी सुंदर म्हण मांजरांच्या पंज्यांसंबंधानें बनवली पाहिजे.

माझे वडील त्यांच्या बालपणीं पाळण्यांत असतांना एका मांजरानें पाळण्यांत उडी मारली म्हणे. आणि त्या मांजराचा एक ओरबडा माझ्या वडिलांच्या नाकाच्या बाजूला गालावर उमटला. तो वण त्यांच्या चेहऱ्यावर अगदीं शेवटपर्यंत — ७३ वर्षें — मांजराचा तो पराक्रम जाहीर करीत होता.

ज्या त्या मांजराला मीं पाहणेंहि शक्य नव्हतें त्याचा मला मनापासून राग आला. जर तें नवीन जन्म घेऊन माझ्यासमोर आलें असतें तर त्याला मीं वेताच्या छडीनें झोडपून काढलें असतें. पण एका मांजरानें माझ्या वडिलांचा अशा रीतीनें द्रोह केला म्हणून सबंध मार्जारजातीवर सूड उगवण्याइतका मी महाभारतकालीन वीर परीक्षित नव्हतों. लहानपणापासून मांजर मला फार आवडतें.

पण हो, वेल्होरच्या मांजरांची गोष्ट पुरी केली पाहिजे. तीं जरा मोठीं झालीं आणि एक गलेलठ्ठ बोका त्यांना मारायला टपला. तेव्हांपासून माझा सगळा दिवस तो बोका कुठून आला, कुठें जात आहे, यावर पाळत ठेवण्यांत जाऊं लागला. बोका दिसला कीं त्याला हांकून लावण्यासाठीं त्याच्या मागें मी धावूं लागलों. एवढा मोठा राजकीय कैदी आपलें वाचन-लेखन सोडून बोक्याच्या मागें धांवतो याचें सर्वांनाच — विशेषतः सामान्य कैद्यांना आणि पोलिसांना — आश्चर्य वाटूं लागलें. मी लाजलों. पण पाळलेल्या मांजरांचें रक्षण सोडून कसें देणार ?

माझ्या मार्जार-पुराणांतील हा शेवटचा अध्याय. पण आदि-पर्व तर मीं अजून सांगितलेंच नाहीं.

कुत्रीं स्वच्छ नसतात, म्हणून त्यांना आपण घरांत बावरूं देत नाहीं. मांजरें आपला सगळा रिकामा वेळ, चाटून ओल्या केलेल्या पंज्याच्या योगानें गालापासून तें सगळें शरीर चोळून चोळून स्वच्छ करीत असतात. म्हणून मांजरें सर्वांना — निदान मला तरी — फार आवडतात.

माझ्या आईला माझी ही मांजर-भक्ति किंवा मार्जारनिष्ठा मुळींच आवडली नाहीं. एकदां तिनें सांगितलें कीं, गोंजारण्यासाठीं मांजराच्या पाठीवरून हात फिरवला तर त्याचे केस सुटे होऊन आपल्या हाताला लागतात, आणि ते जर पोटांत गेले तर मनुष्याला हटकून दमा होतो. बाभळीचीं फुलें हुंगलीं असतां नाकांत पिनस म्हणून रोग होतो ही माहिती मिळून देखील जशी आम्हीं पर्वा केली नाहीं, त्याचप्रमाणें मांजरांना दूर करण्याचें माझ्यानें झालें नाहीं.

कारवारला असतांना मीं पुष्कळ मांजरें बाळगलीं होतीं. अगदीं लहान असतांना एक गोजिरवाणें पिल्लूं मीं बाळगलें. सकाळीं आंघोळ करून 'नास्ता' करायला मी खोलींत गेलों आणि लाडू-करंज्यांचा पेटारा उघडला कीं तावडतोब व्यंकटेशाला त्याची बातमी लागायची, आणि धांवत येऊन तो माझ्या पायांत घोटाळायचा. त्याच्या शेपटीवर पाय पडेल या भयानें मला बरेंच सांभाळावें लागे.

महाराष्ट्रांत व्यंकटेश नांव फारसें वापरांत नाहीं. व्यंकटेश हा कानडा देव. धारवाड-कारवाराकडे हें नांव बरेंच प्रचलित आहे. लाडक्या एकुलत्या एक मुलाला व्यंकटेश हेंच नांव ठेवलें जातें. पुष्कळ मुलींच्या पाठीवर नवसाचा मुलगा झाला कीं त्याचें नांव विचारावयाला नको; तें व्यंकटेशच आहे असें आपण धरून चालावें. मुली नको झाल्या म्हणजे मुलीचें नांव सावित्री ठेवावें, आणि मुलगा हवा असला म्हणजे त्याला व्यंकटेश म्हणावें, हें सूत्र मीं कानडींत पाठ केलें होतें. 'साकु सावित्री, वेकु व्यंकप्पा.' साकु म्हणजे 'पुरें झालें' आणि वेकु म्हणजे 'हवें आहे.' (कोंकणांत मुलींचा वीट आला म्हणजे मुलीला विठें किंवा विठाई हें नांव ठेवतात. बरें झालें, तुकाराममहाराजांच्या कानीं ही गोष्ट गेली नाहीं. विठाईमाउलीचा असा अपमान त्यांनीं सहन केला नसता.) इतकें सांस्कृतिक ज्ञान झाल्यानंतर मीं माझ्या आवडत्या मांजराला हें अप्रुबाईचें व्यंकटेश नांव ठेवलें त्यांत आश्चर्य काय?

कांहीं दिवसांनीं मी बेळगांवला आणि तेथून पुण्याला गेलों. तेथें असतांना एके दिवशीं कारवारहून वडिलांचें पत्र आलें कीं, व्यंकटेशाला

एका मोठ्या घुशीनें मारून खाल्लें. मूषककुलाचा संहार करणाऱ्या मांजराला घुशीनें मारून खावें हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. मीं किती तरी दिवस व्यंकटेशाचें यथाविधि दुःख केलें.

मला जशी मांजरें बाळगण्याची आणि गोंजारण्याची हौस होती, तशी आमच्या केशूला (वडील बंधूला) मांजरांना झोडपण्याची हौस होती. आणि मी धाकटा भाऊ असल्यामुळें वडील बंधूच्या या मृगयेंत मला भाग घ्यावा लागत असे आणि आश्चर्य हें कीं, मला दोन्ही गोष्टी आवडूं लागल्या. पाळलेल्या मांजरांचे लाड करावे आणि अनोळखी मांजरांचा पाठलाग करून त्यांना झोडपावें, असा मी निःपक्षपातीपणें द्विविध आनंद घेऊं लागलों.

एकदां आईनें मला निक्षून सांगितलें कीं मांजरांना जवळ करूं नये. स्वतःचा हा बोध माझ्या मनावर ठसविण्यासाठीं आईनें सांगितलें कीं, "मांजर देवाची प्रार्थना करतें कीं, 'देवा, घरांतील सगळीं माणसें मरून जावोत. फक्त एक गाय आणि आंधळी म्हातारी वांचूं देत. म्हणजे तिनें चुलीवरून उतरून ठेवलेली दुधाची चरवी मला एकट्याला लपलपतां येईल.' (हें क्रियापद आईचें नव्हतें. मीं तें नंतर चालू केलें. मांजरें दुधांत तोंड घालीत नाहींत, पण जीभ दुधापर्यंत पोहोंचवून लपलप आवाज करीत पाहतां पाहतां दूध संपवितात.) याच्या उलट कुत्रें म्हणतें कीं, 'देवा, घरांत मुलें-बाळें पुष्कळ असूं देत. प्रत्येक मुलानें भाताचा एक एक घास जरी टाकला तरी सगळ्यांचे घास मिळून मला पोटभर खायला मिळेल.' म्हणून मांजराला जवळ करूं नये. त्याची नियत खराब असते. कुत्र्याची नियत चांगली म्हणून कुत्रीं पसंत करावींत." मला ही गोष्ट आवडली. पण तीमुळें कुत्र्या-मांजरांत मांजरांविरुद्ध पक्षपात करण्याचें मला पटलें नाहीं.

(पुढें गुजरातमध्यें कुत्र्या-मांजरांची वरील प्रकारचीच जेव्हां तुलना ऐकली तेव्हां त्यांत एक पाठांतर आढळून आलें. गुजरातमधलीं कुत्रीं म्हणतात म्हणे कीं 'देवा, घरांत मुबलक मुलें असूं देत. प्रत्येक मुलानें माझ्या कानाएवढा भाकरीचा तुकडा मला टाकला तरी माझें पोट भरेल.')

वरील गोष्टीपासून मीं एकच निर्णय काढला कीं कुत्रीं स्वामिनिष्ठ

असतात, मांजरें आत्मनिष्ठ असतात. माल्क जर एक घर सोडून दुसऱ्या घरांत राह्यला गेला तर कुत्रें माल्काच्या पाठोपाठ जायचें. मांजराचें तसें नाहीं. तें म्हणतें तुम्ही घर सोडून गेलांत तर खुशाल जा. मीं घर काय म्हणून सोडावें ? व्यक्तिनिष्ठेपेक्षां स्थळ-निष्ठा अधिक महत्त्वाची.

कारवारला आम्ही गेलों तेव्हां तेथें मराठी जाणणारे लोक थोडे. तो कोंकणी मुलूख. तेथें लोकांची भाषा आम्हांला समजत नसे. तेव्हां लोकांत मिसळण्याचा अवकाश कमी. म्हणून केशू आणि मी गांवांत हिंडून चांगलीं चांगलीं गोजिरवाणीं मांजरें कुठें कुठें आहेत याचा शोध लावीत असूं. आणि एखादें मांजर डोळ्यांत भरलें म्हणजे तें चोरून आणण्याचा आम्हीं कट करावयाचा. केशूनें एक पोतें बरोबर बाळगायचें. आवडलेलें मांजर आटोक्यांत येतांच मी झटकन् त्याच्यावर झाप घालून त्याची मानगुटी पकडत असें. मांजर आत्मरक्षणार्थ चावा घेई, नखानें ओरखाडे काढी, याचा इलाज मीं शिकून घेतला. मांजराच्या मानेच्या वरच्या बाजूची चामडी चिमटींत धरून त्याला वर उचललें म्हणजे तेथें त्याचे दांत किंवा नखें पोंचत नाहींत. त्यानें कितीहि आळोखेपिळोखे घेतले तरी आपला हात सुरक्षित. मांजराला थोडा वेळ असें लटकत ठेवल्यानंतर त्याचे मागचे पाय पकडायचे. ते मुठींत आले म्हणजे मूठ जराशी वर करून त्याच डाव्या मुठींत त्याचे पुढचे पायहि आवळून धरायचे. एवढें झालें म्हणजे मांजराचा जोर चालत नाहीं. काबीज केलेल्या मांजराला केशूच्या पोत्यांत घालून पोत्याचें तोंड बांधलें म्हणजे मिळवली. मांजरानें पोत्यांत कितीहि धुडगूस घातला तरी त्याचा गमजा चालत नसे.

मांजर घरीं आणल्यानंतर त्याला हळूच पोत्यांतून बाहेर काढावयाचें. मानेवरील चामडी चिमटींत धरून त्याच्या पुढें दूध ठेवावयाचें. दूध मिळालें कीं मांजर मऊ आलेंच. मग त्याला गोंजारून आपलेंसें करावयाचें. पण हा स्वामिनिष्ठ प्राणी पळून पूर्वीच्या घरीं गेला तर ? यावर कुणींसा एक तोडगा सुचवला. धरून आणलेल्या मांजराचें नाक आणि कान चुलीवर घासले तर मांजर ती चूल सोडून जात नाहीं. एवढी रहस्य-विद्या समजल्यानंतर आम्हीं ती अंमलांत आणली. चुलीशीं नाक-कान घासल्यानें

असो किंवा आमच्या घरीं दूध-तूप मुबलक मिळे म्हणून असो, पण आम्हीं जिंकून आणलेलीं मांजरें आम्हांला कधीं सोडून गेलीं नाहींत.

एकदां एका कलावंतिणीच्या घराजवळ आम्हीं एक गुबदुल, पांढरेशुभ्र मांजर पाहिलें. त्याचा विशेष हा कीं, त्याच्या शेपटावर बारा ब्राह्मणांच्या पापाचे बारा पट्टे नव्हते. इतकें सुंदर आणि इतकें निष्पाप मांजर आपल्याला मिळालेंच पाहिजे. मांजर आम्हांला द्या म्हणून कलावंतिणीकडे मागायला जायची सोय नव्हती. हीं मुलें अशा ठिकाणीं गेलींच कां, म्हणून आपली लोक फटफजिती करावयाचे. तेव्हां आम्हीं क्षत्रिय वीरांप्रमाणें तें मांजर जिंकून आणण्याचें ठरविलें. मार्जार-हरणाचें हें पर्व पुढें फारच मोठें झालें.

मारयान लुईस फरनांदिस म्हणून एक खिस्ती मेस्त (सुतार) आमच्या ओळखीचा झाला होता. त्याच्याकडे जाऊन एक देवदारी खोका त्याला देऊन आम्ही मांजराला राहण्यासाठीं त्याच्याकडून एक घर बनवून घेतलें. घराला खिडक्या पाडून त्यांत रंगीबेरंगी कांचा बसवल्या. आणि एक गादी बनवून मांजराला त्या काव्यमय घरांत ठेवून दिलें. एका खिडकींतून पाहतां मांजर हिरवें दिसायचें, दुसऱ्या खिडकींतून लाल, तिसरींतून सोनेरी आणि चौथींतून अस्मानी. मांजरानें आमचे हे सगळे लाड मोठ्या रसिकतेनें स्वीकारले. पुढें मेस्ताकडून वडिलांना समजलें कीं मांजरासाठीं आम्हीं देवदारी घर तयार केलें आहे. तपास करतां त्यांना समजलें कीं, मांजराच्या घराच्या खिडक्यांसाठीं तावदानें आम्हीं राहत्या बंगल्याच्या खिडकींतून काढून लावलीं आहेत. ज्याच्या घरांत आपण राहतों त्याची अशी नासधूस करणें योग्य नाहीं असें वडिलांनीं निक्षून सांगितलें. केशू म्हणाला कीं आपण भरभक्कम भाडें देतों ना? तेव्हां घर आपलें झालें. तेव्हां कांचा वापरायला हरकत काय? वडिलांना नीतिशास्त्र अगदीं मुळापासून समजावून सांगावें लागलें. पण आमचें मांजराचें घर त्यांनीं जप्त केलें नाहीं. मांजरहि दोनप्रहरीं रीतसर स्वतःच्या हक्काच्या घरांत आराम करीत असे.

पण — पण एक दुसरें संकट उद्भवलें. मांजर दिवसेंदिवस रोड होऊं

लागलें. आम्हीं त्याचा दुधाचा रतीब वाढवला. घरीं खीर केली असली तर आईचा डोळा चुकवून आम्ही ती सगळी मांजरालाच खाऊं घालूं लागलों. तरीहि तें कृतघ्न मांजर कांहीं केल्या अंग धरीना. एके दिवशीं आईच्या नजरेला ही गोष्ट आली. तेव्हां रागावून ती आम्हांला म्हणाली, "वेड्यांनो, ह्या मांजराला मासे खाण्याची सवय आहे. आपल्या घरांत याला मासे कोठून मिळणार? दुधानें याचा संतोष होणार नाहीं. याला सोडून द्या. नाहीं तर मांजर मेल्याचें पाप तुम्हांला लागेल. मग सोन्याचें मांजर करून तें काशीला जाऊन ब्राह्मणाला दान दिलें तरच बारा ब्राह्मण मारल्याच्या पापांतून तुम्ही मुक्त व्हाल." केशू विजयाच्या आवाजांत म्हणाला, "पण आई, या मांजराच्या शेपटीवर बारा ब्राह्मणांच्या पापाचे पट्टे नाहींतच मुळीं. तेव्हां तें पाप आपल्याला लागणार नाहीं." तो विषय टाळून मी म्हणालों, "आईचें म्हणणें खरें आहे. आपण जेव्हां आमटींतील शेवग्याच्या शेंगांचे तुकडे चावून त्याचा चोथा ताटाबाहेर ठेवून देतों, तेव्हां हें मांजर शेवग्याच्या शेंगांचा तो चोथा चघळत बसतें. त्याला मासे खाण्याची सवय आहे हेंच खरें."

आतां काय करावें? इतकें सुंदर मांजर सोडून कसें द्यावें? शेवटीं घरीं भांडीं घासायला आणि कपडे धुवायला एक म्हातारी बाई येत असे. तिला रोज दोन पैसे देऊं करून आम्ही तिच्याकडून मांजराला मासळी खाऊं घालण्याची सोय केली. आमचा हा कट कांहीं दिवस चालला. मांजरानें अंग धरण्यास सुरुवात केली. पण त्याला अक्कल मुळींच नव्हती. एकदां मासळीचें डोकें तोंडांत धरून तें आईपुढें दत्त म्हणून उभें राहिलें. घरांत हाहाःकार झाला. म्हातारीला धमकावतांच तिनें सगळें सांगून टाकलें कीं, केशूअप्पा आणि दत्तुअप्पा यांच्या सांगण्यानें आपण मांजराला मासळी चारतों. शेवटीं गोष्ट वडिलांच्या कानांपर्यंत पोंचली आणि आम्हांला मग लष्करी हुकूम झाला कीं मांजराला ताबडतोब कारवारच्या बाजारांत सोडून यावें. आम्हांला आशा आणि भीति होती कीं मांजर घराच्या आणि मासळीच्या लोभानें परत येईल. पण तसें घडलें नाहीं. आणि आम्ही त्या

श्वेतकाय पवित्रतम मांजराच्या सहवासाला अंतरलों.

पुढें आम्ही कारवारहून शहापूरला गेलों. तेथें मीं एक मांजर आणलें. इतक्यांत केशूला बातमी लागली कीं, मांजराला धरून जर हवेंत उडवलें तर तें कधींहि पाठीवर किंवा बरगडीवर पडावयाचें नाहीं. वरून खालीं येतां येतां शरीर आणि पाय हलवून तें पडतांना अगदीं अलगद चार पायांवरच पडतें आणि जमिनीला पाय लागतांच धूम ठोकतें.

एवढी महत्त्वाची बातमी लागल्यानंतर ती अजमावल्यावांचून केशू कसा राहणार ? त्यानें धर मांजर आणि उडव आकाशांत असें एकसारखें चालवलें. एकदां अशाच रीतीनें उंच उडवलेलें मांजर मी ओणवा असतांना माझ्या उघड्या पाठीवर पडलें. घाबरलेल्या मांजराच्या नखांनीं माझी पाठ रक्तबंबाळ झाली. केशू म्हणाला, "घरांत कुणाला सांगूं नकोस. मला सगळे रागें भरतील." शेवटीं सरकारी दवाखान्यांतून थोडेंसें आयोडिन आणून पाठीला चोळलें. कांहीं दिवस मी चोरूनच आंघोळ करीत असें आणि सदरा फक्त जेवतांनाच काढायचा, आणि जेवायला बसतांना जिथें विशेष अंधार होता तिथल्याच पाटावर बसायचें. माझ्या भातृनिष्ठेमुळें केशूला बोलून घ्यावें लागलें नाहीं. मांजराकडून गोष्ट फुटेल अशी भीतिच नव्हती. कारवारला ब्राह्मणाच्या घरांत मांजराला घालण्यासाठीं मासे आणले याचा एवढा हाहाःकार झाला होता. पण शहापूरला माझें मांजर रोज कुठून तरी उंदीर पकडून मारून खाई. उंदराचीं हाडें मांजर चघळीत असे तेव्हां त्याचा आवाजहि कानीं येई. पण वडिलांनीं किंवा आईनें या गोष्टीची मुळींच तक्रार केली नाहीं. मांजराचा आहार मांजर खाणार, त्याला आपण काय करणार, असा शास्त्रार्थ लढवून सर्वांनीं संतोष मानला. एवढेंच नव्हे तर मांजर असें उपयोगीं पडतें असें पाहून घरचे सर्वच लोक त्याचे लाड करूं लागले.

पुढें आम्ही महिन्या-दीड महिन्यासाठीं सावंतवाडीला गेलों. तेथेंहि मीं पहिल्या एक-दोन दिवसांतच एक मांजर मिळवून आणलें. हें मांजर जेवतांना पंक्तींत माझ्या अगदीं शेजारीं येऊन बसावयाचें. मी दूध-भात कालवून त्याला खाऊं घालीतोंपर्यंत मांजराला धीर निघत नसे. म्यांव म्यांव करीत

तें माझ्या तोंडाकडे पाही. तेव्हां मला त्याला प्रथमच तूप-भाताचा एक घास द्यावा लागे. माझें हें मांजरसंतर्पण घरच्या लोकांना आवडलें नाहीं. त्यांनीं माझी चेष्टा सुरू केली. मांजर जर वेळेवर आलें नाहीं तर "दत्तूची बायको कुठें गेली ? अजून कशी नाहीं आली ?" म्हणून सर्व चेष्टा करूं लागले. मी लाजून मांजराकडे पाहण्याचें टाळूं लागलों; पण भाताचा घास मात्र मांजरापुढें टाकावयाचाच. याच्यामुळें तर जास्तीच चेष्टा होऊं लागली. "तिरप्या डोळ्यांनीं बायकोकडे पाहतों!" म्हणून सगळे हंसूं लागले.

हा सगळा प्रसंग मीं 'स्मरणयात्रें'त दिला आहे. पण गोष्ट येथें पुरी केलीच पाहिजे. रोज मस्करीचे शब्द ऐकून मी कंटाळलों आणि सगळी लाज सोडून चिडून म्हणालों, "होय — होय. हें मांजर आमची बायकोच आहे. तिच्यावर आम्हीं प्रेम करणार. तिला दुधा-तुपाचा घास देणार. आतां कांहीं उरलें ?" सगळी मंडळी चूप झाली, आणि माझी चेष्टा करण्याचें त्यांनीं सोडलें. पुढें लवकरच आम्हीं सावंतवाडी सोडून दुसरीकडे गेलों म्हणून तें प्रकरण तेथेंच मिटलें.

संस्कृत काव्यप्रकाशाचा अभ्यास करीत असतांना स्वभावोक्ति म्हणून एक अलंकार आला. त्याची व्याख्या होती : स्वभावोक्तिस्तु डिंभादेः स्वक्रियारूपवर्णनम् । लहान मुलांच्या आणि त्यांच्यासारख्या गोजिरवाण्या व्यक्तींच्या स्वरूपाचें आणि वागण्याचें यथार्थ वर्णन केलें असतां त्या अलंकाराला स्वभावोक्ति असें म्हणतात. हें वर्णन वाचलें असतां मला अर्भकांच्या बाललीला आठवावयाला हव्या होत्या. कारण लहानपणीं मीं मुलें पुष्कळ खेळवलीं आहेत. पण स्वभावोक्तीचें तें विवरण वाचतांच, आपलेंच शेपूट पकडण्यासाठीं गोलगोल वाटोळें फिरणाऱ्या मांजराच्या पिल्लाचें चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. मांजराच्या पिल्लाचा हा खेळ सुरू झाला म्हणजे बराच वेळ चालतो; आणि बहुधा तो संध्याकाळींच खेळला जातो. घरांत दिवे लावलेले असल्यामुळें केव्हां केव्हां मांजराची छाया जमिनीवर किंवा भिंतीवर नाचूं लागली म्हणजे आम्हांला दुहेरी खेळ पाहावयास मिळे. मी जर संस्कृत कवि असतों तर लांगूल-

मार्गणावर काव्यें लिहून मीं स्वभावोक्ति अलंकार पुष्ट केला असता. पुढें त्याच काव्यप्रकाशांत निदर्शना अलंकार म्हणून मांजराचें वर्णन आलें होतें. चांदण्या रात्रीं झाडाखालीं मांजर बसलें असतांना झाडाच्या पालवींतून येणारे चंद्रकिरण मांजराच्या गालावर पडले. त्याला वाटलें कीं हें दूधच आहे. म्हणून त्यानें ते किरण चाटावयास सुरुवात केली. काव्यप्रकाश सगळा विसरून गेलों. पण मांजराचें हें उदाहरण मात्र अजून आठवतें : **कपोले मार्जार: पय इति करान् लेढि शशिन:।** ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३७९८ दि. ...
क्रमांक ९५८० दि. ...

निसर्गाचीं हंसरीं मुलें

फुलें म्हणजे निसर्गाचीं हंसरीं मुलें. जगतात वेताचींच, पण स्वभावानें पूर्ण आस्तिक. येतात मोठ्या उत्साहानें, अगदीं साध्याभोळ्या कळीच्या रूपानें. श्रद्धेचा विकास कसा होऊं शकतो, आणि त्या श्रद्धेचा सुगंध पाहतां पाहतां चोहींकडे कसा पसरूं शकतो, याचा प्रत्यक्ष पाठ देण्याचें मिशन घेऊनच हीं फुलें जगांत येतात.

देवानें आकाशांत अनंत तारे पेरले. रात्र त्यांना फुलवते. पहाट झाली कीं हे तारे झोपीं जातात. आपली रात्र तो त्यांचा दिवस, पुढें आपला दिवस सुरू झाला म्हणजे सर्व तारे एकामागून एक झोपीं जातात. या ताऱ्यांची भाषा समजूं लागल्यामुळेंच मीं प्रकाश आणि अंधकार यांची नवी व्याख्या केली. ही व्याख्या मला इतकी पटली आहे कीं मी तिचा प्रचार करतां थकत नाहीं. जिथें कमी दिसतें तो अंधकार, जास्ती दिसतें तो प्रकाश. ही व्याख्या जर स्वीकारली तर फक्त सूर्य आणि पृथ्वी हे दोनच गोल जेव्हां दिसतात, त्या काळाला धवल अंधकार म्हटलें पाहिजे. आणि असंख्य सूर्य ज्या काळीं दिसूं शकतात त्या परिस्थितीला काळा प्रकाश म्हटलें पाहिजे. या काळ्या दिवशीं आकाशांतलीं फुलें फुलतात. पहाटेचा सफेद अंधकार सुरू होतांच तीं डोळे मिटून निजून जातात. ताऱ्यांच्या रूपानें विधात्यानें इतकीं असंख्य फुलें आकाशांत प्रकट केलीं, पण त्याला त्यांतून रंगाचा महोत्सव करण्याचें सुचलें नाहीं. पावशी ढगांनीं विधात्याला प्रकाशाचें पृथक्करण करून इंद्रधनुष्याच्या रूपानें रंगाच्या सौंदर्याची खुबी दाखवून दिली. निसर्गाला ती पटली. आणि म्हणून त्यानें विविध रंगांचीं फुलें या पृथ्वीवर निर्माण केलीं. आकाशांतील फुलें सगळींच वाटोळीं. या एका कृतीचा अळणीपणा ध्यानांत घेऊन निसर्गानें पार्थिव फुलांना असंख्य प्रकारच्या आकृत्या दिल्या.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपलीं फुलें ही देवांच्या ताऱ्याची सुधारून-वाढवून तयार केलेली तृप्तिकारक आवृत्ति आहे. फुलें रंगा-रूपानें आणि आकृतीनें डोळ्यांना संतोष देतात. सुगंधानें केवळ नाकालाच नव्हे, तर मेंदूलाहि संतुष्ट करून आराम देतात. आपल्या सुकुमार आणि टवटवीत कांतीनें चित्ताला आल्हादित करतात आणि स्वतः अल्पजीवी असलीं तरी स्वतःची आठवण चिरस्थायी करतात.

लहानपणीं फुलबागेंत हिंडण्याची मला फार हौस असे. घरची फुलबाग असो किंवा सार्वजनिक असो, मी नियमितपणें फुलांच्या भेटीला जात असें. या भेटीला मी मुलाकात म्हणत असें. कारण थोडासा परिचय झाल्यानंतर आमच्या गुजगोष्टी चालत. माझें म्हणणें फुलांना समजत असे किंवा नाहीं तें सांगणें कठीण. पण फुलांचें म्हणणें मात्र बऱ्याच अंशीं माझ्या ध्यानांत येत असे आणि तेवढें मला बस्स असें.

पुढें पुढें मला फुलें तोडून फुलदाणींत ठेवण्याची गोडी लागली. काचेच्या सुंदर वाटींत थंडगार पाणी भरून त्यांत तऱ्हेतऱ्हेच्या फुलांची मी सुंदर रचना करीत असें. कांहीं वेळानें पाणी सुगंधित होई आणि तें डोळ्याला लावतांना फार बरें वाटे.

पुढें माझ्या वाचण्यांत आलें कीं, नूरजहान आपल्या आंघोळीच्या हौदांत गुलाबाचीं फुलें पसरून ठेवी. तिला शोध लागला कीं, गुलाबाचा वास आणि गुलाबाच्या अंगचें तेल पाण्यावर तरंगत असतें. पुढें तिनें फुलें उकळून त्याचें अत्तर तयार करण्याचा प्रकार सुरू केला. गुलाबजल आणि गुलाबाचें अत्तर यांचा बघतां बघतां सर्वत्र प्रचार सुरू झाला.

गुलाबाच्या मागोमाग इतर फुलेंदेखील अशाच रीतीनें कामाला येऊं लागलीं.

लहानपणीं अत्तराचा वास मला आवडे. पण अत्तर मनगटाला लावलेलें किंवा अत्तराचा फाया कानांत ठेवलेला आवडत नसे. कारण या दोन्ही गोष्टी विलासीपणाच्या द्योतक आहेत, असें माझ्या मनानें घेतलें होतें. आणि अत्तरासाठीं फुलें उकळून काढणें क्रूर कर्म तर खरेंच !

पुढें माझ्या वाचण्यांत आलें कीं निरनिराळ्या फुलांचा सुगंध निर-

निराळ्या मानसिक आधिव्याधींना दूर करूं शकतो. एवढें वाचल्यानंतर पूजेच्या वेळीं वापरलीं जाणारीं फुलें आध्यात्मिक दृष्ट्या चित्तवृत्तीला पोषक असलीं पाहिजेत अशी कल्पना मनांत आली आणि त्या दृष्टीनें मी फुलांचा विचार करूं लागलों. सोनचांफा आणि हिरवा चांफा हीं दोन्ही फुलें मला रजोगुणी वाटलीं. पारिजातकाच्या बाबतींत निर्णय लवकर होईना. प्रवाळासारखा देठ आणि पाहतां पाहतां पांढरा रंग तेल्कट होऊन जाणाऱ्या त्याच्या पाकळ्या मला स्वस्थपणें विचार करूं देईनात. मीं पाहिलें कीं पारिजातकाच्या झाडाजवळून जाणें प्रसन्नतेला पोषक आहे. पारिजातकाचा स्वाभाविक सुगंध सत्त्वगुणी आहे; पण पारिजातकाचीं फुलें गोळा करून एखाद्या तबकांत त्यांचा ढीग केला तर त्यांचा सुगंध उन्माद्क होतो.

माझें अत्यंत आवडतें फूल म्हणजे गुलछबू अथवा निशिगंधी. याचा सुवास दरवळला म्हणजे डोकें भरून जातें. पण मला तो नेहमीं सात्त्विकच वाटला आहे.

कवि नारायण वामन टिळकांच्या मुलीनें लहानपणीं बाभळीच्या फुलावर एक कविता लिहिलेली वाचली. मला या फुलांचा रंग आणि आकार फारच आवडे. पण पुढें असें समजलें कीं या फुलांचा वास घेतल्यानें नाकाचा रोग होतो. तेवढें वाचल्यानें बराच विरस झाला आणि मग हीं फुलें दुरूनच पाहाण्याचें ठरविलें. महाराष्ट्रांतील बाभळींचीं फुलें सगळीं पिवळीं असतात. पण मीं कुठें कुठें बाभळीचीं गुलाबी फुलेंहि पाहिलीं आहेत.

जाई, जुई, मोगरा हीं फुलें आपल्या लोकांचीं अत्यंत आवडतीं. यांचाहि वास माझ्या मतें सात्त्विक असतो. कोंकणांतलीं खास सुगंधी फुलें म्हणजे सुरंगी आणि ओवळी. हीं फुलें पुष्कळ दिवस टिकतात, आणि चांगला वास देत राहतात. वासाशीं ज्यांचा संबंध नाहीं आणि आकर्षक रंग असूनहि जीं तोरा गाजवीत नाहींत अशीं कोंकणांतील फुलें म्हणजे पिटकुळीचीं. मला हीं फारच आवडतात.

परदेशांतल्या लोकांनीं ज्या फुलांची उत्तम कदर केली आहे आणि

ज्यांचा आपण मात्र अपमान आणि नाश करतों तीं फुलें म्हणजे घाणेरीचीं. यांना इंग्रजींत लेंटीना म्हणतात. या फुलांत अनेक रंग असतात. यांचा वास 'घाणेरी' म्हणण्याइतका वाईट मुळींच नाहीं. यांचीं लहान काळीं फळें गोडुस असतात. आपल्या लोकांनीं घाणेरीचीं झुडुपें जळणासाठींच वापरण्याचें ठरविलें आहे. कारण काय तर हीं जंगलांत बेसुमार वाढतात !

विद्यार्थिदशेंत असतांना मी माझ्या सोबत्यांशीं फुलांविषयीं पुष्कळ चर्चा करीत असें. आपल्या लोकांनीं सुगंधाला महत्त्व अधिक दिलें आहे. एवढ्याचसाठीं मी रंगाची बाजू घेत असें. मला वाटतें, उष्ण प्रदेशांतील फुलें अधिक सुगंधित असतात. थंड मुलुखांत रंगांचें वैविध्य अधिक आणि नखरा-तोरादेखील अधिक. असें कां असावें याचा अजून कोणीं शोध लावला नाहीं. त्या काळीं सुगंध आणि सुरंग यांचेवर मीं एक कविताहि लिहिली होती.

फुलें म्हटलीं म्हणजे रंग, आकार आणि सुगंध यांचाच विचार मुख्यत्वें मनांत येतो. पण रसनेला देखील रसानुभव करून देण्याची शक्ति कांहीं फुलांत असते. अडुळसा किंवा वासक या झुडुपांचीं पांढरीं आटोपशीर फुलें तोडून चोखलीं असतां त्यांतून एक थेंब अमृतरस मिळत असतो. हा शोध लागल्यानंतर अडुळशाच्या झुडुपांत मी किती तरी हिंडत असें. या बाबतींतील लहानपणचा एक प्रसंग अजून देखील आठवला म्हणजे मनाला झोंबतो.

अडुळशाचीं फुलें चोखत चोखत मी हिंडत असतांना दोन मुसलमान बोहोरे गृहस्थ त्याच रस्त्यानें चालले होते. मला पाहून त्यांना माझा तिरस्कार वाटला. त्यांतील एक जण "हा !" करून हंसून म्हणाला, "घरमें शक्कर मिलती नहीं !" त्याची ती मुद्रा आणि त्याचें तें वाक्य ऐकून मला त्याचा राग आला. बेट्याला फुलांतील अमृतरसाची नैसर्गिक गोडी आणि साखरेंतील काव्यरहित गोडपणा समजत नाहीं, इतका असंस्कारी असून मला हंसतो आहे, असें म्हणून मीहि मनांत त्याला हंसलों आणि उत्तरादाखल एक झणझणीत वाक्यहि मनांत तयार केलें कीं, "बच्चाजी, साखरेच्या पाकांत तुला बुडवून तुझा मुरंबा करण्या-

इतकी साखर विकत घेण्याची मला ऐपत आहे. पण या फुलांतील मध फिरत फिरत चाखण्याचा आनंद तुला समजत नाहीं त्याला मी काय करणार ?" तावडतोब दुसरा विचार मनांत आला कीं, असें उत्तर दिल्यास त्याची खोड मोडेल खरी; पण मी त्याच्या पातळीवर गेल्या-सारखें होईल. मीं फक्त त्याच्याकडे कोणत्या झाडाचा पाला आहेस अशा मुद्रेनें पाहिलें आणि वासकाचें रसपान चालूं ठेवलें.

फुलांचा नाश करून आपला फायदा करून घ्यावयाचा इतकी अधमता मानवी संस्कृतीलाच शक्य आहे. फुलांची भक्ति कशी करावयाची, आणि फुलांची सेवा शुद्धपणें कशी घ्यावयाची, हें जर शिकावयाचें असेल तर तें फुलपांखरांपासूनच शिकावें. फुलपांखरें फुलांचेच रंग धारण करून त्यांचा अनुनय करतात. त्यांना यत्किंचितहि न दुखवतां आकंठ अमृत-पान करतात. एवढेंच नव्हे, तर जेथें बसतील तेथें हलक्या पायांनीं बसून थोडा थोडा पराग वसूल करतात, आणि 'आदानं हि विसर्गाय' या न्यायानें तो पराग अर्पण करून फुलांच्या गर्भादानाला मदत करतात. फुलपांखरें नसतीं तर पुष्पसृष्टीला वंध्यत्व आलें असतें.

पुष्पसृष्टीशीं शुद्ध सहयोग करणारे दुसरे प्राणी म्हणजे मधमाशा. रंगारूपानें नांवाजलेल्या आणि सुगंधानें दरवळणाऱ्या फुलांकडून या मधमाशा अमृतरस घेतातच; पण ज्या फुलांकडे आपलें लक्षहि जात नाहीं आणि पक्षीहि ज्यांची कदर करूं शकत नाहींत, अशा गवती फुलांकडून करभार घेऊन त्या मधुसंचय करतात, आणि लहानमोठीं मोहोळें बांधून केवढीं तरी साम्राज्यें चालवितात. सूक्ष्मदर्शक यंत्र हातांत आलें म्हणजे वस्तरा घेऊन वनस्पतीची काटछाट न करतां मी बारीक बारीक फुलें नळीखालीं ठेवतों आणि गवती फुलांच्या उपेक्षित सृष्टींतील सौंदर्याचें कविवृत्तीनें निरीक्षण करतों. खरोखर फुलें हीं निसर्गाचीं मुलें आहेत, आणि जीवनदेवतेवरील श्रद्धा उत्पन्न करणारीं दीक्षागुरु आहेत. फुलांवांचून जर फळें मिळावयाचीं असलीं तर तीं मला नकोत, असें म्हणण्याइतकी फुलांच्या बाबतींत माझी निष्ठा आहे. फुलें म्हणजे समस्त जीवनसृष्टीचा समृद्ध जीवनानंद होय ! ■

माझें बालपण

माझ्या लहानपणीं मला मुळींच वाटलें नव्हतें कीं माझ्या बाळपणांत कांहीं विशेष आहे. मला वाटतें कीं जीं मुलें फारच लाडांत वाढतात त्यांनाच आपल्या बाळपणाचें महत्त्व वाटत असावें. ज्या दुर्दैवी मुलांना स्वतःचें बाळपण अतिशय दुःखांत काढावें लागलें असेल, त्यांनाहि कदाचित् आपल्या बाळपणाच्या कटु स्मृतींमुळें कांहीं विशेषता वाटत असावी. माझ्या बाळपणांत दोन्ही गोष्टी नव्हत्या.

आतां मात्र अनेक बालजीवनांचें निरीक्षण केल्यानंतर मला माझ्या बाळपणाचे कांहीं विशेष लक्षांत घ्यावेसे वाटतात.

यांत मुळींच शंका नाहीं कीं माझ्या आईबापांचें माझ्यावर प्रेम होतें. माझ्या आरोग्याविषयीं, खाण्यापिण्या-कपड्यालत्त्याविषयीं त्यांना बरीच काळजी असे. उत्सव, यात्रा, समारंभ, वगैरे प्रसंगीं मला ते बरोबर घेऊन जात, यावरून माझें आयुष्य आनंदांत जावें, मला चांगले संस्कार मिळावेत, — आजच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, माझें जीवन समृद्ध व्हावें — अशी इच्छाहि त्यांना असावी. पण माझ्या माल्यापित्यांनीं मला कधीं गोंजारलें आहे, माझे लाड केले आहेत, किंवा माझें विशेष कौतुक केलें आहे, असें मला आठवत नाहीं.

सहा भावांत मी सगळ्यांत धाकटा. स्वाभाविकपणें माझ्याविषयीं सगळ्यांना वात्सल्य वाटे. केशूनें हत्ती होऊन चार पायांवर चालावें, आणि मीं त्याच्या पाठीवर सातारचा राजा होऊन बसावें, असे लहानपणचे खेळ मला अजून आठवतात. पण मला हेंहि आठवतें कीं आम्ही सगळीं भावंडें एकाच खोलींत निजलों असतां इतरांची दंगामस्ती चालली म्हणजे त्यांच्या लाथा मला लागत आणि काय करावें हें न सुचल्यामुळें मी

आपला मुळूमुळू रडत असें. एकदां विष्णूनें माझा हुंदका ऐकला. त्यानें एकदम स्वतःची दंगामस्ती थांबवली आणि कळवळून तो म्हणाला, "अरे, अरे, आपण काय करीत आहोंत? या दत्तूला आपला त्रास होत आहे. पाहा कसा बिचारा गुपचुप रडत आहे."

कुणाला तरी माझें सुखदुःख ध्यानांत घेण्यासारखें वाटतें, याचेंच मला समाधान झालें, आणि विष्णूविषयीं मला आदर वाटूं लागला. पण त्यांत एक मोठी अडचण उत्पन्न झाली. केशूचें आणि विष्णूचें पटत नसे, आणि मी केशूचा लाडका. तेव्हां विष्णूविषयीं सद्भाव बाळगणें हें पक्षनिष्ठेंत बसत नाहीं, असें पाहून मला मोठी कुचंबणा वाटली.

कां कुणाला ठाऊक, लहानपणीं मला स्वतःचें असें जीवन नसे. केशूच्या जीवनांत समरस व्हावें, गोंदूच्या दिवास्वप्नांत भाग घ्यावा, अण्णाच्या तऱ्हेतऱ्हेच्या प्रयोगांत मदतनीस म्हणून उपयोगी पडावें, वडीलबंधू दंगामस्ती करतात, म्हणून इतरांच्या बरोबर बाबांच्या खोलींत कैदी म्हणून अडकून पडावें, विष्णूचीं गाणीं ऐकावीं, शाळेंतील इतर मुलांच्या घरच्या गोष्टी ऐकाव्या, दोन मास्तर आपापल्या गोष्टी करूं लागले म्हणजे त्यांत कांहीं तरी समजतें का म्हणून ध्यान द्यावें, माझ्या विवाहित बंधूंच्या पत्न्या नव्याच सासरीं आल्यामुळें कशा भिऊन वागतात आणि कोणी रागें भरूं नये म्हणून घडलेल्या लहानसहान चुका दुसऱ्यावर घालण्यासाठीं कशा धडपड करतात, हें सर्व पाहावें, अशांतच माझा वेळ जाई. मी सर्वांत धाकटा असल्यामुळें आईचें आणि वडिलांचें जें कांहीं घरगुती गोष्टींविषयीं बोलणें होई तेंहि मला ऐकायला मिळे. अशा रीतीनें अगदीं बालपणीं निरनिराळ्या लोकांची निरनिराळी दृष्टि मला समजून येई. सर्वांविषयीं मला सहानुभूति वाटत असे. पण तटस्थपणें न्यायनिष्ठा मात्र मी स्वतःमध्यें उत्पन्न होऊं देत नसें. पक्षनिष्ठा हा माझा त्या वेळचा सर्वांत मोठा सद्गुण. माझ्या आईला नारायणमामा आवडत असत. कारण माझ्या आईनेंच नारायणमामांच्या लहानपणीं खस्ता खाऊन त्यांना लहानाचें मोठें केलें होतें. दत्तूमामा या दोघांहून थोरले. त्यांचा स्वभाव बराचसा टीकाखोर. तो स्वभाव आईला आवडत नसे.

म्हणून माझ्या मनानें घेतलें होतें कीं नारायणमामा चांगले आणि थोरले मामा वाईट.

पण वडिलांच्या आणि मातोश्रींच्या मध्यें जर कांहीं मतभेद झाला तर आईविषयीं सहानुभूति असूनहि मी कड घ्यायचा वडिलांचीच. कारण आईनेंच मला लहानपणीं शिकवलें होतें कीं वडिलांची भक्ति करावी.

मला स्वतःचें असें जीवनच नव्हतें. दुसऱ्या कोणाच्या तरी जीवनाचा भाग होऊन राहावें, अशीच संवय होती.

मोठा झाल्यानंतर शाळेंतील मुलांच्या भांडणांत पुष्कळदां मीं न्यायाधीशाचें काम केलें आहे आणि हा तटस्थपणें शुद्ध न्याय देतो अशी ख्यातीहि मीं मिळविली आहे. पण हा माझा मिळवलेला किंवा कमावलेला सद्गुण होता. उपजत स्वभाव पक्षनिष्ठेचाच आहे. कारण असो वा नसो, ज्याला आपला म्हटला त्याच्याविषयीं निष्ठा मानावयाची आणि मग ती कांहीं केल्या सोडावयाची नाहीं हाच माझा उपजत स्वभाव.

बाळपणीं माझें कोणीं कौतुक केलें नसल्यामुळें स्वतःचें महत्त्व मला कधींच वाटलें नाहीं. दुसऱ्यांना माझ्याविषयीं महत्त्व वाटतें, असाहि कधीं अनुभव आला नाहीं. यामुळें चारचौघांत मिसळत असलों तरी मला त्याची गोडी नव्हती. माझी खरी गोडी अगदीं लहानपणापासूनच अंतर्मुख होऊन तऱ्हेतऱ्हेचे विचार करण्यांत, कल्पनेच्या जगांत वावरण्यांत आणि सृष्टिनिरीक्षण करण्यांत होती. मला कळून चुकलें होतें कीं सगळीं माणसें आपापल्या जीवनांत रममाण असतात. त्यांत माझा फक्त उपयोग करतात आणि मीहि स्वाभाविकपणें दुसऱ्यांचा साथीदार होतों. या अनुभवामुळें सामाजिक जीवन मला विशेषसें आवडत नव्हतें. असें व्हायला स्वभावांत कांहीं तरी भोळसटपणा असला पाहिजे असें मला आतां वाटतें. पण लहानपणीं मला कुणीं वावळट मानलें नव्हतें, एवढें मात्र खरें. मी जेव्हां अंतर्मुख होऊन विचार करतों तेव्हां याचा पक्षातीत, तटस्थ, निर्विकार मनानें विचार करूं शकतों तो मी निराळाच असतों.

माझ्या लहानपणीं, उन्हांत पसरलेल्या अंथरुणावर लोळत पडून

आकाशांतील घारी कशा चक्कर चक्कर फिरतात हें पाहण्याचा मला फार आनंद वाटे.

आमच्या घरासमोर एक पैलवान राहत असे. त्याच्या घरची कोंबडी पाहण्याची देखील मोठी गंमत असे. कोंबडे, कोंबड्या आणि त्यांचीं पिल्लें यांचा जीवनक्रम बराच आकर्षक असे. त्या काळीं आमच्या घराच्या आसपास पोपट पुष्कळ राहत असत. त्यांची लाल चोंच, लांब शेपट्या, तीक्ष्ण आवाज, आणि जोरदार भराऱ्या — सगळें कांहीं आकर्षक वाटे. कुत्रीं आणि मांजरें हे तर घरचेच लोक. त्यांच्या वांचून कौटुंबिक जीवन असूं शकतें अशी कधीं कल्पनाहि मला आली नाहीं. जरा मोठा होतांच वासरांना आणि रेडकांना पाणी पाजणें, गायीचें कपाळ आणि शिंगें यांमधील भाग खाजवणें, वगैरे सेवा करण्याची मला हौस वाटूं लागली.

सर्वांत धाकटा असल्यामुळें वडिलांचा सहवास मला अधिक मिळत असे. त्यामुळें आपण होऊन आंघोळ करण्याइतका मोठा झाल्याबरोबर, वडील देवपूजा करायला बसले म्हणजे त्यांना मदत करण्याची संधि मला मिळूं लागली. देव्हाऱ्यांतील देव काढून त्यांना ताम्हणांत उतरवणें, त्यांना अभिषेक झाल्यानंतर पुसून कोरे करून त्यांच्या त्यांच्या आसनांवर त्यांना बसवणें, त्यांना गंध लावणें, फूल वाहणें, बेल-तुलसी वाहणें, वगैरे सर्व संस्कार मी लहानपणींच व्यवस्थित शिकलों. खेळाचा खेळ आणि भक्तीची भक्ति.

जीवनांतील माझा सर्वांत मोठा आनंद म्हणजे प्रवास. सकाळसंध्याकाळीं फिरायला जाण्याचा मला विशेष चटका नव्हता. कारण फिरायला जातांना सृष्टिनिरीक्षणापेक्षां गप्पागोष्टींकडेच लक्ष विशेष जात असे. बैलगाडींत बसून प्रवास करतांना दर पडावावर तीन धोंड्यांची चूल करून स्वयंपाक करणें, रात्रीं धर्मशाळेंत अथवा जागत विश्राम करणें, चोर येतील याची भीति बाळगणें, सामान सोडणें-बांधणें, वगैरे सर्व प्रकार वनभोजनाइतकेच आनंददायक असत. अशा प्रकारें माझें बालपण गेलें. त्याचा परिणाम सबंध आयुष्यावर झालेला आज प्रत्यक्ष दिसतो आणि प्रत्यक्ष बालपण जेव्हां जगलों तेव्हांपेक्षां आज त्याचा अधिक आनंद मिळत आहे, आणि त्याचें रहस्यहि आतां समजूं लागलें आहे.

हातरुमाल

संस्कृतमध्यें नोकराला किंकर म्हणतात, कारण पडेल तें काम करण्याची तयारी असल्यामुळें माल्काला तो वारंवार विचारतो, "अधुना किं करोमि ?"

अशा किंकराला पगार द्यावा लागतो. निजण्यासाठीं आठ तास सुटी द्यावी लागते. मधूनमधून तो कंटाळला म्हणजे त्याचे कोणी नातेवाईक मरतात व त्याला घरीं जाण्याची परवानगी देणें भाग पडतें.

किंकर हा पूर्णपणें किंकर नसतो. मला वाटतें, खरा किंकर म्हणजे हातरुमाल होय. विकत घेतल्यापासून हरवून जाईतोंपर्यंत (माझे हातरुमाल कधींच फाटत नाहींत. फाटण्यापूर्वीच ते हरवून टाकण्याची कला मला साधली आहे.) हातरुमाल एकसारखे कामाला सज्ज असतात. हातरुमालाचा मुख्य उद्देश तोंड पुसणें. मी जेव्हां हातरुमाल प्रथम वापरूं लागलों, तेव्हां माझी प्रामाणिक समजूत अशी होती, कीं हातरुमाल हा खिशांतून अर्धवट बाहेर ठेवण्यासाठीं किंवा उंदीर बिळांतून डोकावतो त्याप्रमाणें खिशांतून थोडासा डोकावण्यासाठीं असतो. पान खाऊन तोंड रंगविणें हें जसें शोभेचें साधन आहे, सौंदर्याचें लक्षण आहे, त्याप्रमाणें काळ्या कोटाच्या खिशांत हातरुमाल कोंबून त्याचें तोंड गोरें करणें हेंहि एक सौंदर्याचें लक्षण आहे, अशी माझी समजूत असल्यामुळें, तोंडाला घाम आला असतां हातरुमाल न वापरतां मी माझ्या धोतराच्या सोग्यानेंच तोंड पुशीत असें, आणि त्या वेळीं मी कांहीं चूक करीत होतों, असें मला आज देखील वाटत नाहीं. वेदांत नाहीं का सांगितलें, कीं डोकें, हात आणि मांड्या हे फक्त द्विज असून पाय शूद्र होत ! द्विजांनाच संस्काराचा अधिकार आहे. मी नेहमीं माझी टोपी, हातरुमाल आणि कोट साफ

ठेवीत असें. धोतर बोळूनचाळून शूद्र. त्याला धोब्याकडे जाऊन संस्कारित होण्याचा अधिकार कधींच नव्हता आणि मी देखील फारशा काळजीनें स्वतःचें धोतर धूत नसें.

एके दिवशीं आमच्या भटजींनीं तुकाराममहाराजांचा एक अभंग म्हणून दाखविला—

"जरी तो ब्राह्मण झाला धर्मभ्रष्ट।
आहे तरी श्रेष्ठ तिन्ही लोकीं॥"

त्या दिवसापासून टोपी स्वच्छ ठेवायची गरज मला भासेनाशी झाली. काळी टोपी कितीहि घामट होवो, ती चहाडखोरपणा कधीं करावयाची नाहीं. पुढें पुढें कोट देखील काळा कां असूं नये असा तर्क चालवून मी कोट स्वच्छ न ठेवण्याच्या पंथाला लागलों. हातरुमाल मात्र रोज आंघोळीच्या वेळीं स्वतः स्वच्छ धुऊन मी माझ्या खोलींतच वाळत टाकीत असें. एक दिवस आमच्या वर्गांत महंमद कासम म्हणून एक मुलगा आला. त्याच्या खिशांत तपकिरी रंगाचा हातरुमाल होता. मला वाटलें, महंमद कासम माझ्या पुढें गेला खरा!

हातरुमालाचा खरा उपयोग बाजारांतून भाजी आणण्यासाठीं आहे असें मला माझ्या मामांनीं सांगितलें. ते सर्व वस्तु नोकरांकडून आणवीत पण भाजी आणावयास मात्र त्यांनीं कोणासहि सांगितलें नव्हतें. स्वतः भाजी आणणें हा त्यांचा धर्म होता. एकदां त्यांचा हातरुमाल मला वापरावा लागला. त्यानें तोंड पुसावयास गेलों तों कोथिंबिरीचा असा कांहीं उत्तम वास येऊं लागला, कीं शाळेला जाण्याचें सोडून मी सरळ स्वयंपाकघराकडे गेलों.

पुढें आमच्या शाळेंत पुष्कळ फेरफार झाले. डॉक्टर लोक येऊन आमची तपासणी करूं लागले. त्यामुळें दर शनिवारीं तरी आम्हांला आमचे कपडे स्वच्छ ठेवावे लागत. डॉक्टरांनीं आम्हांला अपघात झाला असतांना ताबडतोब काय इलाज करावेत हा विषय शिकविला. एखाद्याचें बोट कापलें, सायकलवरून पडून गुडघा फुटला, क्रिकेट खेळतांना नाकावर चेंडू आदळून बुळणा फुटला, तर ताबडतोब हातरुमालाची

चिंधी काढून पाण्यांत भिजवून ती वापरावी, असें डॉक्टरांनीं आम्हांस सांगितलें. आमच्या गणप्याचे हातरुमाल नेहमीं फाटत, कारण त्याला आपलीं पुस्तकें रुमालांत बांधून आणण्याची संवय असे. त्यामुळें त्याला नियमितपणें घरीं रागवून घ्यावें लागे. डॉक्टरांनीं तो धडा देतांना गणप्या मला म्हणतो, डॉक्टरांचे केवढे उपकार आहेत! जेव्हां जेव्हां आतां माझा रुमाल फाटेल तेव्हां तेव्हां घरीं मी काकांना असेंच सांगणार, कीं वर्गातील मुलाला ठेच लागून तो पडला म्हणून माझा हातरुमाल फाडून मीं त्याला पट्टी बांधली.

एके दिवशीं रस्त्यांत एक हँडबिल माझ्या हातीं पडलें. प्रख्यात वैमानिक हॅटॅसल हा आपल्या प्रचंड छत्रींतून खालीं उतरेल, असें त्या जाहिरातींत छापलें होतें. आम्ही ही मौज पाहावयास शर्यतीवर गेलों. विमान आमच्या भोवऱ्याच्या आकाराचें होतें व त्याच्याखालीं एक भली मोठी मिटलेली छत्री टांगलेली होती. छत्रीला दांडा नव्हता व काड्याहि नव्हत्या. फक्त दोऱ्या होत्या आणि खालीं एक वेताची टोपली होती. त्या टोपलींत बसून हॅटॅसल वर गेला. बराच वर गेला आणि मग त्यानें छत्रीला विमानाशीं बांधून ठेवणारी दोरी कापून टाकली. विमानाचें ओझें कमी होतांच तें वाकडें तोंड करून हवेंत गटांगळ्या खाऊं लागलें आणि रेशमी छत्री एकदम पसरून तिचा फुगा झाला. तिच्या डोक्यावर असलेल्या लहानशा भोकांतून हवा जसजशी जाऊं लागली तसतशी टोपलीच्या ओझ्यानें छत्री हळूहळू खालीं येऊं लागली.

त्या दिवशीं आम्हांला फार मौज वाटली. विमानविद्येचे कसलेहि धडे न घेतां त्या दिवशीं रात्रीं स्वप्नांत मीं आकाशोड्डाण केलें. पण माझी छत्री आमच्या गांवच्या तळ्यांत पडल्यामुळें मी खडबडून जागा झालों. स्वप्नांत होतों म्हणून बरें झालें, नाहीं तर बुडूनच मरावयाचा!

दुसऱ्या दिवशीं मीं माझा मोठा हातरुमाल घेऊन त्याच्या चारहि कोपऱ्यांना हातहात लांबीच्या चार दोऱ्या बांधल्या व त्यांचीं सुटीं टोकें एकत्र बांधून त्या गाठींतच एक चांगलासा धोंडा बांधून दिला. पुढें हातरुमालाचा मध्य चिमटींत धरून मी माझी ही विमानी छत्री आकाशांत

उंच भिरकावून दिली. जणुं गोफणींतील धोंडा ! धोंडा खालीं उतरूं लागला व हातरुमाल फक्त छत्रीप्रमाणें आकाशांत पसरून हळूहळू जमिनीवर अवतरला. माझें पाहून आमच्या आळींतील सर्वच मुलांना ही विद्या अवगत झाली आणि सर्वच हातरुमाल आळींतील लहानमोठ्या धोंड्यांना स्वर्गारोहण आणि भूमिअवतरण असा दुहेरी आनंद देऊं लागले.

कोणतीहि विद्या अनधिकारी माणसाच्या हातीं घातकी ठरते. लहान लहान मुलें आमचें अनुकरण करून विमानछत्र्या उडवूं लागलीं व त्यांचे धोंडे सुटून खिडक्यांच्या तावदानावर आपटूं लागले. त्यामुळें राजद्रोही वाङ्मयाप्रमाणें आम्हा सर्वांचे हातरुमाल जप्त होऊं लागले. धोंडा लागून एखाद्या मुलाच्या डोक्याला खोक पडली म्हणजे देखील हातरुमालाचा उपयोग होऊं लागला. पुढें पावसाळा आला व आमचा हा सर्व विनोद बंद पडला.

त्या दिवसांत धोंड्यांच्या अवतरणावर मीं एक निबंध लिहिल्याचें आठवतें. थोडासा फेरफार करून तोच निबंध आज हातरुमालासाठीं वापरतों आहें झालें ! कांहीं सुचत नसलें म्हणजे पाठ केलेल्या निबंधामध्यें थोडे फेरफार करून ओढूनताणून ज्यांना ते वापरावे लागतात त्यांना तरी निदान माझ्याविषयीं सहानुभूति अवश्य वाटेल !

एकाकी

एकांतांत राहून ज्यांनीं गूढातिगूढ तत्त्वचिंतन केलें आणि लोकांतांत वावरून ज्यांनीं त्या तत्त्वज्ञानानें प्रेरित असा धर्मप्रचार केला, त्या ऋषीमुनींनीं दोन श्रुतिवचनें नोंदून ठेवलीं आहेत. एक वचन म्हणतें — 'एकाकी न रमते !' (एकटें राहून संतोष मिळत नसतो.) ईश्वराला देखील इच्छा झाली कीं आपण एक आहोंत. अनेक व्हावें. 'एकोऽहं बहुस्याम्।' दुसरें वचन म्हणतें 'द्वितीयाद् वै भयं भवति।' (आपल्याबरोबर कुणी दुसरा झाला कीं, भय उत्पन्न झालेंच.)

एकट्यानें करमत नाहीं आणि दुजापासून भय संभवतें. अशा या दुहेरी पेचांत आयुष्य कंठणें याला म्हणतात जीवन; आणि खुबी ही कीं, असा पेंचप्रसंग नसता तर आयुष्य कंटाळवाणें आणि असह्य झालें असतें. ज्यांनीं जीवनाचा रस आमूलाग्र चाखला त्यांचे परिचित शब्द म्हणजे चुटपुट, हुरहुर, तळमळ, भगभग, तडफड, धडपड, बखबख.

पुरुषार्थाच्या बाजूनें पाहिलें तर कळकळ शब्द आणि चळवळ शब्द जास्त वापरला जाईल. पण जीवन चालू आहे तोंपर्यंत मनुष्याचें मन स्वस्थ असत नाहीं खरें.

मनुष्याच्या शरीरांत दोन मनें राहतात, का एका मनाच्या पोटांत त्याचे दोन अवतार असतात, हें सांगणें कठीण आहे. पण लोकांत यथेच्छ मिसळणारे लोकदेखील आंतून एकाकी असूं शकतात.

आपल्याला ठाऊक आहे कीं कित्येक मुलें दिवसभर बोल बोल करूनहि मनांतली गोष्ट कुणालाच सांगत नसतात. ज्यांना आपण खुशालचेंडू किंवा विनोदी म्हणतों, तेहि पुष्कळदां आंतल्या गांठीचे असूं शकतात.

एकदां एक गृहस्थ जीवनाला कंटाळून आत्महत्या करण्याच्या टोंकावर

जाऊन पोंचला होता. मनामध्यें अखंड निराशेचेच विचार घोळत. मन प्रसन्न कसें करावें हें त्याला समजेना म्हणून एका प्रख्यात आधुनिक मनोवैज्ञानिक वैद्याकडे तो गेला. वैद्यानें त्याला तपासल्यानंतर सांगितलें, "मी तुम्हांला एक औषध देतों खरें, पण तुम्हांला बरें करण्याचा खरा उपाय मला सुचला आहे तो सांगतों. नुकताच आपल्या शहरांत एक विख्यात हास्यरसप्रवीण कॉमेडियन आला आहे. त्याच्याशीं दोस्ती करा. तो तुम्हांला पोट धरधरून हसवील. जीवनाची उज्ज्वल बाजू तुमच्यापुढें रुजू करील. जीवनदृष्टि बदलली म्हणजे तुमचा हा एकाकीपणा दूर होईल. अहो, तो गृहस्थ म्हणजे ईश्वराची एक मोठी देणगी आहे. सगळ्या जगाला हंसवतो, झुलवतो आणि खुश करतो."

वैद्याचा हा सल्ला ऐकतांच रोगी म्हणाला, "काय सांगूं तुम्हांला? जगाला हसवणारा, झुलवणारा आणि खुश करणारा म्हणून ज्याचें तुम्हीं वर्णन केलेंत तोच मी! तुमच्याकडे कांहीं इलाज आहे का म्हणून विचाराबयास आलों आहें. वरवर मी जगाला हंसवतों खरा, पण माझा विषाद, माझा अवसाद मला एक क्षणहि सोडत नाहीं."

ज्या लोकांचें लग्न झालेलें नसतें, ज्यांना थकूनभागून घरीं आल्यानंतर प्रेमाचे शब्द ऐकविणारें घरीं कुणीच नसतें, स्वतःच अंथरूण करून त्यावर निजावें लागतें, अशांना वाटतें कीं, आपण लग्न केलें नाहीं म्हणून ही एकांकिता आपल्याला बाधत आहे. सहधर्मचारिणी असती तर एकटेपणा आपोआप दूर झाला असता.

दरिद्र्याला वाटतें कीं, आपल्याजवळ धनसंपत्ति असती तर आपण सर्व कांहीं मिळवूं शकलों असतों. संपत्तीनें काय विकत घेतां येत नाहीं? दक्षिणा देऊन किती तरी लोक जपाचें पुण्य मिळवतात. खिस्ती लोकांत धर्मगुरु पोपला दक्षिणा देऊन पापापासून मुक्तीहि मिळवतां येत असे. मुबलक धन देऊनच प्रत्येक क्षेत्रांतले तज्ञ आपण मिळवूं शकतों, साधनें विकत घेऊं शकतों. पण ज्याच्याजवळ मुबलक धन आहे, ते उसासा टाकून म्हणतात, "ही सर्व भ्रांति आहे. आमच्या अनुभवानें शहाणे व्हा. पैशानें आरोग्य मिळवितां येत नाहीं. पैसे खर्चून झोंपहि आप-

लीशी करतां येत नाहीं. पैसे देऊन गुंगीच्या गोळ्या मिळवितां येतात, पण गुंगी म्हणजे झोंप नव्हे! तिच्या शेवटीं तजेला येत नसतो. पैसे देऊन मैत्री मिळवितां येत नाहीं. प्रेम मिळवितां येत नाहीं. फार काय, खराखुरा सल्ला देखील पैशानें विकत घेणें दुरापास्त असतें. मोठी फी घेणारा डॉक्टर तुम्हांला उपवास करायला कधींच सांगणार नाहीं. गिऱ्हाईक घालवायला कोण तयार होणार? पैशांची शक्ति अगदींच मर्यादित असते. पण ज्याच्याजवळ पैसे नाहींत त्याला हें पटायचें नाहीं.

तें कसेंहि असो. 'सुंदर ललना, स्थिर लक्ष्मी गृहिं गुणवान् सुतही ज्याला। पुत्रा पोटीं पुत्र होय तरि स्वर्गादिक सुख त्याला॥' असें ज्यांचें वर्णन होत असतें असे सुखी संसारी नर देखील केव्हां केहां मनानें एकाकी असतात. बायकामुलांचें सौख्य जेथें मुबलक मिळतें तें त्यांचें जग निराळें आणि हें सर्व असूनहि 'हें माझें नव्हे, माझ्या खऱ्या जगांत मी एकटाच एकाकी आहे, मला समजणारा कोणीच आजवर भेटला नाहीं,' असें म्हणून आंतल्या आंत कुढणारे लोक किती तरी असतात. 'गूँगेको सपनो भयो, समुझ समुझ पछताय!'

देवाच्या घरीं प्रत्येक मनुष्य अशा दुहेरी दुनियेंत नांदत असतो. ही दुसरी एकाकी, अगदीं त्याचीच सर्वतोपरि स्वतःच्या मालकीची दुनिया त्याला सुख देते काय? ज्याला ज्याला म्हणून या दुसऱ्या दुनियेचें भान आहे तो तो या प्रश्नाचें निसासा टाकून उत्तर देतो, 'नाऽहीं ऽ!'

आणि खरोखर या दुनियेचें रहस्यच या नाहींपणांत आहे. जी दुनिया सामाजिक आहे, जिच्यामध्यें पैशापासून प्रेमापर्यंत देवघेव चालूं असते आणि जिच्यामध्यें मधूनमधून कां होईना, आकंठ सुखाची प्राप्ति होते, ती दुनिया एका उतरत्या कोटीच्या देवानें तयार केली आहे — थोरल्या देवाची ती दुनिया नव्हे. या थोरल्या देवाच्या अन्तःस्थ दुनियेची अनुभूति एकाकीपणांतच आहे. कांहीं तरी सांडलें आहे आणि कांहीं केल्या गवसत नाहीं, कांहीं तरी मिळवायचें बाकी राहून गेलें आहे तें जोडतां येत नाहीं, अशी हुरहुर, अशी चुटपुट, अशी तळमळ हेंच त्या दुनियेचें रहस्य आहे. प्राचीन काळचे राजपुत्र बंदिनी

राजकन्येला सोडवायला जात, तेव्हां बरोबर तहानलाडू, भूकलाडू घेऊन जात. आमच्या या एकाकी दुनियेंतील चिरप्रवासांतील पाथेय एकच असतें—हुरहुर, तळमळ, वखवख आणि भगभग. या आहाराबर परिपुष्ट होऊन जो अंतिम मजल गांठील तो आपला अनुभव सांगावयाला परत येतच नाहीं. उपनिषदांतील एका ऋषीनें मुक्कामाबर पोंचलेल्या अशा साधकांचा आनंदोद्गार लिहून ठेवला आहे 'हाऽऽऽऊऽ ! हा ऽऽऽऊ !' यावरून ज्याला कांहीं बोध होईल त्यानें तो घ्यावा. मनुष्याचें खरें स्वरूप त्याचा एकाकीपणाच आहे. त्याच्या साधनयात्रेचा नकाशा आजवर कुणींच तयार केलेला नाहीं. प्रत्येकाची यात्रा निराळी, प्रत्येकाचा शोध निराळा आणि प्रत्येकाचा निरतिशय आनंदहि निराळा. एकटा होता तो अनेक झाला, पण एकाकीपणा तुटला नाहीं, सुटला नाहीं.

आणि म्हणूनच असंतोष हें जीवनाचें सार आहे असें म्हणावें लागतें.

गजबजलेल्या लोकांतांत राहूनदेखील ज्याप्रमाणें आपण अगदीं एकटे आहोंत असा अनुभव मनुष्याच्या वांट्याला येतो, त्याचप्रमाणें अगदीं एकटे असून देखील मनुष्याला सहवासाचें सुख मिळवितां येतें.

एकांताची आपली कल्पना अजून स्पष्ट झाली नाहीं. निर्जन म्हटल्याबरोबर त्याच्या जोडीला आपल्या तोंडून शब्द निघतो वन. पण निर्जन वनांत आपण जाणार कसें ? जिथें आपण पोंचलों त्या वनाला निर्जन म्हणतां येईल का ? आणि आपण म्हणजे अनेक विचारांची, विकारांची, अनुभूतींची, शंकाकुशंकांची, जुन्या आठवणींची आणि भविष्यकाळाविषयींच्या विविध मनोराज्यांची टोळी. टोळी कसची—भलामोठा धुडगूस.

ही झाली आंतली स्थिति. बाहेर पाहावें तर तऱ्हेतऱ्हेच्या वृक्षलता, वृक्षांच्या फांद्यांतून लपंडाव खेळणाऱ्या खारी, दूरवर बसून एकमेकाला साद देणारे पक्षी, मध्येंच एकाएकीं आपल्याला दर्शन देऊन चमकावणारे पशु, खळखळ वाहणारे ओढे व त्यांच्यामध्यें ध्यानस्थ बसून तपश्चर्या करणारे खडक, अशा मेळाव्यांत माणसाला एकांत मिळावा कसा ? माणूस अफू खाऊन त्या खडकासारखा पडून राहील तरच त्याला त्या एकजनवनांत

एकांत मिळूं शकेल पण असला एकांत गाढ झोपेंतहि मिळूं शक्तो. तेवढ्यासाठीं वनाची निर्जनता नष्ट करण्याचें कारण नाहीं.

खऱ्या एकांताचीं आजवर दोनच चित्रें पाहिलीं आहेत. एका चित्रांत सहाऱ्याचें वाळवंट महासागराप्रमाणें सर्वत्र पसरलें होतें. जेथें पाहावें तेथें स्थिर होऊन पडलेल्या वाळूच्या लाटा आणि या एकांताला उठावदारपणा आणणारें, दूर दूर क्षितिजाच्या सीमेवर एकांताची टेहळणी करणारें, इवलेसें खजुराचें झाड. हें चित्र पाहून मी खरोखर अस्वस्थ झालों. या चित्राकडे बघूंच नये असें वाटूं लागलें आणि ही वृत्ति जसजशी बळावत चालली तसतशी माझी दृष्टि त्या चित्रावर अगदीं खिळून गेली. कांहीं केल्या मागें खेचतां येईना. हा जादूटोणा तर नव्हे, असेंच वाटूं लागलें ! खऱ्या एकांताचें दर्शन त्या चित्रांतच मला प्रथम झालें. एकांताचें अगदीं जणूं काय विश्वरूपदर्शन.

एकांताचें दुसऱ्यांदा दर्शन झालें तें एका शब्दचित्रांतून. एक माणूस, एक संशोधक दक्षिण ध्रुवाकडील बर्फाच्या दुनियेंत एकटाच जाऊन राहिला आहे. त्यानें आपल्या त्या एकांताचें वर्णन करणारें एक सुंदर पुस्तक लिहिलें आहे. पुस्तकाचें नांवच ' Alone. ' वाचतां वाचतां वाटूं लागलें कीं आपण भूगर्भातील एका खाणींत सांपडलों आहोंत आणि आतां प्रकाशाच्या दुनियेंत परत जाण्याचा कांहीं मार्गच उरला नाहीं ! वाटूं लागलें कीं सहाराचें तें दृश्य-चित्र पुरवलें, पण हें मूकवाणीनें बोलणारें शांत पण भेसूर शब्दचित्र नको ! मीं पुस्तक बाजूला ठेवलें. तें पुरें केलें नाहीं. पण मनानें एकांताचा जो छंद घेतला तो कांहीं केल्या सुटेना.

येथें मात्र एकांताचा सहवास जसजसा वाढूं लागला तसतसा तो घनदाट होऊं लागला आणि मग मनाची जी अवस्था झाली तिला जर उपमा द्यावयाची तर हिमालयांत असतांना एका उत्तररात्रीं ध्यानावस्थेंत जो अनुभव आला त्याचीच देतां येईल.

दोन्ही वेळीं जी एक जुनी आठवण जागृत झाली होती तीहि येथें द्यावीशी वाटते. कॉलेजांत शिकत असतांना पोहायला प्रथम शिकलों आणि मग एका खोल विहिरींत उडी मारून अगदीं तळापर्यंत जाण्याचा

छंद लागला होता. पाय पोटाशीं घेऊन हात वर मारीत मारीत विहिरीचा तळ गांठायचा. पाण्यांत डोळे उघडे ठेवले असल्यामुळें वरील प्रकाश कमी कमी कसा होत जातो याचा अनुभव घ्यावयाचा व शेवटीं वरची बाजू कोणती व खालची कोणती याविषयीं क्षणभर शंका पैदा व्हावयाची व आतां श्वास कोंडून राहतां येत नाहीं, अगदीं असह्य झालें आहे, असा अनुभव होतांच घाबरून जाऊन दोन्ही हात खालीं मारून उसळीसरशीं वर यावयाचें ! हा अनुभव जितका गुदमरून टाकणारा होता तितकाच आकर्षक, किंबहुना व्यसन लावणारा होता.

तोच काळ पाश्चात्य आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय करून घेण्याचा होता. जगांतील प्रत्येक वस्तु म्हणजे गुणसमुच्चय, रंग, आकार, वजन, लांबीरुंदी, मोहकता किंवा नावडतेपणा इत्यादि सर्व गुण एकामागून एक काढून टाकले असतां शेवटीं अगदीं निर्गुण असें कांहीं उरतें किंवा नाहीं, गुणशून्य वस्तूचा अनुभव करून घेतां येतो किंवा नाहीं, याचा शोध घेण्याची इच्छा झाली. अशा गुणरहित सत्तेला मीं त्या वेळीं नांव दिलें होतें 'तत्ता' (तत्‌चें भाववाचक नाम). या तत्तेच्या शोधापायीं मीं किती तरी काळ ध्यानांत घालवला होता. त्या वेळीं देखील अगदीं विहिरींतील पाण्याच्या खोलांत उतरल्यासारखें गुदमरायला होत होतें. एकदां तर हा अनुभव इतका गाढ, गूढ आणि असह्य झाला कीं एकाएकीं बांधलेलें दृढबद्धपद्मासन सोडून मीं बसलेल्या मेजावरून खालीं उडी मारली आणि खोलीचा दरवाजा उघडून बाहेर आलों आणि मग मन म्हणूं लागलें, 'इदानीं अस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः।' फरक एवढाच कीं, त्या असाधारण अनुभवाचें माहात्म्य समजावून सांगणारें समोर कुणीच नव्हतें.

कॉलेजांत जो हा अनुभव सोडून दिला होता तो हिमालयांत पुन्हां चिकटला. आणि मग मात्र खऱ्याखुऱ्या एकाकीपणाच्या असह्य भयानंतर आनंद वाटूं लागला आणि एकाकीपणांतच एक प्रकारची विश्वानुभूति आहे याची कल्पना येऊं लागली.

ही साधना जर सिद्ध झाली तर मग मनुष्याला एकाकी असून देखील

सर्व प्रकारचा संतोष मिळूं शकतो. तो आत्मरति, आत्मक्रीड होतो आणि त्याच्या आसपास दुसरे कितीहि गोळा झाले तरी त्याला कसलेंच भय वाटेनासें होतें. खरें म्हटलें म्हणजे एकांत आणि लोकांत असा त्याच्या वांट्याला भेदच उरत नाहीं. मग त्याला अद्वैतानंद म्हणा किंवा सर्वानंद म्हणा, तो स्वतःच आनंदघन होतो.

एकांत ही ईश्वराची लोकोत्तर देणगी आहे. ती पचवणें सोपें नाहीं. पण पचल्यानंतर दुसऱ्या कोणत्याहि देणगीची आवश्यकता किंवा भूक उरत नाहीं. ■


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्रमांक ३५८१५ वि. निबंध
आंक १५८० ग्रं. वि. १५८०

व्हरांडा-गीत

आपल्या लोकांना व्हरांडे आवडतात कीं नाहीं? व्हरांड्यासाठीं आपला देशी शब्द कोणता? ओसरी, पडवी कीं सोपा? जर घराच्या बाहेरच्या दरवाज्याजवळ व्हरांडा असला तर त्याला आपण देवडी म्हणतों. हिंदी लोकांनीं व्हरांड्याचा बरामदा करून टाकला आहे. कोकणांत खारी समुद्री हवा वाहत असल्यामुळें तिकडे व्हरांड्याबाचून चालावयाचेंच नाहीं. तिकडे शब्द वापरला जातो बल्कांव. कदाचित् हा पोर्चुगीज शब्द असावा. इंग्रजींत बाल्कनी शब्द आहे. पण बाल्कनी म्हणजे कांहीं व्हरांडा नव्हे.

कोणींहि नवीन घर बांधलें कीं तो हौसेनें त्यांत एकदोन व्हरांडे ठेवतोच, मग ते लहान असोत किंवा मोठे. लांबलचक पण चिंचोळे व्हरांडे पुष्कळ ठिकाणीं पाहायला मिळतात.

व्हरांड्यामुळें घराच्या भिंती उन्हानें तापत नाहींत, पावसानें चिंब होत नाहींत, हा मोठा फायदा. घरीं भेटायला येणारीं साधींभोळीं खेडवळ माणसें कमीजास्ती कितीहि असलीं तरी व्हरांड्यांत सहज मावूं शकतात. व्हरांड्यांत मोकळा वारा मिळतो. उन्हाळ्यांत निजण्याची सोय होते. हिंवाळ्यांत तेथें बसून ऊन खातां येतें. रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्यांशीं गप्पागोष्टी करायला देखील व्हरांडा सोईस्कर.

गुजरातेंत पुष्कळदा लोक सकाळीं दांत साफ करण्यासाठीं हातांत दातण घेऊन व्हरांड्यांत बसतात. उंटाप्रमाणें दातण चघळत दंतधावन चालतें आणि रस्त्याच्या समोरच्या घरांत बसलेल्या शेजाऱ्यांशीं गप्पागोष्टीच गप्पागोष्टी चालूं शकतात.

अनेक रीतीनें उपयोगी पडणारा खुल्या मनाचा असा हा व्हरांडा

आपल्या लोकांना मानवत कां नाहीं ? कारण एवढेंच कीं घराच्या मानानें घरांत राहणारीं माणसें गरीब. व्हरांड्यासारखी सोईची जागा उघडी ठेवण्यापेक्षां पुढें आणि बाजूला एक लहानशी भिंत किंवा पडवी तयार केली तर तेवढीच अधिक जागा मिळते. मूळ घर किती का विद्रूप दिसेना, आपले लोक व्हरांड्याची खोली केल्यावाचून सोडीत नाहींत.

मध्यमवर्गाच्या किंवा खालच्या वर्गाच्या लोकांच्या घराची गोष्ट सोडून द्या. जुन्या मोठाल्या राजवाड्यांत आणि मोठमोठ्या मंदिरांतूनदेखील व्हरांड्यांचें खोलींत रूपांतर होतेंच.

देशाच्या सगळ्याच प्रांतांत असला प्रकार पाहून मला फार वाईट वाटलें. मी वैतागलों. पुढें जेव्हां दिल्लीला आमच्या संस्थेचीं घरें बांधावीं लागलीं तेव्हां ज्या घरांत मीं राहावयाचें त्या घरासाठीं मी एक चांगला ऐसपैस असलेला प्रशस्त व्हरांडा राहूं दिला. याचा उपयोग आम्हांला चांगला होतो. चि. रैहानाला भेटायला मंडळी नेहमीं पुष्कळ येतात. इहलोकचीं आणि परलोकचीं आश्वासनें त्यांना मिळतात. या लोकांना बऱ्याच वेळां बाहेर बसून आपली पाळी येईतोंपर्यंत वाट पाहावी लागते. दवाखान्याप्रमाणेंच आमचा व्हरांडा अशा रीतीनें पुष्कळांच्या उपयोगीं पडतो. भेटण्याची वाट पाहणारे लोक आपापसांत गोष्टी करून परस्पर परिचय वाढवतात हें सर्व पाहून मला आनंद वाटतो.

येथवर सर्व ठीक झालें. पण उन्हाळ्याच्या दिवसांत बराच वेळ तिष्ठत बसलेल्या लोकांच्या सोयीसाठीं दिल्लीसारख्या ठिकाणीं विजेचा पंखा असणें अगदीं अपरिहार्य आहे असें पाहून आम्ही घर बांधतांनाच व्हरांड्यांत पंख्याची सोय केली. पंख्याखालीं लोक बसतील ही अपेक्षा होती ती खरी खरी ठरली. पंख्यावर फार तर थोडी धूळ चढून बसेल. पण पंखा चालू होतांच ती उडून जाईल ही खात्री होती. पण झालें निराळेंच. ज्यांना रैहानाला किंवा मला भेटावयाचें नव्हतें असे द्विपाद येऊन त्या पंख्यावर बसूं लागले. पंखा बंद असतांना ते येऊन बसत आणि थोड्याशा पुरुषार्थानें त्याला हळूहळू फिरता करीत.

मला एकदम वेदकाळच्या ऋषींची आठवण झाली. वेदकाळचे ऋषि

झाले म्हणून काय झालें ? त्यांनाहि गाणें, नाचणें, वगैरे खेळ आवडत असत. ऋषींच्या काळीं लोक लहानमोठ्या रथांतून प्रवास करीत. रथाचीं मोठींमोठीं चाकें भक्कम मजबूत असत. मधल्या ज्या गड्डुयामध्यें रथाच्या आऱ्या बसवितात तो चांगला भक्कम, परिपक्व, बाभळीच्या बुंध्याचा केलेला असावयाचा. परिपक्व बाभळीची साल काढून, वरवरचें कचें लाकूड तासून, चांगला तांबूस सोलीव बुंधा घेऊन त्यांत आऱ्या बसवीत. अथवा मोठमोठ्या फळ्याहि बसवीत.

कसेंहि असो. ऋषि लोक जमिनींत लहानसा खड्डा खणून त्याच्या बुडाशीं एक बुळबुळीत धोंडा ठेवून त्याच्यावर रथाचें चाक आडवें ठेवून देत. गुळगुळीत धोंड्यामुळें रथाचें चाक आडवें तरंगत राही आणि त्याला कुंभाराच्या चाकाप्रमाणें गरगर फिरवणें सोपें जाई.

इतकी तयारी झाल्यानंतर तीन अथवा अधिक ऋषि त्या चाकावर एकमेकांकडे तोंडें करून ऐटीनें बसावयाचे आणि मग वेदाचे मंत्र मोठ्यानें हेल काढून गावयाचे. गाणें सुरूं झालें कीं जवळ उभ्या असलेल्या एखाद्या ऋषीनें चाकाला गति द्यावयाची आणि मगच चाकावर बसलेल्या ऋषींच्या सामगानाला जोर यावयाचा. मोठमोठ्या यज्ञसत्रांत मधूनमधून रिकामपण पुष्कळ असतें. अशा वेळीं करमणुकीसाठीं रथाच्या चाकावर बसून गरगर फिरत गाणें गाण्यानें ऋषींची मोठी करमणूक होत असे. रथाचें चाक अशा रीतीनें आडवें ठेवलें कीं त्याला ' चात्वाल ' म्हणत असत. चात्वालावर बसून फिरत वैदिक गाणीं गाणाऱ्या ऋषींची समाजांत मोठी कदर असे. संतुष्ट झालेले श्रोते आणि प्रेक्षक त्यांना तऱ्हेतऱ्हेचीं इनामें देत. कुणीं मृगाजिन द्यावें, कुणीं व्याघ्राजिन द्यावें. कित्येक तर आपला कमंडलूच देत. आणि कित्येक आपली लंगोटी देत. एकदा एकानें मारलेल्या हरणाचें शिंग आणून पाठ खाजवण्यासाठीं दिलें. यज्ञाचें काम चालू असतां, बोटाचीं नखें खाजवण्याच्या कामीं वापरायचीं नसतात आणि पुष्कळदा पाठीपर्यंत हात पोहोंचतहि नाहीं, म्हणून पाठ खाजविण्यासाठीं ऋषिलोक पशूंचीं शिंगें वापरीत.

व्हरांड्याच्या छतांतून लटकणारा आमचा तीनपाती विजेचा पंखा

चात्वालाइतकाच उपयोगी आहे असें समजून आमच्या द्विपाद पाहुण्यांनीं या अंबरगत चात्वालावर आसन ठेवून दिलें आणि त्यांनीं आपलें गायन सुरू केलें. वेदांमध्यें उदात्त, अनुदात्त आणि स्वरित असे तीन स्वर सांगितले आहेत. या तिहींचाच विस्तार होऊन सा रे ग म प ध नी अशीं सप्तकें तयार झालीं आणि सूक्ष्मांत शिरून गांधर्ववेदानें बावीस श्रुति नक्की केल्या. कोमल आणि तीव्र स्वर एकमेकांशीं सहकार करून सर्व तऱ्हेचे सूक्ष्मातिसूक्ष्म भावदेखील व्यक्त करूं लागले. पण आमच्या द्विपादांना दोनच स्वर माहीत. का आणि का. या दोन स्वरांतून निघणारें त्यांचें एकश्रुति गायन एकदा सुरू झालें म्हणजे कांहीं केल्या थांबत नसे. या गीताची भाववाहिता न समजण्याइके आम्ही अरसिक होतों. आम्ही कंटाळलों. पण ते म्हणाले,

"विविधतेवर आमचा विश्वास नाहीं. आम्हीं एकच सूर काढतों : 'का'. तुमच्यासारखे चार वर्णहि आम्हांला माहीत नाहींत. सर्व वर्णांच्या मिश्रणानें तयार होणारा कांतिमान कृष्णवर्णच आम्हीं पसंत केला आहे. एक वर्ण, एक स्वर, एकच गायन अशी आमची एकरागी संस्कृति आहे. म्हणूनच तर आम्ही या जगांत टिकलों आहोंत.

"तुम्हीं तुमच्या देशांत पठाण, मोगल, फिरंगी, बलेंडेज वगैरे तऱ्हे-तऱ्हेच्या लोकांना येऊं दिलें. आमचें तसें नाहीं. चिमण्यांनीं आणि आम्हीं मिळून जगांतलीं सगळीं शहरें काबीज केलीं आहेत. निसर्गाच्या घरीं शेंकडों किंवा हजारों द्विजांचे प्रकार असतील. पण आम्हीं त्यांना शहरांत फिरकूंच देत नाहीं. त्यांच्या पंखांचे रंग कितीहि सुंदर असोत, त्यांचीं गीतें कितीहि मधुर असोत, त्यांची प्राज्ञा काय कीं आमच्या शहरांत ते पाऊल ठेवतील, अथवा पंख फडफडावतील. आम्ही पासपोर्ट किंवा विसाचीहि सूट ठेवली नाहीं. परकीयांना येऊं द्यावयाचें नाहीं म्हणजे नाहीं. आतां कांहीं पक्षी मनुष्याच्या हातीं सापडून त्याच्या पिंजऱ्यांत मेलेलें अन्न खाऊन जगत असतील. त्यांचा आम्ही विचारहि करीत नाहीं, हेवाहि करीत नाहीं. असे किती रंगीबेरंगी पक्षी आम्हीं शहरांतून पिटाळले याची आठवण ताजी करण्यासाठीं आम्ही कधींकधीं

चिडियाघराकडे जाऊन झाडावर बसतों आणि बंदिवान पक्ष्यांपुढें आमची चोंच खाजवून त्यांना विचारतों, 'आहे तुमची प्राज्ञा आमच्या राज्यांत स्वतंत्रपणें नांदण्याची ?'

जीवनकलहानेंच सिद्ध केलें आहे कीं आमचें काका-गीतच विजयी गीत आहे. आणि आमची कृष्णवर्ण संस्कृतीच सर्वश्रेष्ठ संस्कृति आहे."

हें सर्व काकमाहात्म्य ऐकूनदेखील आम्हांला या पाहुण्यांसंबंधानें आदर वाटेना. आम्ही त्यांना हुसकून लावण्याचा प्रयत्न केला. पण ही चिकट जात अशानें थोडीच ऐकते ? रोज ती नियमित येऊन खगीय चात्वालावर बसूं लागली. हेंहि आम्हीं सहन केलें असतें. पण एके दिवशीं ते म्हणूं लागले, "आम्ही तुमच्या 'स्मरण-यात्रें'त एक प्रकरण वाचलें आहे. गोकाक गांवीं घटप्रभा नदीच्या किनाऱ्यावर लोकांची गर्दी पाहून आडोसा मिळावा म्हणून एका झाडावर चढून तुम्हीं शौचाला बसलां होतां. तुम्हीं हा प्रयोग जन्मांत एकदांच केला होता. पण त्याला आम्ही आमच्या संस्कृतींत कायमचा दाखल केला आहे." असें म्हणून हे कृष्णवर्णी कौरव अतिथि चात्वालाचा उपयोग शौचाला बसण्यासाठीं देखील करूं लागले.

जिथें बसून वाट पाहावयाची, तिथेंच असली घाण पाहून आमचे पाहुणे कंटाळले. आम्ही त्या द्विपादांचा पुष्कळ निषेध केला. पण आमची भाषा त्यांना समजेना. समजली असली तरी ती समजत नाहीं, असा बहाणा करण्यांतच त्यांना आपला लाभ दिसला. माळी रोज उठून व्हरांड्याची जमीन साफ करी. पुढें तो गरम पाणी आणून जमीन धुऊं लागला. पण असें किती दिवस चालायचें ? शेवटीं आम्ही ठरवलें, खर्च कितीहि होवो, पण पहाटेपासून दिवेलावणीच्या वेळेपर्यंत पंखा जोरानें चालू ठेवायचा. उन्हाळा असो किंवा हिंवाळा, व्हरांड्यांतील मोकळ्या हवेचें आमच्या पंख्यानें मंथन केलेंच पाहिजे. बरेंच मनोमंथन करून जो उपाय सापडला तो यशस्वी झाला खरा. आतां कावळे येऊन खिडकी-वर बसतात, भिंतीवर बसतात. हें सुदर्शनचक्र केव्हां थांबेल याची वाट पाहतात. पण चात्वालाच्या अभावीं काकगीत गाण्याचें मात्र त्यांना

सुचत नाहीं. आणि आम्हीहि व्हरांड्याला जाळीच्या भिंती तयार करून नको असलेल्या पाहुण्यांना बाहेर ठेवण्याचा विचार कधींहि मनांत येऊं दिला नाहीं. नाहीं तर आपल्या लोकांना तयार केलेला व्हरांडा मानवत नाहीं याची तक्रार करणारे आम्हीच त्या गुन्ह्यांत सापडलों असतों.

मध्यंतरीं दिल्लीची वीज बंद पडली होती. पंखा चालत नसे. पण ज्यांच्या दृष्टीनें हें शुभवर्तमान होतें त्यांच्या हें कानीं पोचलें नसावें असें वाटतें.

पंखा अखंड चालू असतां हें व्हरांडा-गीत लिहून काढलें. तें त्या काकर्णीना अर्पण करावयाचें नाहीं, तर काय तें बिचाऱ्या वाचकांना अर्पण करावयाचें ?

चित्र-विचित्र

परवां सौराष्ट्रांत प्रवास करीत होतों. कितीतरी जुन्या ओळखी ताज्या झाल्या. कित्येक जुन्या ओळखी मजेच्या वाटल्या. ओळखी मनांत गजबजूं लागल्या म्हणजे जीवन कसें भरल्याभरल्यासारखें वाटतें !

वाटेंत एका लहानशा गांवीं आगगाडी थांबली. स्टेशनावर कित्येक झाडें रांगेनें उभीं होतीं. झाडें एकाच जातीचीं. आवळींजावळींहि असतील. पण प्रत्येकाचा आकार निराळा. फांद्या एकमेकांना कुशल प्रश्न विचारीत होत्या, त्याची मोठी मौज वाटली. या नव्या ओळखींचा स्वंथ करावा म्हणून गाडींतील अंथरुणावर आडवा पडलों. पण स्टेशनावरील झाडांवर खिळलेले डोळे मागें येईनात.

कांचेच्या खिडकीच्या चौकटींत बसलें गेलेलें झाडाचें तें दृश्य पाहात राहिलों. इतक्यांत वारा सुटला. पानें नाचूं लागलीं, फांद्या डोलूं लागल्या. मघां पाहिलेल्या चित्रांत क्षणोक्षणीं बदल होऊं लागला. मला दिसणारीं हीं चित्रें झाडांनाहि दिसत नव्हतीं आणि वाऱ्यालाहि समजत नव्हतीं.

इतक्यांत पाहिलें कीं, खिडकीच्या तावदानाची काच सगळीकडे सारखीच जाड नाहीं, गचाळ आहे. फांद्यांची आणि पानांची विकृति होत आहे. त्याचीहि मोठी मौज वाटूं लागली. निसर्गाला इतक्या विकृति साधल्या असत्या का ?

आणि ही विकृति तरी स्थिर असावी ? वाऱ्यामुळें फांद्या हलूं लागल्या म्हणजे पानांचीं विकृत स्वरूपें देखील बदलूं लागत. कांचेच्या जाड बाजूनें दिसणारीं पानें पातळ जागीं सरकलीं म्हणजे विकृति बदलून जाई.

कांचेचा एक कोपरा जेव्हां कारखान्यांत बनला तेव्हां कांचेच्या रसांत

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 30690 वि: विवेक
क्रांक 7460 दि. 9.10.85

भोवरे निर्माण झाले होते कीं काय कोण जाणे ! त्या बाजूच्या पानांच्या आकृतींत अशा कांहीं मजेदार विकृति होत कीं जणुं काय आकृतींचें प्रहसनच चालूं आहे. या प्रहसनाचा सूत्रधार कोण ? वारा कीं कांच ? अथवा दोहोंचा सहकार ? मग सूत्रधार कुणाला म्हणावें आणि नटी कुणाला म्हणावें ?

पानांच्या आकृतीची ही प्रतिभाशाली नवनवी लीला पाहातां पाहातां डोळे मस्त झाले. इतक्यांत आठवलें कीं, आतां आपल्या दोन्ही डोळ्यांनीं सारखें दिसत नाहीं. डाव्या डोळ्यानें जरा पुसट दिसतें. एवढें भान झाल्यावर समोरचें दृश्य क्षणभर उजव्या डोळ्यानें पाहावें व क्षणभर डाव्या डोळ्यानें पाहावें असा डोळ्यांनीं खेळ चालवला.

चित्ररसिकांना ठाऊक आहे कीं, कोणतेंहि दृश्य थोडेंसें पुसट किंवा अस्पष्ट झालें म्हणजे त्यांत एक प्रकारचें माधुर्य येतें. केव्हां केव्हां काव्यमय मादकताहि येते. कॅमेऱ्याचा फोकस जरासा अस्पष्ट करून फोटो घेणारे रसिक चित्रकार माझें म्हणणें ताबडतोब समजतील.

मनांत विचार आला कीं, या थोड्याशा क्षणांमध्यें किती तरी सृष्टींचें मीं अवलोकन केलें. झाडांची सत्यसृष्टि निराळी, वाऱ्यानें खेळवलेली निराळी, कांचेनें पीळ दिलेली सृष्टि निराळी आणि त्यांत होणारे फेरफार हे देखील त्या सत्यसृष्टीचेच नवे नवे अवतार. माझ्या अंधुक डोळ्यांनीं त्या सृष्टीला जें स्वप्नाळू रूप दिलें तें तर या सर्वांहून वेगळें.

आकारसृष्टीच्या या संसृष्टींतील एकहि सृष्टि खोटी किंवा मायारूप कशी म्हणतां येईल ? या सर्व सृष्टींचा साक्षी मीच. कांचेला बाह्यसृष्टींत कसलाच फेरफार करण्याचें सामर्थ्य नव्हतें. पण मला नवें नवें दर्शन घडविण्याचें सामर्थ्य त्या जड आणि अनघड कांचेंत विशेष होतें. वारा, कांचेंतील विकृति आणि माझ्या डोळ्यांतील दोष या सर्वांनीं माझ्यासाठी एकाच सृष्टीचे नवे नवे अवतार घडवून आणले. पण त्यांच्याकडे कर्ते-पणा मुळींच नव्हता. कांचेच्या रसानें तावदानें बनतांना थोडाच संकल्प केला होता कीं जीवमान असेतोंपर्यंत सगळ्याच गोष्टींचें विकृत दर्शन घडवून आणीन ? झाडांना थोडेंच ठाऊक होतें कीं अमुक वेळीं वारा

येऊन आपल्या फांद्या हलवील आणि त्याच वेळीं आगगाडी उभी राहून त्यांतील खिडकीची एक कांच आंतल्या पानांच्या आकृतीची अशी टवाळी करील, आणि एका सज्जनाचे दोन डोळे प्रत्येक दृश्याचा गैर-समज करून घेण्याचें व्रत घेऊन बसले असतील ?

असे विचार चालले होते इतक्यांत गाडी चालूं लागली. इतकी हळूहळू कीं गाडी खरोखर चालते आहे का नुसता भास होत आहे याचीच शंका वाटावी.

वारा, कांचेंतील दोष, डोळ्यांतील वार्धक्य या त्रिदोषांमध्यें गाडीची गति हा चौथा विक्षेप वाढला. मग मात्र ही दृश्यपरंपरा न्याहाळण्याचा छंद सुटून मन आइनस्टाइनच्या सापेक्षतावादाकडे आणि गौडपादाचार्यांच्या अजातिसिद्धान्ताकडे वळलें आणि एक कल्पना सुचून माझें मलाच त्याचें हसूं आलें. आइनस्टाइनचा सापेक्षतावाद म्हणे सृष्टीला समजून घेण्याची दृष्टि आपल्याला देतो. पण तो वाद समजून घेण्यांतदेखील विकृति निर्माण करणारा एखादा वारा किंवा अनघड कांच आपल्याला बाधत नसेल ना ? सर्व गोष्टींची चिकित्सा करणारें मनच जर त्या अनघड कांचेसारखें असलें तर त्यानें पाहिलेलें दृश्य आणि काढलेलीं अनुमानें विकृत नसतील कशावरून ?

कांचेचा रस अगदीं निर्मळ आणि शुद्ध असेल तर कांच सर्वत्र सारखीच जाड बनेल. आणि तिचे दोन्ही पृष्ठभाग पाण्याच्या पृष्ठभागासारखे सरळ असतील तरच तिला खऱ्या अर्थानें पारदर्शक म्हणतां येईल. 'जर अमुक असेल, जर तमुक नसेल' अशा अटींनीं वेष्टिलेलें हें जग आहे, ही गोष्ट कधींहि विसरतां कामा नये.

ज्याला केवळ आनंदच हवा आहे त्याला कोणतीहि विकृति अनिष्ट वाटणार नाहीं. आनंदाचा खरा उपासक असतोच सर्वपरीनें अलिप्त आणि अनासक्त !

पुष्पसाधना

आम्ही रोज सकाळीं सगळे मिळून प्रार्थना करीत असतों. कशीबशी प्रार्थना करून टाकायची असें वातावरण अजून तरी बनलेलें नाहीं. आम्हांला प्रार्थना आवडते. या निमित्तानें सकाळीं उठतांच एकमेकाला भेटूं शकतों, याचाहि आनंद आहे. प्रार्थनेचें वातावरण प्रसन्न, गंभीर असतें. प्रार्थना म्हणजे त्यांत देवाचें नांव आणि त्याचें ध्यान आलेंच पाहिजे, असाहि आमचा आग्रह नसतो. प्रार्थना म्हणजे जीवन-चिंतनाचें उन्नत वातावरण, अशीच आमची व्याख्या आहे. धुपाचा सुगंध आसपास पसरला म्हणजे जो एक प्रकारचा आल्हाद आणि संतोष नाकाला, डोक्याला आणि चित्ताला वाटतो तेंच वातावरण प्रार्थनेचें. चिंतन वाटेल त्या विषयाचें करावें; कल्पनेनें वसल्यावसल्या कोठूनहि हिंडून यावें, भराऱ्या माराव्या किंवा जुन्या अनुभवाचा रवंथ करावा, बंधन कसलेंच नाहीं. फक्त वातावरण उन्नत असावें, शुचिर्भूत असावें, प्रसन्न-मंगल असावें आणि जीवनाची खोली अनुभवावयास मिळाल्यामुळें जें समाधान असतें तें मिळावें, एवढीच अपेक्षा असते. आणि ही अपेक्षाहि आपोआप प्रार्थनेच्या वातावरणामुळेंच बांधली गेली आहे. त्या दिशेनें आम्ही विशेष प्रयत्न केला आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. प्रार्थनेनें स्वतःच स्वच्छंदतेनें हें वातावरण आम्हांला दिलें आहे. तिचा हा प्रसाद किंवा अनुग्रह म्हणा ना.

घरून उठून उपासनेच्या जागीं जातांना वाटेवर दोन्ही बाजूंनीं गोजिरवाणीं हसरीं फुलें आमचें स्वागत करतात. स्वागत म्हणण्यापेक्षां अभिनंदन करतात म्हणणेंच अधिक योग्य होईल. आपण मित्राच्या घरीं गेलों म्हणजे घरचीं मुलें एकदम हसूं लागतात. जवळ येऊन

बिलगतात. तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न विचारतात आणि स्वतःच्या गमती सांगतात. या सर्व प्रकाराला स्वागत म्हणतां येईल काय? आपल्याला पाहून मुलांना आनंद होतो, त्यांचा आनंद पाहून आपण आनंदित होतों, एकमेकांचा आनंद आपण वाढवतों, वृद्धिंगत करतों. याचेंच नांव अभिनंदन.

फुलांना हसतां येतें, बोलतां येतें. प्रसंगविशेषीं तीं आपली गोड टवाळी देखील करतात, पण त्यांना अभिनंदन शब्दाचा अर्थ विचारला तर तीं आश्चर्यानें आपल्याकडे पाहूं लागतील. त्यांना अभिनंदन समजत नाहीं, पण करतां येतें. समजत नाहीं म्हणून तर तें अभिनंदन इतकें मोहक-आल्हादक असतें.

प्रार्थनेला जातांना वेळेवर पोचण्याची घाई असते. फुलांशीं हस्तीदंती करण्यापेक्षा अधिक वेळ आमच्याकडे नसतो. प्रार्थनेंतून परत येतांना मात्र मन प्रफुल्ल झालेलें असतें आणि फुलें देखील सूर्यकिरणांनीं त्यांना गोड गुदगुदल्या केल्यामुळें उत्फुल्ल झालेलीं असतात. सगळ्याच फुलांवर कोवळे किरण पडलेले नसतात. कुठें छाया, तर कुठें ऊन. फुलांना त्याचें वैषम्य वाटत नाहीं. सगळींच ताज्या टवटवीत आनंदांत असतात. दरेकाचा रंग निराळा, आकृति निराळी. विशेष ध्यानपूर्वक पाहिल्यानंतर दिसून येतें कीं, प्रत्येक फुलाचा नखराहि अगदीं निराळा असतो आणि त्यांना त्याचें भानहि असतें.

तुम्ही त्यांच्याकडे बेदरकारीनें पाहिलें तर त्यांनाहि तुमचा अनुनय करण्याची गरज नसते. तीं आपल्या जगांत मस्त असतात. पण त्यांच्या व्यक्तित्वाचा स्वीकार करून व्यक्तिशः त्यांचा परिचय करूं जा, म्हणजे मग तुम्हांला त्यांचें प्रेम आणि त्यांची आत्मीयता मुबलक अनुभवावयास मिळेल. एकदा अशी गट्टी जमल्यानंतर मग जर तुम्ही त्यांच्याकडे न बघतां पुढें गेलांत तर प्रथम तीं कावरीबावरीं होतील, मग रागावतील, कट्टी करण्याची धमकी देतील. एवढ्यानें जर तुम्ही पस्तावलां नाहींत आणि त्यांच्याजवळ गेलां नाहींत तर मात्र तीं रुष्टी, हिरमुसलीं होतील. मग त्यांचा अनुनय करणें सोपें नाहीं. आपली अनास्था आपल्याला चांगलीच बाधते.

पण आमचीं हीं फुलें आमच्या अगदीं खेळीमेळीचीं झालीं आहेत. प्रार्थनेच्या प्रसन्नतेनंतर फुलांचें पुन्हा दर्शन होतांच अष्टसात्त्विक भाव – सात्त्विक तर खरेच पण विशेषतः ललित भाव – आणि कांहीं अंशीं दयित भाव मनामध्यें उठल्यावांचून राहत नाहींत.

एखाद्या लाजऱ्या मुलाला 'काय रे गुलामा' असें आपण म्हणतांच तो चट्दिशीं जीभ काढतो आणि दुसऱ्याच क्षणीं खुदकन् हसतो. आणि मग तोंड फिरवून धूम तरी ठोकील किंवा जवळ येऊन बिलगेल. या स्थावर फुलांना तसें कांहीं करतां येत नाहीं. पण प्रेमाच्या नजरेनें त्यांच्याकडे पाहतांच त्यांचा रंग एकदम उजळतो. त्यांच्या चेहऱ्यावर तरलता येते आणि सौंदर्याबरोबर माधुर्य आणि प्रेमहि ओसंडूं लागतें. आपल्याला तर धन्य वाटतेंच. पण फुलें देखील आपल्या दृष्टीनें तुष्टपुष्ट झाल्यासारखीं दिसतात.

सगळीं फुलें एकाच वेळीं जागीं होत नाहींत. कित्येक तर आपल्याला पाहतांच जांभई देतांना दिसतात. कित्येक ताजीतवानीं असतात, तर कित्येक 'काल आपण भेटलोंच आहोंत, तेव्हां आज नावीन्याचा आनंद कमी असणार, पण परिचयाची गोडी अधिक आहे,' असेंच आपल्याला स्पष्टपणें सांगत आहे असें वाटतें. आणि कित्येक फुलें दोनतीन दिवस लागलागट पाहिल्यानंतर आपल्याला त्यांच्या परिचित प्रेमाचा मिठा बसतो. मिठा म्हणजे कांहीं वीट नव्हे. पण एक प्रकारची अद्वैतसिद्धि आणि अलंबुद्धि असते. अनुभवानेंच ती कळून येते.

फुलांविषयीं बोलतांना सर्वसामान्य भाषा वापरणें मला आवडत नाहीं. प्रत्येक फुलाचा व्यक्तिगत परिचय झाल्यानंतर त्यांचेविषयीं नामरूपाच्या भाषेंतच बोलणें योग्य होईल. फुलांच्या जातींचीं नांवें तर आपल्याला परिचित असलींच पाहिजेत, पण ज्याप्रमाणें आपण घरच्या मुलांना त्यांच्या नांवांसकट ओळखतों, त्याचप्रमाणें स्वतःच्या बगिच्यांतील फुलांना व्यक्तिगत नांवें देण्याची गरज आपल्याला भासली पाहिजे. माझी खात्री आहे कीं, फुलांच्या प्रणयसाधनेंत रममाण होणारे चार-आठ पुष्पप्रेमी गोळा झाले, तर दरएक फुलाचें नांव ठेवल्यावांचून

त्यांना आपला पुष्पानंद एकमेकांत वाटतांच यावयाचा नाहीं.

फुलें फार दिवस टिकत नाहींत. कळी बसणें, ती उघडणें, तिचें हसून प्रफुल्ल होणें यांत थोडाच वेळ जातो. पुढें तीच कळी जेव्हां व्युत्पन्न-प्रौढ फूल होऊन सूर्याला आपली छाती दाखवते तेव्हा वाटतें, कीं या फुलाचें यौवन पुष्कळ दिवस टिकायला हरकत नाहीं. फूल फुललेलें असतें तोंवर हळुवारपणें किंवा उन्मत्तपणें आपला सुगंध पसरवितें. आनंद घेतें आणि देतें. पण या आनंदमय जीवनाची प्रौढी सिद्ध होतांच फुलाला उपरति होते. त्यांना उपराग येतो आणि मग बघतांबघतां तीं फुलें कोमेजून जातात. अशा अल्पजीवी फुलांचें व्यक्तिशः नामकरण करून फायदा कितीसा असणार? पण फुलें अल्पजीवी असलीं तरी त्यांची स्मृति दीर्घकाळ टिकूं शकत नाहीं असें थोडेंच आहे? सर्वच फुलांविषयीं मी म्हणत नाहीं, पण कित्येक गुलाब, चंपक आणि हिरवा चांफा याविषयीं सांगूं शकेन कीं कोणचीं फुलें केव्हां व कुठें पाहिलीं होतीं, आणि त्यांच्या सुगंधानें कसा भारला गेलों होतों, याची आठवण अजूनहि पुसून गेलेली नाहीं. तेव्हां अशा फुलांचें जर नामकरण झालेलें असतें तर नामजप करण्याची चांगली सोय झाली असती.

फुलांना नुसता वास असतो. बऱ्याचशा फळांना नुसता रस असतो. पण केव्हां केव्हां रस आणि सुगंध यांचें मिश्रणहि होऊं शकतें. संत्रीं, सफरचंद वगैरे कित्येक फळांचा सुगंध चांगलाच दरवळतो. त्याला आपण घमघमाट म्हणूं शकतों. सुगंध आणि स्वादिष्ट रस यांचें रसायन एकाच काळीं नाकाला, जिभेला आणि गळ्याला आनंद देतें आणि त्याबरोबर डोळेहि नेत्रसुखांत रममाण होतात. इंग्रजी शब्द फ्लेव्हर (Flavour) उच्चारतांच मला रस आणि गंध यांच्या मिश्रणाची कल्पना होऊं शकते. अशा तऱ्हेचा सरस, गडद सुगंध हिरव्या चांफ्याचा असतो. मधमाश्यांनीं गुलाबाच्या फुलांतून मध गोळा केला म्हणजे त्या मधांत ज्याप्रमाणें गुलाबांची खुशबू भरलेली असते आणि ती नाकापेक्षां गळ्यालाच उत्कटपणें जाणवते, त्याचप्रमाणें हिरव्या चाफ्याच्या सुगंधाचें आहे. हिरव्या चांफ्याच्या पाकळ्या तर इतर कोणत्याहि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 30215 दि. 12.6.15
क्रमांक 7560 नोंद दि. 20/4/15

फुलाच्या पाकळ्यांपेक्षां जाड. केव्हां केव्हां वाटतें कीं हिरव्या चाफ्याचीं फुलें चावून खाण्यासाठींच निर्माण झालीं आहेत. पण फुलें चावणें हा कांहीं संस्कारी व्यापार नव्हे. आपण अत्तर वापरतों. पण फुलें उकळून त्यांचें अत्तर करायला कुणी मला सांगितलें तर मी साफ सांगेन कीं, तुम्हीं म्हणतां तसला निर्दय प्रयोग मला साधायचा नाहीं.

फुलांना पाहतांच आपलें मन देखील फुलांइतकेंच नाजुक, कोमल, विनयशील आणि मोहक झालें पाहिजे. विनयशील हें विशेषण सर्वच फुलांना लागू करतां यावयाचें नाहीं. कांहीं फुलें नखरेबाज असतात, तर कांहीं फुलें धीटपणें टकमक टकमक पाहत असतात. आणि निर्लज्जपणाची कमाल करणारें फूल म्हणजे हॉलीहॉक. झाडाच्या छडीला लागूनच तें उगवतें, छाती पुढें काढून सर्व बाजूंनीं पाहत सुटतें. यांतच हॉलीहॉकचा आनंद असतो. या फुलांना फुलांच्या संमेलनांत जाऊन बसणें आवडणार नाहीं असें त्यांच्याविषयीं माझें मत झालें आहे.

ज्याला आपण मखमलीचें फूल म्हणतों त्याला इंग्रजींत 'कॉक्स कोंब' म्हणतात. त्याला फूल म्हणावें किंवा नाहीं याविषयीं मी माझ्या मनाशीं अजून ठरवूं शकलों नाहीं. मखमलीच्या फुलाला फूलहि म्हणतां यावयाचें नाहीं व मंजरीहि म्हणतां यावयाचें नाहीं. कदाचित् त्या फुलाला 'झालरफूल' म्हणतां येईल.

प्रार्थनेच्या वातावरणांतून बाहेर येतांच फुलांचें दर्शन घडतें यामुळेंच कदाचित् त्या फुलांचें चैतन्य विशेष उत्कटपणें उमलून येत असावें.

परवा विद्यार्थ्यांनीं मला त्यांच्या एका वार्षिक समारंभाला बोलाविलें होतें. साहित्य आणि जीवन यांसारखा ऐसपैस विषय त्यांनीं चर्चेला घेतला होता आणि विषय चांगलाच रंगांत आला होता. यामुळें मी स्वतःचे अनुभव आणि विचार तरुण पिढीपुढें अगदीं उत्कट वृत्तीनें मांडत होतों.

पण त्याच वेळीं मेजावर असलेल्या फुलदाणींतील फुलांकडेहि माझें लक्ष तितक्याच उत्कटपणें खिळलेलें होतें. असलें द्वयावधान मलाच

साधतें असें नव्हे; पुष्कळांना साधत असेल. जीवनाचा आणि साहित्याचा उत्कटपणें आस्वाद घेतां यावा आणि तशी शक्ति वाढवणें म्हणजेच खरी संस्कारिता आहे, हें विद्यार्थ्यांना जीव तोडून सांगत असतांना फूलदाणींतील फुलांच्या रंगाचा, आकृतीचा, त्यांच्या टवटवीचा, आणि त्यांच्या जीवनानंदाचा आस्वाद मी घेत होतों. सोन्याच्या रंगांत सुधारणा करावयाची असली तर या फुलांकडे पाहूनच आपल्याला तशी सुधारणा सुचेल असा विचार मनांत आला. इतक्यांत एक मोठ्या नैसर्गिक प्याल्याची पुष्पकळी मजकडे टक लावून पाहूं लागली. मी तिच्याकडे पुरतें ध्यान दिलें नाहीं, याची जणु कांहीं तक्रार करीत ती माझें ध्यान आपल्याकडे खेचत होती. फूलदाणी जराशी फिरवली, थोडीशी सरकवली तर त्या कळीची शोभा अधिक खुलून दिसेल असें वाटून मीं फूलदाणी जरा हलवली. त्याबरोबर फूलदाणींतील सगळींच फुलें जराशीं डोललीं. त्याचें दर्शन गतिमान् होतांच फुलांतील चैतन्य विशेषपणें जाणवूं लागलें आणि मग आपोआप माझा हात त्या फूलदाणीला मधूनमधून चालना देऊं लागला. आणि दर्शनानंद वृद्धिंगत करण्याचा आपल्याला एक सुंदर उपाय लाभला या कल्पनेनें मन विशेष प्रसन्न झालें.

आणि मग त्या फुलांच्या दर्शनानें कमावलेल्या दृष्टीनें मी माझें भाषण एकाग्रपणें ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पाहूं लागलों.

आमची पिढी आतां जुनी होत चालली. नव्या पिढीची अभिरुचि निराळी, त्यांचे प्रश्न निराळे, त्यांची मृगया निराळी हें खरें असलें तरी आपल्या पिढीच्या अनुभूतीचा थोडा तरी भाग त्यांच्या जीवनांत पेरावा आणि त्यांचें जीवन त्या मानानें समृद्ध करावें अशा हेतूनें त्यांच्याशीं मी बोलत होतों आणि फुलांप्रमाणें त्यांच्या विचारांना चालना देत होतों.

व्याख्यान आटपून घरीं आलों. तरीहि फुलांचें वातावरण चित्तांत भरलेलें होतेंच. डोळ्यांना सर्वत्र फुलेंच फुलें पाहण्याची गोडी लागली होती. घरीं दिवसभराचा खेळ आटपून आणि खेळणीं अस्ताव्यस्त फेकून मुलें शांतपणें निजलीं होतीं. सिद्धार्थ जागा असता तर त्यानें माझ्याकडून

रोजच्या तीन कहाण्या हक्कानें वसूल केल्या असत्या. पण तो दिवस-भराच्या श्रमानें गाढ निजला होता. मधूनच त्याचे ओठ जरा हालत. चेहऱ्यावर नाजुक स्मिताचा आभास चमकून जाई. त्याचा तो प्रसन्न टवटवीत चेहरा पाहतांच ना. वा. टिळकांची कविता एकाएकीं आठवली :

आकाशांत फुलें, धरेवर फुलें, वाऱ्यावरीहि फुलें ।
माझ्या गेहिं फुलें सुगंध सुटले... हें विश्व कोंदाटलें ॥

कवि म्हणतो, जिकडेतिकडे फुलेंच फुलें पसरलेलीं आहेत. त्यांना नांवें निरनिराळीं असोत, – पण शेवटीं तीं सर्व फुलेंच आहेत, याविषयीं मनांत शंका राहत नाही. अखंड चमकण्यासाठीं फुलें आकाशांत गेलीं म्हणजे आपण त्यांना नक्षत्रें म्हणतों. तींच फुलें आकाशांत भराऱ्या मारून अवकाशाचा ठाव पाहूं लागलीं म्हणजे आपण त्यांना पांखरें म्हणतों. घरांत नाचतबागडत कल्लोळ करण्याचें फुलांना सुचलें म्हणजे आपण त्यांना मुलें म्हणतों. हींच फुलें निरनिराळ्या रंगांची चमक अजरामर करण्याच्या हेतूनें पृथ्वीच्या पोटांत शिरलीं म्हणजे त्यांना रत्नें म्हणतों आणि पृथ्वीच्या पोटांतून बाहेर काढून आपण त्यांना आपल्या बोटांवर किंवा गळ्यांत खेळवतों आणि हींच फुलें अदृश्य रूपानें आपल्या चित्तांत शिरून आपल्या चमत्कृतींनीं गुदगुल्या करूं लागलीं म्हणजे आपण त्यांना कविकल्पना म्हणतों. नांवें कोणतींहि द्या, हीं सगळीं फुलेंच आहेत याविषयीं मनांत शंका उरत नाहीं.

आणि याच फुलांना कंठांत शिरून आलाप घेण्याचें सुचलें म्हणजे आपण त्यांना गीतें म्हणतों.

खरोखर हीं बहुरूपी, बहुगुणी फुलेंच आपल्याला ईश्वराचें स्मरण करून देण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांचें म्हणणें आहे कीं जीवनाचा उद्देश आहे एकच : आनंद द्विगुणित करणें. अनुभूति आटवून तिचें मिष्टान्न करणें आणि त्याचा सुगंध सर्वत्र पसरवणें. जीवनमात्र यासाठींच आहे. ही साधना बाह्य सृष्टींत आणि चित्सृष्टींत अखंड चालू आहे आणि चालू राहणार. उत्फुल्ल जीवन हाच परमानंद. प्रत्येक क्षण अनंत असतो, या अनुभूतींतच त्याची परिणति व्हायची असते.

नर-भूषा तु दाढिका

सध्यांचें पुरुषयुग दाढीवर नाराज झालेलें दिसतें. जो पाहावा तो सकाळीं उठल्याबरोबर दाढीवर शस्त्र चालवतो. कित्येक लोक तर सूर्यास्तानंतर देखील अनिवार्यपणें दाढीवर शस्त्र चालवतात. प्रथम दाढी गेली, पुढें मिशी लांबीरुंदीनें आंखूड झाली. आतां तर तीहि साफ होऊं लागली आहे.

अशा संकटकाळीं जर इतिहासाचें एक अद्‌भुत प्रकरण वाचकांपुढें रुजू केलें तर त्यांना तें खरेंहि वाटणार नाहीं. इजिप्तच्या कांहीं राण्या गादीवर बसल्याबरोबर आपल्या नाजुक गालांवर आणि हनुवटीवर कृत्रिम दाढी चढवूं लागल्या. कां तर म्हणे पुरुषांवर राज्य करावयाचें आहे ! दाढी पाहिल्यावांचून मंत्री, सेनापति आणि पौरजन आज्ञेचें पालन कसें करतील ? राज्य चालवायला राजदंडापेक्षां दाढीची आवश्यकता त्यांना अधिक भासली.

आपल्या देशाचा इतिहास पाहतां, आपले प्राचीन देव दाढी-मिशी वाढवीत नव्हते आणि ऋषिलोक कधीं दाढी करीत नव्हते. यामुळें दाढी-वाल्या इसमाला पाहतांच आपल्या लोकांना ऋषिमुनींचें स्मरण होतें. सामान्य गृहस्थाश्रमी जर दाढी वाढवायला गेला तर लोक त्याला अभद्र प्रश्न विचारतात, " सुतक आलेलें आहे कीं काय ? "

कित्येक भटजी पुरश्चरणाला बसले म्हणजे ' पंचकेशी ' वाढवितात. व्रतस्थ असल्याचें तें एक लक्षण आहे म्हणे. दक्षिणेकडे आणखी एक प्रकारचा रिवाज दिसून येतो. बायको गरोदर आहे असें दिसून येतांच नवऱ्याला दाढी वाढवावी लागते. नवऱ्याला अशा रीतीनें व्रतस्थ राहिलेलें पाहून बायकोला परमसंतोष होत असला पाहिजे. नवरा प्रवासाला गेला

तर पत्नी एकवेणीधरा राहत असे. त्याचप्रमाणें पत्नी गरोदर असेतों-पर्यंत पतीनें दाढीधर किंवा स्मश्रुधर राहिलें पाहिजे हा समानतेचा न्याय दक्षिणेप्रमाणें उत्तरेलाहि मान्य झाला पाहिजे !

ऋषिमुनींनंतर दाढीचा पुरस्कार करण्यांत आपल्या देशांत मुसल-मान आणि शीख यांची गणना होते. हिंदूंनीं दाढी काढून शेंडी ठेवली, मुसल्मानांनीं बरोबर याच्या विरुद्ध जाऊन डोकें साफ करून दाढी वाढ-विण्याचें ठरविलें. संस्कृतिभेद सर्व बाजूंनीं स्पष्ट झाला पाहिजे.

शीख लोक याहून अधिक तर्कनिष्ठ आहेत. संन्यासी गळ्याच्या वरचा सगळा भाग साफ करूं लागले तो इथवर कीं, बिचाऱ्या भुंवयादेखील त्यांच्या तडाख्यांतून सुटल्या नाहींत. अहिंसक जैन साधूंनीं वस्तऱ्यासारखें घातक शस्त्र न वापरतां चिमट्यानें दाढी-मिशी-केस उपटून काढण्याचें ठरविलें, हें पाहून शीख लोकांना केसांची दया आली आणि त्यांनीं ठरविलें कीं, उत्तमांगाच्या एका केसाला देखील धक्का लावायचा नाहीं. दाढी-मिशी-केस – सर्वांना अशा रीतीनें अभयदान मिळाल्यामुळें उवांना फार आनंद झाला. त्यांनीं या 'अभयारण्यांत' वस्ती करण्याचें ठरविलें ! पण शीख कांहीं जैन नव्हेत कीं कृमिकीटकांचें पालन करतील ! त्यांनीं दह्यासारख्या जालीम आम्ल पदार्थांची मदत घेतली आणि अभयारण्यांत देखील उवा निर्वंश झाल्या.

शीख लोकांनीं दाढीमाहात्म्य वाढवल्यानंतर दाढीच्या विस्तारांत आपोआप विविधता आली. शीख लोकांत अधिकांश जाट लोक असल्यानें दाढी अधोमुख न राहतां हनुवटीकडे विभक्त होऊन दक्षिण आणि वाम अशा दोन्ही दिशांनीं फैलावली.

दाढीचा विस्तार तर कमी करतां येत नाहीं आणि तिला काबूंत तर ठेवलें पाहिजे, अशा परिस्थितींत शीख लोकांनीं युरोपियन बायकांप्रमाणें जाळी वापरण्याचा रिवाज सुरू केला आहे. कित्येक लोक दाढीला हवा तसा आकार देऊन रात्रीं पट्ट्यानें बांधून ठेवतात आणि दिवस उगवतांच दाढीला मोकळी सोडून गांवांत मिरवतात. बायकोला कह्यांत ठेवून स्त्रीस्वातंत्र्यावर लांब लांब व्याख्यानें देण्यासारखाच हा प्रकार आहे.

येथवर झाला स्वदेशांतील दाढीचा इतिहास. पण स्वराज्य झाल्यानंतर आतां स्वदेशाबाहेर पाहिलेंच पाहिजे. आपल्या येथें जो उठला तो इंग्रजी पुस्तकें वाचून युरोपमधील माहिती आपल्या लोकांपुढें मांडीत असतो. मला अशांचें अनुकरण करावयाचें नाहीं. तेव्हां युरोपांतील फ्रेंच कट, रशियन कट, मार्शल मुस्टॅच, पार्शल मुस्टॅच वगैरे प्रकारांचें रसाळ वर्णन न करतां मी आफ्रिकेकडे वळूं इच्छितों.

सहाराच्या दक्षिणेकडे ज्या निग्रो, बांटू वगैरे जाती राहतात त्यांचे केस मेंढरासारखे असतात. असे केस डोक्यावर वाढूं दिले तर त्यांचें केवढें कान्तार माजतें हें मी ॲबिसीनिया किंवा एथियोपिया या देशांत पाहिलें. पूर्व किंवा दक्षिण आफ्रिकेचे लोक आतां दाढी वाढवूं धजतच नाहींत. कारण घामानें भरली असतां ती धुऊन काढणें सोपें नाहीं. पण दाढीचें खरें संकट मीं पाहिलें तें सहाराच्या वाळवंटाच्या आसपासच्या मुसल्मानांचें. धर्माप्रमाणें त्यांना दाढी तर वाढवावी लागते आणि वारा जोरानें वाहूं लागला म्हणजे वाळवंटांतील रेती आश्रयासाठीं दाढींत दडी मारून बसते. स्वछंद विहार करणाऱ्या उवांपेक्षां दडी मारून बसणाऱ्या या वाळूचा भार अधिक. शेवटीं तिकडील लोकांनीं डोक्यावरील फेट्याचें शेपूट जरा लांब ठेवून तें दाढीभोंवतीं गुंडाळण्याचें ठरविलें. कित्येक तर गळ्याभोंवतीं उपरणें गुंडाळून त्यांत आपली दाढी लपवतात.

नुकताच चीन-जपानकडे जाऊन आलों आहें. तेथें तीन आठवड्यांत जेवढें संशोधन करतां आलें त्यावरून सांगूं शकतों कीं तेथील लोकांना दाढी बेताचीच उगवत असल्यामुळें प्राचीन राजे लोकांनीं तिची मोठ्या आस्थेनें जोपासना केली होती. ओठांवरील मिशी अगदींच बेताची आणि ओठांच्या टोकाकडील मिशीचे केश मनसोक्त वाढणारे असें पाहून त्यांनीं दोन्ही टोकांच्या मिशा खोलवर वाढूं देऊन त्याच्या टोकाला लिंबू टांगण्याचा प्रयोग केला होता म्हणे ! मला हें खरें वाटत नाहीं. चिनी-जपानी लोकांची तुरळक दाढी पाहिली म्हणजे देवानें यांना अधिक केस दिले असते तर बरें झालें असतें असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

या लोकांचे डोक्यावरील केस मात्र काळेकुळकुळीत, पण अस्वला-

सारखे राठ असतात. पण ते त्यांच्या चेहऱ्याला शोभतात उत्तम.

मीं वर आधुनिक पार्शल मुस्टॅचचा उल्लेख केला आहे. पार्शल मुस्टॅच म्हणजे नाकाच्या रुंदीइतकीच, किंवा त्याहून कमी मिशी ठेवून बाकीची साफ करावयाची. वरच्या ओठाच्या टोकावर केसांचा लहानसा झुबका पुढें आला म्हणजे मनुष्याचा चेहरा उठावदार दिसतो हें खरें. काश्मीरकडच्या मुसल्मानांनीं याच्या उलट प्रकार चालू करण्यांत मोठी सोय पाहिली आहे. दाढी-मिशा दोन्ही यथेच्छ वाढूं द्यावयाच्या आणि नाकाच्या रुंदीइतका मिशीचा भाग वस्तऱ्यानें साफ करावयाचा. पाणी पितांना किंवा जेवतांना घास घेणें या रीतीनें सोपें जातें. पुढले दांत जर शोभिवंत असले तर मिशीचा अंतराय दूर झाल्यामुळें ते उठावदार दिसतात, पण चेहऱ्याची शोभा वाढते असें मात्र म्हणतां येत नाहीं.

मिशीच्या दोन्ही टोकांना लिंबें लटकावण्यापेक्षां मिशीला ताव देऊन त्या राठ मिशीच्या टोकावर दोन लिंबें ठेवून देणें हें मर्दुमकीला शोभणारें आहे. तानाजी मालुसरे म्हणे या बहादुरींत पटाईत होते. कथकलीचें सोंग काढून नाकाच्या टोकावर लिंबू बसवण्यापेक्षां मिशीच्या आंकड्यावर लिंबू ठेवणें केव्हांहि इष्टच आहे.

इकडून तिकडून गोळा केलेलें इतिहाससंशोधन बाजूला ठेवून आतां आपण थोडेंसें दाढीमनन करूं या.

देवाच्या राज्यांत – निसर्गाच्या राज्यांत म्हणा हवें असल्यास – निरर्थक असें कांहींच नसतें. कपाळावरील घाम डोळ्यांत शिरूं नये म्हणून निसर्गानें डोळ्यांवर भुवईचीं दोन छपरें केलीं. कानां–नाकांच्या सूक्ष्म इंद्रियांच्या संरक्षणासाठीं दोहोंच्या तोंडीं निसर्गानें केस वाढवले. पण दाढीचा उपयोग काय ? थंडीपासून रक्षण म्हणावें तर कपाळ आणि नाक उघडें पडूं देऊन निसर्गानें पक्षपात कां केला ?

कित्येक लोक म्हणतात कीं, ज्याप्रमाणें मोराचा पिसारा लांडोरीचें आकर्षण करण्यासाठीं असतो त्याप्रमाणें दाढीचा पसारा स्त्रियांना मोहित करण्यासाठीं असतो. पण या बाबतींत स्त्रियांचाच अभिप्राय घेतलेला चांगला. दाढी-मिशी दोहोंना रजा देऊन आणि डोक्यावरील

केसांचा भांग पाडून स्त्री-पुरुषांतील भेद कमी झालेला स्त्रियांना आवडतो, असा सध्यांच्या मनूचा निर्णय आहे.

तें कसेंहि असो, ज्याप्रमाणें ईश्वरानें नाक चश्मा ठेवण्याच्या सोईसाठीं केलें आहे असें सिद्ध झालें आहे त्याचप्रमाणें दाढीहि सकाळीं तोंड पाहण्यासाठीं आणि चेहऱ्याची मशागत करण्यासाठीं आहे असेंहि सिद्ध करतां येईल. संस्कृतीमध्यें जसजसा पालट होत जातो, तसतसें दाढीचें प्रयोजन आणि रूप बदलत जातें, एवढें मात्र निर्विवाद सिद्ध आहे. आपल्या पूर्वजांनीं पक्षपात टाळण्यासाठीं आपल्या साधुपुरुषांना 'जटिलो मुण्डी लुंचित केशः' असा त्रिविध मार्ग मोकळा ठेवला होता. आपली आर्यसंस्कृति सर्वांगपरिपूर्ण होती हें यावरून सिद्ध होत नाहीं का ? ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३७२१५ वि: ललांबंध
क्रमांक १५६० नों वि: १५।३।५५

चूल

जीं पापें केल्यावांचून सुधारलेल्या मनुष्याला जगणेंच शक्य नाहीं त्याला आपल्या पूर्वजांनीं 'सूना' असें म्हटलें आहे. 'सूना' शब्दाचा मूळ अर्थ आहे कत्तलखाना.

मृग पक्षि वधस्थानम् : सूना

आपण शेती करतों. तेथून धान्य आणून तें कांडतों, चुलीवर शिजवतों. थंड पाणी प्यायला मिळावें म्हणून रांजण भरून ठेवतों, घर साफ रहावें म्हणून छपरापासून जमिनीपर्यंत आणि देवघरापासून मोरीपर्यंत केरसुणी चालवतों. या सर्व क्रियांच्या द्वारां आपण किती तरी सूक्ष्म जीवांची हत्या करतों.

या गोष्टीकडे आपलें लक्ष गेलेलें नसतें तोंपर्यंत चित्त अस्वस्थ होण्याचें कारण नाहीं. परंतु मनुष्य सूक्ष्मपणें विचार करूं लागला म्हणजे या सर्व गोष्टींकेडे त्याचें लक्ष गेल्यावांचून राहात नाहीं. मग काय करावयाचें ? या सर्व गोष्टी सोडून जंगलांतील पशूंप्रमाणें रहावयाचें ? तें आपल्याला शक्य नाहीं. तेव्हां विचारपूर्वक मन अगोदर कोवळें करावयाचें आणि मग आपली लाचारी ओळखून पुन्हां तें कोडगें करावयाचें. याला म्हणतात सुधारणा.

* * *

एकदां भीष्माचार्यांना कोणीसें विचारलें कीं आहारांत मांसाचा त्याग करावा कीं नाहीं ? त्या काळीं समाजांत हा मोठा चर्चेचा विषय होता आणि जनकासारखे सुधारक मांस सोडून द्यावें असें म्हणत असत. भीष्माचार्यांनीं अगदीं थोडक्यांत सांगितलें कीं मांस इतकें स्वादिष्ट असतें, पौष्टिक असतें कीं तें सोडावें असें म्हणण्यास माझें मन धजत

नाहीं. एवढा थोर, हिमालयासारखा चारित्र्याचा दिक्पाळ असें म्हणाला, याचें आपल्याला आश्चर्य वाटायला नको. विशिष्ट प्रकारचे पोषक जंतु दुधांत सोडून देऊन आपण दुधाचें दहीं बनवतों. हे जंतु इतर सर्व जंतूंना मारून टाकून दुधांत आपलें साम्राज्य सामावतात, आणि दुधाचें दहीं बनवतात. हे जंतु आपल्या आंतड्यांत गेले म्हणजे अनेक रोगांचा नाश करून आपलें आरोग्य वाढवतात. सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिलें असतां हे जंतु दह्यांत भरगच्च नाचत असतात, हें स्पष्ट दिसतें. तेव्हां ही कांहीं कल्पनेनें मानावयाची गोष्ट नव्हे.

इतकी सगळी माहिती मिळाल्यानंतर ज्यानें दूध, दहीं खाण्याचें सोडून दिलें आहे असा एकहि मनुष्य आपल्या नजरेस पडणार नाहीं. जीवन-यात्रा सुरळीत चालावी हा प्रधान सिद्धान्त स्वीकारून मग जी कांहीं सत्यनिष्ठा, धर्मनिष्ठा आणि जीवनिष्ठा कमावतां येईल तेवढी कमवावी याचें नांव सुधारणा.

या भूमिकेवरून आपण चुलीचा विचार केला पाहिजे.

* * *

चुलीचें मूळ स्वरूप म्हणजे तीन धोंडे, या तीन धोंड्यांवर एखादें भांडें चपखल बसेल आणि खालीं लाकडें पेटत राहातील इतका अवकाश मिळेल अशा व्यवस्थेला चूल म्हणतात. या चुलींचा विकास आपल्या देशांत बराच झाला आहे. एका चुलीला लागून दोन-दोन तीन-तीन वायले आपण तयार करूं लागलों. चुलींतील आगीला वाऱ्याचा पुरवठा चांगला होईल आणि चुलीला चोंदून टाकणारी राख खालीं पडेल अशी व्यवस्था आपण केली. चुलीची उष्णता वायां जाऊं नये म्हणून आपण अनेक युक्त्या योजल्या.

एका बाजूनें चूल घरांत स्थिरपणें राहावी असेहि प्रकार आपण केले आणि दुसऱ्या बाजूनें वाटेल तेव्हां, वाटेल तेथें चूल थाटतां यावी अशा तऱ्हेतऱ्हेच्या शेगडयाहि आपण केल्या.

चुलीसाठीं आपण इन्धनाचे प्रकारहि पुष्कळ केले. लाकडें, पाचोळा, गोवऱ्या, लाकडाचा भुसा, कोळसे असे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ आपण वापरूं

लागलों. पुढें इन्धन म्हणून तेलहि वापरण्यांत आलें. मध्यंतरीं 'स्पिरिट ऑफ वाइन' देखील आपण वापरलें आणि आतां तर गॅसच्या चुली वाढूं लागल्या आहेत.

याच्या पुढची पायरी म्हणजे द्रौपदीचें भाग्य आठवून सूर्यप्रकाशानें अन्न शिजवून देणाऱ्या चुलीचा शोध. ही जर 'हेली चुल्ली' स्वस्तांत तयार होऊं लागेल तर उन्हाळ्यांत विजेच्या चुली कुणी वापरणार नाहीं. संस्कृतांत व ग्रीक भाषेंत सूर्याला 'हेली' म्हणतात.

येथवर आपण चुलीच्या शास्त्रीय वातावरणाचा विचार केला; पण सामाजिक दृष्टीनें जर पाहिलें तर चूल हें कुटुंब-संस्थेचें प्रतीक आहे. ज्यांनीं वेगळी चूल केली ते आपले राहिले नाहींत असें प्रत्येकाला वाटतें. एखाद्या घरच्या सर्व लोकांना त्यांच्या पाहुण्यांसहित आपण जेवायला बोलावतों तेव्हां आपण म्हणतों कीं आज तुमच्या चुलीला आमंत्रण आहे.

आपले पूर्वज धर्माचा सूक्ष्मपणें विचार करणारे होते. त्यांनीं ठरवलें कीं या चुलीला देखील कधीं तरी विसांवा मिळाला पाहिजे. अखंड तप करायचें आणि सर्वांना जेवूं घालायचें तर चुलीनें स्वतःकडे केव्हां पहावें! म्हणून त्यांनीं शिळा सप्तमीचा सण तयार केला. षष्ठीच्या दिवशीं खाण्याचे सर्व पदार्थ तयार करावेत आणि हे शिळे पदार्थ सप्तमीच्या दिवशीं खाऊन चुलीला त्या दिवशीं आराम द्यावा.

* * *

चुलीची पवित्रता फक्त आपल्याच लोकांनीं मानली आहे असें नाहीं. परदेशांतील लोक देखील हार्थ (Hearth) आणि होम (Home) हे शब्द समानार्थक मानत आणि या जोडीच्या द्वारां कुटुंब-संस्थेचें पावित्र्य व्यक्त करीत. याच्या पुढें जाऊन लोक असेंहि मानत कीं जो मनुष्य आपल्या घरीं जेवला, ज्यानें आपलें मीठ खालें तो आपल्याशीं कधींहि प्रतारणा करणार नाहीं. म्हणून त्याला नेहमीं अतिथी किंवा पाहुणा समजून स्वकीय मानायचा. त्यानें जरी दगा दिला तरी आपण त्याला दगा देतां कामा नये. ज्याला अन्न दिलें त्याला मरण कसें द्यावयाचें?

भोजन–भाऊ या शब्दाचा मूळ अर्थ पवित्र आणि थोर होता.

ज्यानें आपल्या चुलींतील भाकर खाल्ली तो आपला साथी झाला. या भावनेनेंच इंग्रजींतील 'कंपॅनियन' हा शब्द आलेला आहे. कंपॅनियन म्हणजे अक्षरशः भाकर–भाऊ. जे लोक एकत्र बसून जेवतात ते कंपनियन. आपल्या लोकांत लहानसें कोंडाळें करून जेवायला बसणें अशुभ मानलें आहे. जेवण मधें ठेवलें आणि त्याच्या आसपास आपण थोडे लोक जेवायला बसलों तर त्या सर्वांना जगाकडे पाठ करावी लागते. आपल्या लोकांना हें कधींच पसंत पडलें नाहीं. आपण नेहमीं पंक्तीनें बसतों. ज्यांना आपण पंक्तीला घेतले ते आपले झाले. या पंक्तीचें पावित्र्य उद्घोषित करण्यासाठीं आपल्या पूर्वजांनीं वेदांतील 'त्रिसुपर्ण सूक्त' वापरलेलें आहे. 'ये ब्राह्मणाः त्रिसुपर्ण पठन्ति, ते सोमं प्राप्नुवन्ति।' हें तर ठीक पण 'आसहस्रात् पंक्तिं पुनन्ति।' पंक्तीला हजार लोक का बसलेले असेनात त्या सर्वांचे दोष विसरून जाऊन त्या सर्वांना आपलेसें करण्याची शक्ति या सूक्तांत असल्याचें मानलें आहे.

अन्नब्रह्माला अनुकूल रूप देऊन तें खाण्यायोग्य करणें हें चुलीचें काम आहे. चुलीनें सर्वांचीं पोटेंच नव्हे तर हृदयें देखील एकत्र केलीं जातात.

घरांत नववधु आली, गृहलक्ष्मी म्हणून तिचा स्वीकार केला तरी तिला घरांतले सर्व अधिकार ताबडतोब मिळत नसतात. घरच्या पुरंध्रीनें सुनेच्या हातीं चुलीचा कारभार देतांच ती घरची मालकीण होते. त्या दिवशींची धन्यता सुनेच्या चेहऱ्यावर अगदीं स्पष्ट उमटलेली असते. चूल म्हणजे गृहस्थाश्रमाचें प्रतीक, आत्मीयतेची दीक्षा आणि कुलपरंपरेचें संरक्षण होय.

■

मूर्तीचा संभव

एक होता मूर्तीकार. आपल्या ध्यानाच्या मस्तींत वाटेल तिकडे भटकत होता. त्यानें एका खडकाळ प्रदेशांत एक मोठा धोंडा पाहिला, त्याला त्या धोंड्यांत कांहींसें दिसलें.

सुंदर पिकलेलें द्राक्ष, प्रकाशासमोर धरतांच, ज्याप्रमाणें आपल्याला आंतील द्राक्षाची बी दिसते, अथवा एक्स-रेच्या द्वारा माणसांच्या शरीरांतील हाडें स्पष्ट दिसूं लागतात, त्याचप्रमाणें मूर्तिकाराला त्या धोंड्यांत देवीची मूर्ति दिसली. फरक इतकाच कीं टवटवीत आणि आकर्षक द्राक्षाच्या पोटांत आपल्याला त्याची खडबडीत बी कशीशी दिसते. तारुण्याचें लावण्य ओसंडणाऱ्या मानवशरीरांत एक्स-रेच्या डोळ्यांनीं भयानक असा हाडांचा सांगळा दिसतो, कारण दोन्ही ठिकाणीं आपण पार्थिव दृष्टीनें पाहत असतों. मूर्तिकाराच्या पार्थिव नजरेला, ब्रह्मदेवानें बनवलेला पाषाणखंडच दिसत होता. पण रसेश्वरानें मूर्तिकाराच्या कल्पनेला दिव्यदृष्टि दिली होती. त्यामुळें त्याला त्या खडबडीत पाषाणांत एक लावण्यमयी, प्रमाणबद्ध, सुकुमार जिवंत मूर्ति दिसली. शिळा होऊन पडलेली अहिल्या प्रभु रामचंद्राच्या चरणाला दिसली त्याचप्रमाणें.

मग काय विचारतां? सोन्याच्या खाणींत अपघात होऊन एखादा माणूस पुरला जावा आणि गुदमरून मरून जाण्यापूर्वी त्याला बाहेर काढण्यासाठीं प्रयत्नांची आणि उतावळीची शिकस्त करतात, त्याप्रमाणें त्या मूर्तिकारानें केलें.

प्रथम त्यानें गांवांतून एक बैलगाडी आणि माणसें बोलवलीं आणि तो पाषाण आपल्या शिल्पशाळेंत नेला आणि ताबडतोब हातांत हातोडी

आणि छीनी घेऊन त्यानें धोंड्याचीं कपचें काढायला सुरुवात केली. त्याच्या कलात्मक दृष्टीला आंतली मूर्ति स्पष्ट दिसत होती. त्याचें काम त्या मूर्तीला चिकटलेले दगडी कपारेच उखडावयाचें होतें. प्रथम त्यानें जोरजोरानें घाव करून फालतू धोंडा दूर केला आणि मग त्यानें मूर्तीला मोकळी करायला सुरुवात केली. काय त्याचें बळ! आणि तरीहि केवढी त्याची नाजूकी! आपलें सगळें बळ आणि सगळें कौशल्य मनगटांत एकत्र करून त्यानें धोंड्यावर आपले हातोडीचे प्रहार सुरू केले. प्रहाराच्या प्रमाणांत यत्किंचित् देखील अधिकउणें होणें शक्य नव्हतें. कोणत्या बाजूने किती ठोकलें असतां काम बरोबर होईल हें त्याची कलाच, दर क्षणीं त्याला सांगत असे. आंतल्या मूर्तीला थोडी-देखील दुखापत होतां कामा नये. मूर्ति यत्किंचित् जरी दुखावली तर मूर्तिकाराचा प्राणच जावयाचा. शल्यचिकित्सा करणाऱ्या वैद्याच्या – सर्जनच्या कौशल्यानें आणि एकाग्रतेनें तो काम करीत होता. तो अगदीं घामाघूम झाला होता. पाषाणाचे पोपडे एकामागून एक उतरूं लागले. प्रथम मोठे, नंतर बारीक बारीक. कांहीं पोह्यांसारखे तर कांहीं टर्फलासारखे. मूर्तिकाराचा सगळा जीव त्याच्या डोळ्यांत आणि बोटांत एकवटला होता. कुठली भूक आणि कुठली तहान? झोपदेखील जवळ फिरकत नव्हती.

हळूहळू मूर्तीचा अवतार प्रगट होऊं लागला. बुडल्या माणसाला पाण्याच्या बाहेर काढल्यानंतर, किंवा निजलेल्याला उठल्यानंतर प्रथम ज्याप्रमाणें त्याचे अंगप्रत्यंग अलसलुलित दिसतात, आणि डोळ्यांत आणि चेहऱ्यावर झोपेचें झापड दिसतें, त्याप्रमाणें मूर्तीचें दर्शन होऊं लागलें.

आतां मूर्तिकार स्वतःची विद्या आणि स्वतःची निष्ठा आणि स्वतःचें ध्यान आपल्या बोटांच्या टोकांत आणून, योगयुक्त स्थितींत काम करूं लागला. त्याला हवीं असलेलीं औजारें त्यानें स्वतःच तयार केलीं होतीं आणि प्रत्येक औजाराला पाणीदेखील अगदीं हिशेबानें दिलेलें होतें. आतां त्यानें निद्रित मूर्तीला जागें करण्याचें काम सुरू केलें. त्याचा कोमल

आणि गेबी स्पर्श होतांच मूर्तीनें थोडेंसें स्मित केलें. पुढें हळूहळू तिनें आपले डोळे उघडले. डोळे उघडतांच मूर्तिकाराला पाहून पूर्वपरिचय असल्यासारख्या नजरेनें त्याच्याकडे पाहिलें. स्वतःचीं वस्त्रें ठाकठीक केलीं आणि लाखों वर्षांचं शिलात्मक मौन सोडून देवी म्हणाली : "तात ! मला कशासाठीं बोलावलें ? अनेक कल्पांच्या निद्रेतून मला कशासाठीं उठवलं ? कोणत्या कार्याची अपेक्षा बाळगून हें पाचारण केलें आहे ?"

टाकीचे घाव घालून घालून स्वतःच घडवलेल्या मूर्तीपुढें तो हात जोडून उभा राहिला. त्यानें आपलें शिर नमवलें आणि नम्रपणें भक्तिगद्‌गद् आवाजानें म्हटलें, "क्षमा कर देवी ! क्षमा कर. दुनिया अगदीं मेटाकुटीला आलेली आहे. दुःख सहन करण्याची पराकाष्ठा झाली. दुःखाच्या दीक्षेनें दिव्यता धारण करण्याच्या ऐवजीं मानवजात दुःखविह्वल होऊन नास्तिक बनूं लागली आहे. माणसाचा माणसाशीं व्यवहार विपरीत आणि अमानुषी बनूं लागला आहे. मनुष्यजातीला आतां प्रसन्नतेची, बंधुतेची, प्रेमाची आणि उन्नत जीवनाची दीक्षा दिली पाहिजे. माझ्यानें हें होणें नाहीं, त्यामुळें मी गुदमरून गेलों होतों. कांहीं न सुचल्यामुळें वेड्यासारखा भटकत होतों. इतक्यांत जंगलांतील पाषाणखंडांत मला तुझें दर्शन घडलें. मला मार्ग सांपडला. मनोमन माझी खात्री झाली कीं दीन जनांच्या उद्धाराचा मुहूर्त आजच आहे. म्हणूनच तुला आळवलें आहे. मला येथें तुझी स्थापना करूं दे. तुझ्यायोग्य येथें एक मंदिर उभें करीन आणि मग दुनियाभरच्या लोकांना आमंत्रण पाठवीन. ज्यांना तुझें दर्शन घडेल त्यांच्या हृदयांत आस्तिकतेचा व भक्तीचा उदय होइल. मनुष्यजीवनाचें रहस्य त्यांना उमगेल आणि मग मनुष्य मनुष्याला मनुष्य म्हणून, बंधु म्हणून आणि तुझा भक्त म्हणून ओळखायला शिकेल. हे जगन्माते ! भुवनेश्वरी ! हें काय अखंड चालू राहावें यासाठीं तूं आतां येथेंच कायमचें विराजमान झालें पाहिजे."

देवीनें प्रसन्न होऊन म्हटलें, "तथास्तु ! पण वत्सा, तुला स्वतःला माझेकडून कांहीं वर नको का ?"

"कां नको, माते ! मला अवश्य एक वर हवा आहे. तुझ्या दर्शनाला येणाऱ्या भक्तांनीं तुझा येथें आविष्कार करणाऱ्या मला विसरून जावें. मी कोण, कुठला, माझें नांव काय होतें याचा शोध त्यांनीं करूं

नये ! माझ्यामुळें त्यांच्या दर्शनानंदांत विक्षेप येऊं नये, एवढेंच मी मागतों."

देवी गोंधळली. तिचे ओठ हलेनात. मूर्तिकाराला आपण 'वरं ब्रूहि' म्हटलें याचा जणूं काय तिला पश्चात्ताप झाला होता. इतक्यांत देवीच्या चेहऱ्यावर पुन्हां प्रसन्नता चमकूं लागली. तिनें म्हटलें, "तथास्तु."

वर दिला आणि देवीनें तत्काल मूर्तिकाराला उचलून आपल्या हृदयांत सामावला. "आता माझेपासून भिन्न असा तूं राहूंच शकणार नाहींस. माझेशीं अभेद हेंच माझें तुला वरदान आहे. या पाषाणखंडांत मी आवृत्त होत्यें, लुप्त होत्यें, सुप्त होत्यें. तूं माझा आविष्कार केलास. आतां मी तुला माझ्या हृदयाशीं सायुज्यता अर्पण करत्यें. तूं मला देह दिलास आतां. मी तुला विदेह करत्यें. यापुढें पृथ्वीचीं लेकरें माझ्यामध्येंच तुझें दर्शन घेतील. तुझ्यांत आणि माझ्यांत आतां भेद उरला नाहीं."

झाडावर बसून एखादा पक्षी ज्याप्रमाणें सृष्टीला पाहतो त्याप्रमाणें एका कवीनें ही सारी अद्भुत घटना पाहिली आणि ती अमृतवाणी ऐकली.

आणि ज्याप्रमाणें उषःकाल होतांच पक्ष्यांना वाचा फुटते, त्याप्रमाणें कवि गाऊं लागला : "मूर्तिकाराच्या हृदयांत मूर्तीचा जन्म झाला. मूर्तिकारानें त्या मूर्तीची एका पाषाणांत स्थापना केली आणि पाषाणाप्रमाणें कठोर झालेल्या जनतेला हृदयसिद्धि लाभली ! धन्य तो मूर्तिकार ! धन्य ती मूर्ति ! आणि धन्य त्यांचा तो अभेद !

"आणि मीहि धन्य ! कारण मी ही साधना आणि प्रक्रिया पाहूं शकलों ! भगवती माते सरस्वती ! मलादेखील या अभेदांत बुडून जाऊं दे. या मूर्तीसमोर माझें गायन अखंड चालतच राहावें आणि त्या दिव्य रागांतच मी विरून जावें ! तरच हें अद्भुत दृश्य पाहिल्या-ऐकल्याचें सार्थक होईल."

आजदेखील त्या मूर्तीसमोर तोच राग आळवला जातो. पण तें गायन रचलें कुणी, अद्वैताचा तो राग छेडला कुणी, हें कुणालाच माहीत नाहीं. ■

खेळकर पानें : एक अभ्यास

काकासाहेब कालेलकर यांच्या चौदा ललित निबंधांचा हा संग्रह आहे. गेल्या वीस-बावीस वर्षांत लिहिलेले हे निबंध आहेत. वर्षांच्या हिशेबानें निर्मितीचें हें प्रमाण बरेंच व्यस्त वाटतें. परंतु साहित्याला काळाची कसोटी या अर्थानें लागत नाहीं. आणि म्हणूनच, असे सुंदर ललित निबंध काकासाहेबांच्या हातून अधिक लिहिले गेले असते तर चांगलें झालें असतें एवढेंच आपण म्हणूं शकतों.

फुलांच्या मांडवाखालीं बसलें असतां जसें प्रसन्न वाटतें तसाच अनुभव हे ललित निबंध वाचतांना येतो. हे निबंध कसल्याहि हेतूनें लिहिलेले नाहींत. 'गाणें सवेंचि मग होय मनांत जागें' असेंच हें लेखन आहे.

प्रतिपादनाचा कसलाहि काच नसल्यामुळें अनुभवांच्या पानांच्या खेळकर गिरक्यांतून आनंदाच्या अनेक लयी येथें साधल्या आहेत.

आनंदाचे हे अनेकविध क्षण शोधणें हाच या निबंधांचा आवडता छंद आहे आणि म्हणूनच, कपाळाला आठ्या घालून जीवनाकडे पाहणें काकासाहेबांना शक्य नाहीं. अनंत तऱ्हांनीं माणसें आनंद घेत असतात, आपला जीव रमवीत असतात. इतरांचे आनंद घेण्याचे, व्यक्त करण्याचे हे सगळे प्रकार आपल्याला रुचतीलच असें नाहीं. पुष्कळ वेळां हे प्रकार पाहून मन संत्रस्त होण्याचाहि संभव असतो. लेण्यांच्या गुहांजवळ किंवा सृष्टिसौंदर्याची जिथें बहार आहे अशा ठिकाणीं खातपीत, बाजा वाजवीत आनंद घेणारीं माणसें पाहिलीं म्हणजे नाहीं म्हटलें तरी आपण आंतल्या आंत संतापतों. पण काकासाहेबांच्या आनंदाची लय अशी कांहीं पक्की लागलेली असते कीं, या रुचिभिन्नत्वाकडे ते मिस्किलपणें पाहूं शकतात. मुलांच्या माकडचेष्टांची गंमत पाहावी

तशा या नाना लकबी ते पाहतात. कॉर्नेल येथें तिथलें सुंदर सरोवर पाहायला काकासाहेब गेले असतांना आजूबाजूच्या दृश्याचें चित्र काकासाहेब कसें रेखाटतात हें पाहण्यासारखें आहे : "सरोवराच्या कांठीं शेंकडों कुटुंबें जत्रेसाठीं आलीं होतीं. कितीतरी स्त्रीपुरुष कमींतकमी कपडे घालून शरीराची कातडी कमविण्यासाठीं उन्हांत लोळत होते. मुलें किना-यावर धुडगूस घालत होतीं. ठिकठिकाणीं आबालवृद्ध एकत्र बसून उदरपूजा करीत होते. कित्येकांना गायला होत होतें आणि कित्येकजण येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे टक लावून पाहण्याची मौज मिळवीत होते." आवडीनिवडींचा खरखरीत आग्रह न बाळगतां काकासाहेब क्षणाक्षणांत लाभलेला आनंदाचा सोहळा कसा पाहतात हें दाखविण्यासाठीं मुद्दामच हें अवतरण येथें दिलें.

लेखनांतून व्यक्त होणारे एखाद्या लेखकाचे अनुभव आणि त्याची शैली या गोष्टी वेगळ्या करून सांगणें कठीण असतें. पुष्कळ वेळां अशी विभागणी केल्यानें कलानिर्मितीचें स्वरूप जितक्या एकात्मपणें ध्यानांत यावें तसें येत नाहीं. अमुक लेखनांत प्रसाद आहे, तमुक सोपें वा दुर्बोध आहे, आशावादी वा निराशावादी आहे, वर्णनें हुबेहूब असतात, यांसारखे कलावंताच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यावर प्रकाश टाकूं न शकणारे ठोकळेबाज शब्द अशा तऱ्हेच्या कृत्रिम विभागणीनें रूढ होऊन बसतात. विणलेल्या विशेषणांची ही टोपी म्हटलें तर कुठल्याहि लेखकाच्या डोक्याला फिट्ट बसवतां येते.

काकासाहेबांची शैली त्यांच्या अनुभवांशीं एकजीव असल्यामुळें तिचें असें रूढ पद्धतीनें वर्णन करणें अन्यायाचें ठरेल.

या ललित निबंधांतून व्यक्त होणारे हे अनुभव खऱ्याखुऱ्या अर्थानें काव्यात्म आहेत. असे अनुभव जेव्हां व्यक्त होतात तेव्हां नेहमींच एक गोष्ट तीव्रतेनें जाणवते; ती म्हणजे, अशा लेखनांतून भाषेचा सर्जनशील वापर होत असतो. सांकेतिक, तयार काव्यमय भाषा वापरणें हा प्रकारच इथें संभवत नाहीं. भाषेला अशा तऱ्हेनें आलेलें अपरिहार्य व्यक्तिमत्त्व हीच त्या लेखकाची शैली असते. काकासाहेबांच्या लेखनांतून

जाणवणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचें स्वरूप शोधण्यांत गंमत आहे.

हें व्यक्तिमत्त्व काकासाहेबांनीं कृत्रिमपणें कमावलेलें नाहीं. त्यामुळें त्यांच्या मनानें जुनेपणाचे आणि नावीन्याचे धूर्त आडाखे कुठेंच बांधलेले दिसत नाहींत. 'वाचकहो !' अशी हांक घालायला आजच्या काळांत लिहिणारा लेखक संकोचला असता. पण काकासाहेब 'वाचकहो ! ' वरील ओबडधोबड मथळा वाचून विरस होऊं नका " अशी सुरवात आपल्या निबंधाला निःसंकोचपणें करूं शकतात आणि तरीहि ते आपल्याला 'जुने' वाटत नाहींत. उलट, त्यांनीं ' वाचकहो ' अशी हांक घालतांच रसिक वाचक तितक्याच मनमोकळेपणानें हसून ओ देतो, त्यांच्या दिलखुलासपणांत सहभागी होतो. पण ज्या निबंधाची अशी सुरवात होते त्या निबंधाचा विषय मात्र विलक्षण वेगळा, नवीन असतो – खडखड-स्तोत्र ! हाडें घुसळून टाकणारा हा प्रवासाचा अनुभव ! नवेजुनेपणाच्या या गंमतीदार विरोधानें वाचक सुखावतो.

अनुभवांचा हा वेगळेपणा, त्यांच्या सूक्ष्म छटा व्यक्त करण्यासाठीं लेखकाला भाषेचे वरवर विक्षिप्त वाटणारे प्रयोग करण्याची हिंमत नेहमींच दाखवावी लागते. या विक्षिप्तपणाचें स्वरूप चांगल्या लेखनांत प्रयोगासाठीं प्रयोग असें कधींच नसतें. अनुभवांतल्या सूक्ष्म छटा शास्त्रज्ञाच्या कांटेकोर नेमकेपणानें टिपून कलावंताच्या किमयेनें व्यक्त करायच्या ही यांतली जिद्द असते. ही किमया, हा कांटेकोरपणा काकासाहेबांच्या शैलीचें एक मनोहर वैशिष्ट्य आहे.

हें वैशिष्ट्य डोळ्यांत खुपावें, त्याचें प्रदर्शन जाणवावें अशा ढोबळपणें कधींच व्यक्त होत नाहीं. घरंदाज अबोलपणें तें कुठेंतरी बाजूला उभें असतें. आपल्याकडे नजर वेधून घेणें त्याच्या संस्कारितेंत बसत नाहीं. लहानशा क्रियापदांतून, एखाद्या साध्या विशेषणांतून तें उमलत असतें. आवाज न करतां मागून रडतो तेव्हां तो 'मुळुमुळू' रडतो असें आपण म्हणतों. होड्या जेव्हां आवाज न करतां गुपचूप जातात तेव्हां 'मुळुमुळू' हें क्रियाविशेषण काकासाहेब रूढ शब्दप्रयोगांतून हलकेच उचलतात आणि म्हणतात : " सगळ्या होड्या अगदीं मुळुमुळू धावतात." वेगाचा

अनुभव व्यक्त करतांना ते एके ठिकाणीं लिहितात : "आमच्या होडीनें ताशीं चाळीस मैलांची झडप पसंत केली असावी." यामागें असलेली प्रतिमा 'झडप' या एका शब्दांतून सूचित होते. 'तिरपीट उडण्यांत' एक प्रकारची अचानकता, गोंधळ, अस्ताव्यस्तपणा या छटा एका वेगळ्या अनुभवाच्या संदर्भात आपल्या परिचयाच्या असतात. पण लाटांचा अनुभव व्यक्त करतांना तिरपीट उडणें या परिचित शब्दप्रयोगाला काकासाहेब किती वेगळें परिमाण प्राप्त करून देतात पाहा : "समुद्राच्या लाटा छातीवर एकीमागून एक आदळल्यामुळें जी आनंदाची तिरपीट उडते तिची आठवण येथील हवेच्या आणि आवाजांच्या लाटांमुळें झाली." मांजराला दुधाची चरवी पितां येईल, असें ते लिहीत नाहींत. कारण, मांजराच्या लप्लप् असा आवाज करून दूध पिण्याच्या पद्धतींतली गंमत पिणें या क्रियापदाच्या बोटांतून निसटून जाईल असें त्यांना वाटतें आणि म्हणूनच 'लपलपणें' असें क्रियापद ते तयार करतात आणि लिहितात : "मांजर म्हणतें, चुलीवरून उतरून ठेवलेल्या दुधाची चरवी मला एकट्याला लपलपतां येईल." तांबड्या आणि सोनेरी यांच्या मध्यें असलेल्या रंगाची संगति व्यक्त करण्यासाठीं ते चटकन् लिहून जातात : "यामुळें तो तांब्या-सोन्यामधील उभयान्वयी रंग जास्तीच खुलूं लागला." अशा वेळीं 'उभयान्वयी' या व्याकरणांत मोडणाऱ्या परिचित शब्दाला चित्रकाराच्या हळुवार कुंचल्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. हिरव्या रंगांतल्या मार्दवाची किंचित् गहिरी छटाहि त्यांच्या नजरेंतून सुटत नाहीं. ती व्यक्त करण्यासाठीं "हिरव्यांत प्रौढ मार्दव व्यक्त होईल." असें ते लिहितात. भाषेचा सर्जनशील वापर असा शब्दप्रयोग काकासाहेबांच्या शैलीचें स्वरूप रेखाटतांना कां केला याचें प्रत्यंतर यावें यासाठीं हीं उदाहरणें मुद्दामच मीं इथें दिलीं.

संवेदना आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या चित्रविचित्र प्रतिमा यांना काकासाहेबांच्या अनुभवविश्वांत फार महत्त्वाचें स्थान आहे. काकासाहेबांचे हे निबंध कवितेला फार जवळचे वाटतात याचें हें एक महत्त्वाचें कारण आहे. एक तर विचारांचा प्रचार करण्याची, उपदेश-संदेश देण्याची

भूमिका या निबंधांनीं फारशी कुठें घेतलेली नाहीं. आणि त्यामुळें या संवेदनांना आनंदाचीं रूपें देण्याला तर्कटी अडथळा कुठेंहि फारसा आलेला नाहीं. फुलांवर लिहिलेल्या एका निबंधांत ते म्हणतात : "कांचेच्या सुंदर वाटींत थंडगार पाणी भरून त्यांत तऱ्हेतऱ्हेच्या फुलांची मी सुंदर रचना करीत असें. कांहीं वेळानें पाणी सुगंधित होई आणि तें डोळ्याला लावतांना फार बरें वाटे." हें वाक्य या निबंधांमागच्या अनुभवसृष्टीचें प्रतीक ठरायला हरकत नसावी. नाजुक, प्रसन्न, सुगंधी फुलासारख्या उमललेल्या आनंदी क्षणांच्या रचना म्हणजेच जणूं हे निबंध. यांतून 'जीवनविषयक तत्त्वज्ञान कोणतें सांगितलें आहे बरें ?' हा बटबटीत शाळकरी प्रश्न हे निबंध वाचून रसिक वाचक विचारणार नाहीं; आणि त्यांनीं तो तसा विचारावा अशी काकासाहेबांची अपेक्षा असेल असें वाटत नाहीं. कारण या आनंदाच्या अनेक रूपांचा तरलपणें घेतलेला अनुभव हेंच यांतून अप्रत्यक्षपणें व्यक्त होणारें जीवनाचें तत्त्वज्ञान आहे. फुलांनीं सुगंधित झालेल्या पाण्याचा पापण्यांना होणारा गार स्पर्श हाच त्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यय. काकासाहेबांच्या रसिक मनाला तत्त्वशोधनाच्या उपयुक्ततावादी दृष्टीनें वाचकांनीं हे निबंध वाचलेले रुचणार नाहीं. या हिशेबी संस्कृतीचा त्यांनीं अप्रत्यक्षपणें निषेधच केला आहे. काकासाहेब अडुळशाचीं फुलें चोखतांना दोन मुसल्मान बोहरे गृहस्थ हसून म्हणाले : "घरमें शक्कर मिलती नहीं ?" काकासाहेबांनीं या दोन गृहस्थांना (मनांतल्या मनांत) उत्तर दिलें : "बच्चाजी, साखरेच्या पाकांत तुला बुडवून तुझा मुरंबा करण्याइतकी साखर विकत घेण्याची मला ऐपत आहे; पण या फुलांतील मध फिरत फिरत चाखण्याचा आनंद तुला समजत नाहीं त्याला मी काय करणार ?" काकासाहेबांनीं दिलेलें हें उत्तर या निबंधांमागचाहि त्यांचा दृष्टिकोन उत्तम व्यक्त करतें असें मला वाटतें.

रंगरसगंधाच्या अत्यंत तरल अशा संवेदना काकासाहेब नितळपणें टिपून घेतात. बघतां बघतां या संवेदनांना आंतरिक लय प्राप्त होते, त्यांतून प्रतीत होणारे अनेक आकार काकासाहेब कौतुकभरल्या नजरेनें

न्याहाळूं लागतात. या आकारांचा कोवळेपणा, त्यांचा डौल, त्यांची रंगसंगति, त्यांचा दिमाख आणि त्यांच्यांतली आकर्षक धूसरता.... कांहींच त्यांच्या नजरेंतून सुटत नाहीं. या सौंदर्याच्या "ओळखी मनांत गजबजूं लागल्या म्हणजे जीवन कसें भरल्याभरल्यासारखें" त्यांना वाटतें. फुलांना सूर्यकिरणांनीं केलेल्या गुदगुल्या त्यांना जाणवतात. "प्रत्येक फुलाचा वेगळा नखरा" त्यांच्या नजरेंत भरतो. स्वतःच्या बगिच्यांतल्या प्रत्येक फुलाला व्यक्तिगत नांव देण्याची नामरूपात्मक गरज त्यांना भासते. छडीला लागून उगवणारें हॉलीहॉकचें फूल "छाती पुढें काढून सर्व बाजूंतीं पाहत सुटतें" ही गोष्ट ते न विसरतां, एखादी महत्त्वाची बातमी सांगावी तशा कौतुकानें सांगतात. मांजरांच्या पिलांची "गोजिरवाणीं गुलाबी नाकें पाहून" त्यांचा वात्सल्यभाव जागृत होतो. हें सौंदर्य जाणण्यायला पानांफुलांचा बहरच हवा असें नाहीं. हेंच कौतुक निष्पर्ण झाडांच्या बाबतींतहि काकासाहेब मनांत बागवतात. "ज्या झाडावर एकहि पान उरलें नाहीं, जें वेडींवाकडीं बोटें वेऊन वेड्यासारखें उभें आहे आणि आकाशावर गालिचाप्रमाणें एक चित्र रेखीत आहे" असें जिवंत चित्र ते डोळ्यांपुढें उभें करतात.

काकासाहेबांनीं हळुवारपणें निर्माण केलेल्या संवेदनांच्या विश्वाचें हें वर्णन कांहींशा विस्तारानें मीं केलें. हें वर्णन विस्तारानें इथें टिपून देण्यांत माझा एक हेतु होता. या संवेदनांतून हे ललित निबंध 'चित्र-विचित्र' आकार घेतात आणि म्हणूनच या विवेचनाच्या द्वारें मला काकासाहेबांच्या कलानिर्मितीच्या प्रक्रियेकडे लक्ष वेधायचें होतें. निर्मितीची ही प्रक्रिया हा या संग्रहांतील एका निबंधाचा ('चित्रविचित्र') विषयहि आहे. जीवनाच्या आकृतींतून आणि विकृतींतून रूपनिर्मिति करणा या कलावंताच्या मनाचें दर्शन घडवण्याचा प्रयत्न या निबंधांत काकासाहेबांनीं केला आहे. हा अनुभव घेणें आणि त्यांतहि तो बारकाव्यांसकट व्यक्त करणें ही एक विलक्षण अवघड गोष्ट आहे – आणि काकासाहेबांनीं ती यशस्वीपणें साधली आहे. अस्सल लागलेला सूर ऐकतांच जसें क्षणार्धांत एक थरारलेपण प्रत्ययाला येतें तसा अनुभव हा

निबंध वाचतांना येतो. कांचेंतून दिसणाऱ्या पानांचें, फांद्यांचें हें दृश्य आहे. खिडकीच्या तावदानाची ही कांच सगळीकडे सारखीच जाड नाहीं. फांद्यांची आणि पानांची विकृति होते आहे. निसर्गालाहि साधल्या नसत्या अशा चित्रविचित्र आकृत्या दिसत आहेत. काकासाहेब लिहितात : "पानांच्या आकृतीची ही प्रतिभाशाली नवनवी लीला पाहतां पाहतां डोळे मस्त झाले. आकारसृष्टीच्या या संसृष्टींतील एकहि सृष्टि खोटी किंवा मायारूप कशी म्हणतां येईल ? या सर्व सृष्टींचा साक्षी मीच. कांचेला बाह्य सृष्टींत कसलाच फेरफार करण्याचें सामर्थ्य नव्हतें. पण मला नवें नवें दर्शन घडविण्याचें सामर्थ्य त्या जड आणि अनघड कांचेंत विशेष होतें. सर्व गोष्टींची चिकित्सा करणारें मनच जर त्या अनघड कांचेसारखें असलें तर त्यानें पाहिलेलें दृश्य आणि काढलेलीं अनुमानें विकृत नसतील कशावरून ? ज्याला केवळ आनंद हवा आहे त्याला कोणतीहि विकृति अनिष्ट वाटणार नाहीं. आनंदाचा खरा उपासक असतोच सर्व परीनें अलिप्त आणि अनासक्त."

संवेदनांतून, प्रतिमांतून सौंदर्याकृति हेरणाऱ्या काकासाहेबांच्या कलावंत मनाची हालचाल यावरून स्पष्ट होईल असें मला वाटतें. जीवनाचें बहुरूपी दर्शन घेत असतांना इथें कसलेहि राठ, खरखरीत आग्रह मध्यें येत नाहींत. याचें कारण या कांचेच्या किमयेमागें कलात्मक अलिप्तता उभी आहे. नीति-अनीतीच्या, योग्य-अयोग्याच्या रूढ संकेतांना बुजून विकृतींकडे पाठ फिरवणारी, सत्याचें दर्शन टाळणारी ही अलिप्तता नव्हे. या निबंधाच्या रूपानें काकासाहेबांनीं आपली आणि पर्यायानें सर्वच कलावंतांची अनुभव घेण्याची प्रक्रिया हळुवारपणें उलगडून दाखवली आहे.

संवेदनांचे हे 'चित्रविचित्र' आकार काकासाहेब टिपून घेतात आणि जीवनाचा अर्थ शोधणाऱ्या अंतर्मुख वृत्तीनें त्यांत संपन्न आशयाचा प्राण भरतात. 'सुटलेलीं खेळकर पानें', 'एकाकी', 'जिवलग अंधःकार', 'चित्रविचित्र' यांसारख्या निबंधांत अनुभूतींत खोल बुडी घेणाऱ्या त्यांच्या अंतर्मुखतेचा प्रत्यय येतो. तरल सौंदर्याच्या जाणिवेमुळें या

अंतर्मुख होऊन केलेल्या चिंतनाला सुतकी कळा येत नाहीं; आणि या चिंतनामुळें रंगगंधांच्या या गिरक्यांना नटवेपणा येत नाहीं – असें हें परस्पर-मैत्र आहे. गुणशून्य वस्तूचा अनुभव घेतां येतो कीं नाहीं याचा शोध घेण्याची काकासाहेबांना इच्छा होती. हा आपला अनुभव विहिरींत उडी मारून तळाशीं जाण्याची प्रतिमा वापरून त्यांनीं विलक्षण जिवंतपणें व्यक्त केला आहे. वस्तूची गुणशून्यता या विषयावर दहा पानी शिक्षकी भाष्य करूनहि जें साधलें नसतें तें या विहिरीच्या एका प्रतिमेनें साधतें.

अशा अमूर्त आशयाला शरीर देणारीं हीं संवेदनाचित्रें काकासाहेब बहुधा निसर्गातूनच घेतात. हें निसर्गचित्रण म्हणजे तपशिलांची यादी देऊन केलेलें वर्णन नव्हे. हा निसर्ग आणि मी माणूस असा दुरावा इथें नसतोच. "मी नियमितपणें फुलांच्या भेटीला जात असें. या भेटीला मी मुलाकात म्हणत असें. कारण थोडसा परिचय झाल्यानंतर आमच्या गुजगोष्टी चालत" असें ते फुलांशीं वागतात; नुसते बघत नाहींत. "हीं पानें माझीं सवंगडीच झालीं आहेत. त्यांना हें नूतन वर्ष खूप आनंदाचें जावो" अशी इच्छा ते सहजपणें व्यक्त करतात. इथें निसर्गाचें मानुषीकरण करून रूपक रचणें वगैरे प्रकार नाहीं ! कारण इथें माणूस आणि निसर्ग यांतलें अंतर गृहीतच धरलेलें नाहीं. एका माणसाला दुसऱ्या माणसाविषयीं कुतूहल, जिव्हाळा, सलगी जाणवावी तशी इथें जाणवते. या जाणिवेंत अलंकारिक रचनेचा, चमत्कृतीचा भाग नाहीं. या जाणिवेमुळेंच माणसाच्या मनांतलें चैतन्य आणि निसर्गातून व्यक्त होणारें चैतन्य यांची एकवट काकासाहेब अनुभवूं शकतात. 'सुटलेलीं खेळकर पानें' या निबंधांत हा प्रत्यय विशेष येतो.

या ललित निबंधांचें निवेदन प्रथमपुरुषी आहे. ललित निबंधांच्या अशा तऱ्हेच्या निवेदनांत आठवणी, आख्यायिका, किस्से यांचे रंग भरले जातात. काकासाहेब गोष्टीवेल्हाळ आहेत. आपल्या बालपणच्या आठवणी, त्या वेळचीं माणसें, इतकेंच काय पण पशुपक्षीझाडेंसुद्धां ते जिवंतपणें वाचकाच्या डोळ्यांसमोर उभीं करतात. या संग्रहांतील निबंधांत

हे 'स्मरणयात्रें'तले दुवे अनेकदां येऊन जातात. कांहीं गोष्टीवेल्हाळ माणसें फार बोलतात; आपल्या आवाजावर तीं जरुरीपेक्षां खूपच जास्त प्रेम करतात. मन प्रसन्न करणारा गोष्टीवेल्हाळ मनुष्य जसा घुम्या असून चालत नाहीं त्याप्रमाणें फार पाल्हाळिक असूनहि चालत नाहीं. आठवणींचें निवेदन करतांना काकासाहेब योग्य तें कलात्मक अंतर राखतात, मोजक्या शब्दांत ते चित्र उभें करतात. गप्पा रंगवण्यासाठीं ते वाचकाशीं फाजील सलगी कधींहि करीत नाहींत; परिणाम घडवून आणण्यासाठीं निवेदनाच्या क्लृप्त्या वापरीत नाहींत. वाचकासाठीं काकासाहेब तो प्रसंग पुन्हां एकदां जाणिवेंत जगतात – संयमी कलावंताच्या जाणिवेंत जगतात.

काकासाहेबांचें हें निवेदन मनोवेधक करणारी आणखी एक गोष्ट या निबंधांत – त्यांच्या सर्वच लेखनांत – जाणवते : अनेक संस्कृतींचा रसिक-परिचय असलेलें त्यांचें मन. भारतांतल्या सर्व प्रांतांच्या संस्कृतींची ओळख तर त्यांना आहेच, पण पाश्चिमात्य संस्कृतीचेहि ते जाणकार आहेत. मांजराच्या आठवणी सांगतांना 'काव्यप्रकाशां'तला 'कपोले मार्जारः' हा श्लोक त्यांना चटकन् आठवतो; त्याप्रमाणेंच गळणाऱ्या पानांचें चित्र रेखाटतांना "पडावें कीं न पडावें याचा निर्णय न करणाऱ्या पानांच्या वतीनें वाऱ्यानें आपला 'कास्टिंग वोट' दिला" असेंहि ते लिहितात. विजेच्या पंख्यावर बसलेला पक्षी पाहून त्यांना वेदकाळांतला 'चात्वाल' आठवतो. बोक्याला 'व्यंकटेश' हें नांव कां दिलें हें लिहितांना त्या नांवाचें कर्नाटकाच्या सांस्कृतिक जीवनांतलें स्थान ते सहजपणें सांगतात. हे सगळे संदर्भ देत असतांना त्यांत विद्वत्तेच्या प्रदर्शनाचा सोस कुठेंच जाणवत नाहीं. उलट, या संदर्भांमुळें परंपरा आणि अनुभव यांचें एक जिवंत नातें जोडलें जातें.

काकासाहेबांच्या या निवेदनाला खुसखुशीतपणा आणून देणाऱ्या आणखी एका गोष्टीचा इथें आवर्जून उल्लेख केला पाहिजे : ती म्हणजे या निबंधांतला नर्म विनोद. उपरोध, व्यंगदर्शन, दंभस्फोट इत्यादि विनोदाच्या हातांतलीं कमीअधिक उग्र हत्यारें काकासाहेब वापरीत

नाहींत. शब्दांच्या किंवा प्रसंगांच्या चमत्कृतिपूर्ण कसरतीहि ते करीत नाहींत. जीवनाकडे पाहाणाऱ्या त्यांच्या दृष्टीलाच या विनोदाचें तल्लख अस्तर आहे. दूर असलेल्या फुलाचा मंद वास जाणवावा, पण फूल कुठें आहे याचा पत्ताहि लागूं नये, तसेंच कांहींसें या सौम्य विनोदाच्या बाबतींत प्रत्ययाला येतें. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'त जो विनोद आढळतो तीच याहि विनोदाची जात आहे. हा विनोद 'केला' जात नाहीं : अनेकरंगी जीवनाकडे पाहाणाऱ्या अलिप्त कुतूहलाच्या नजरेंत तो असतो; जीवनाचा उमदेपणानें स्वीकार करण्याच्या विशिष्ट लकबींत तो असतो. हा विनोद जाणवतो तेव्हां वाचक स्वतःला नकळत हलकेच हसतो – स्वतःला नकळत. हा सौम्य विनोद लेखनांत इतका एकजीव मिसळलेला असतो कीं उदाहरणासाठीं तो वेगळा करून दाखवायचें म्हटलें तर असा प्रयत्न हास्यास्पद ठरतो.

काकासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वांत जसा एक कलावंत आहे तसाच एक शिक्षकहि आहे. या शिक्षकावर काकासाहेबांचा फारच लोभ आहे. या संग्रहांतले ललित निबंध वाचत असतांना हा शिक्षक समंजस, आपल्या मयादा समजणारा असल्याचेंच बहुधा जाणवतें : म्हणजे असें कीं, काकासाहेबांतल्या कलावंतानें निर्माण केलेल्या विश्वांत लुडबूड करण्याचें धारिष्ट्य हा शिक्षक सहसा दाखवीत नाहीं. पण हा शिक्षक जेव्हां आपली मर्यादा ओलांडतो – खरें म्हणजे सोडतो – तेव्हां मात्र काकासाहेबांच्या ललित निबंधाचा तोल तो बिघडवून टाकतो. मग निबंधाला भाष्याचीं, सारांश सांगणाऱ्या व्याख्यानवजा परिच्छेदांचीं विशोभित ठिगळें जोडलीं जातात. कलावंतानें निर्माण केलेल्या सूचक प्रतिमासृष्टीच्या सामर्थ्यावर जणूं या भावड्या शिक्षकाचा विश्वास नसतो. 'निसर्गाचीं हसरीं मुलें' या निबंधांत "फुलांची भक्ति कशी करावी हें जर शिकायचें असेल, तर फुलपांखरांपासून शिकावें" अशी प्रस्तावना करून हा शिक्षक कलावंताला बाजूला ढकलतो आणि "फुलपांखरें फुलांच्या गर्भीदानाला मदत करतात. तीं नसतीं तर सृष्टीला वंध्यत्व आलें असतें" वगैरे शाळकरी माहिती आत्मविश्वासपूर्वक सांगूं लागतो. कांहीं उत्तम

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 36714 दि: 1/6/64
क्रमांक 2456 दि: 24/6/64

गवई गातां गातां मध्यें मध्यें थांबून व्याख्यान सुनावतात. या प्रकारामुळें रसिक श्रोत्याचा जसा विरस होतो तसाच विरस काकासाहेब मधेंच 'विषय समजावून' सांगूं लागले कीं होतो. अशा बिघडलेल्या निबंधाच्या शेवटीं काकासाहेब आशयाचें थोडक्यांत तात्पर्य सांगतात ! विषय मुलांना समजावून सांगितल्यावर शिक्षक त्याचें थोडक्यांत Recapitulation करतो तसाच हा प्रकार. फुलांवरच्या निबंधांत "फुलें म्हणजे समस्त जीवनसृष्टीचा समृद्ध जीवनानंद होय" असें हें 'तात्पर्य' निघतें. खरें म्हणजे या जीवनानंदाचा उल्लेखहि न करतां तो प्रत्यय वाचकांपर्यंत पोंचवणें इथेंच कलावंताचें कर्तृत्व असतें. परंतु त्याऐवजीं या अनुभवाविषयीं लेखकानें विधानें करणें हा कलावंताचा पराभव आहे. 'एकाकी', 'निसर्गाचीं हसरीं मुलें' अशा कांहीं निबंधांत काकासाहेबांतल्या कलावंतानें पत्करलेला हा पराभव जाणवतो.

काकासाहेबांचे हे निबंध वाचतांना एका समृद्ध व्यक्तित्वाच्या सहवासांत राहिल्याचा आनंद वाचकाला होतो. फुलांना त्यांनीं एके ठिकाणीं आस्तिक म्हटलें आहे. या फुलांसारखेंच या निबंधांमागचें मन आस्तिक आहे.

'पुष्पसाधना' या निबंधाच्या प्रारंभीं प्रार्थनेचें वातावरण कसें असावें हें सांगतांना काकासाहेब लिहितात : "धूपाचा सुगंध आसपास पसरला म्हणजे जो एक प्रकारचा आल्हाद आणि संतोष नाकाला, डोक्याला आणि चित्ताला वाटतो तेंच वातावरण प्रार्थनेचें. चिंतन वाटेल त्या विषयाचें करावें. कल्पनेनें बसल्या बसल्या कोठूनहि हिंडून यावें, भराऱ्या माराव्या किंवा जुन्या अनुभवाचा रवंथ करावा. बंधन कसलेंच नाहीं. फक्त वातावरण उन्नत असावें, शुचिभूत असावें, प्रसन्न, मंगल असावें आणि जीवनाची खोली अनुभवावयास मिळाल्यामुळें जें समाधान असतें तें मिळावें एवढीच अपेक्षा असते."

'खेळकर पानें' या संग्रहांतले निबंध वाचतांना याच वातावरणांत वाचक वावरतो एवढें म्हटलें म्हणजे पुरे.

ग्रं. क्र. 03632

— मंगेश पाडगांवकर

REFBK-0013732

काका कालेलकर

रवींद्र-मनन

रवींद्र-वीणा

रवींद्र-झंकार

जीवनलीला

दुर्गा भागवत

ऋतुचक्र

गो. वि. करंदीकर

स्पर्शाची पालवी

प्रभाकर पाध्ये

अगस्तीच्या अंगणांत

उडता गालिचा

तोकोनोमा

हिरवी उने

न. वि. गाडगीळ

माझा येळकोट

पाव आणि मिसळ

पु. मं. लाड

आकाशगंगा

काकासाहेब कालेलकर यांच्या चौदा ललित निबंधांचा हा संग्रह आहे. गेल्या वीस-बावीस वर्षांत लिहिलेले हे निबंध आहेत. वर्षांच्या हिशेबानें निर्मितीचें हें प्रमाण बरेंच व्यस्त वाटतें. परंतु साहित्याला काळाची कसोटी या अर्थानें लागत नाहीं. आणि म्हणूनच, असे सुंदर ललित निबंध काकासाहेबांच्या हातून अधिक लिहिले गेले असते तर चांगलें झालें असतें एवढेंच आपण म्हणूं शकतों.

फुलांच्या मांडवाखालीं बसलें असतां जसें प्रसन्न वाटतें तसाच अनुभव हे ललित निबंध वाचतांना येतो. हे निबंध कसल्याहि हेतूनें लिहिलेले नाहींत. 'गाणें सवेंचि मग होय मनांत जागें' असेंच हें लेखन आहे.

प्रतिपादनाचा कसलाहि काच नसल्यामुळें अनुभवांच्या पानांच्या खेळकर गिरक्यांतून आनंदाच्या अनेक लयी येथें साधल्या आहेत.

— मंगेश पाडगांवकर

यांच्या प्रस्तावनेंतून